# माणूस

१३ जानेवारी १९७३
पन्नास पैसे

लोकांनी माझं माझ्या योग्यतेच्या मानानं फारच कौतुक केलं. इतकं केलं नसतं तर कदाचित् बरं झालं असतं.—भाऊसाहेब खांडेकर



# मित्रहो ! सुटलो !

प्रिय मित्रहो,

गेल्या दीडदोन वर्षात तुमचे नि आमचे एवढे जिव्हाळ्याचे नि आपुलकीचे संबंध निर्माण झाले आहेत, की आभार मानण्याचा औपचारिकपणा तुम्हाला कदाचित आवडायचाही नाही. तरी पण महाराष्ट्र सरकारच्या दडपशाहीविरुद्ध विजय मिळविण्यात ज्यांचा खरा सिंहाचा वाटा आहे त्यांचा नामनिर्देश तरी व्हावा या इच्छेतून आभारप्रदर्शनाचा हा खटाटोप करीत आहोत.

प्रस्थापित कायदेशीर सरकारविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा प्रचार करणारी पत्रके छापण्याच्या गुन्ह्याबद्दल २४ मे ७१ च्या मध्यरात्री पुणे स्पेशल ब्रँच पोलिसांनी

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१३ जानेवारी १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : बत्तीस

आम्हा दोघांना अटक केली. २ ऑगस्ट ७१ ला १२४अ, १२०ब, १५३अ इत्यादी आय. पी. सी. कलमाखाली आमच्यावर आरोपपत्र ठेवण्यात आले. आणि तब्बल दीड वर्षाहून अधिक कालानंतर स्पेशल मॅजिस्ट्रेट आर. एम. पाटील यांनी खटल्याचा निकाल दिला. आमची निर्दोष मुक्तता झाली !

श्री. आर. एम. पाटील यांनी आपल्या निकाल पत्रात म्हटले आहे– 'काही तरी कार्य केले आहे हे दाखविण्याच्या हेतूने सदर पत्रके पोलीस सब-इन्स्पेक्टर श्री. प्रभू यांनी छापखान्यात झडती आधी आणून ठेवली असावीत. कोर्टापुढील पुराव्यावरून दोघा आरोपींनी कट करून पत्रके प्रसिद्ध केली हा तर्क असंभवनीय आणि अनैसर्गिक वाटतो. साक्षीदार क्षीरसागर हा पोलिसांनी नंतर उभा केलेला खोटा साक्षीदार असून तो पोलिसांचा माणूस वाटतो.'

यावर आणखीन काही भाष्य करण्याची आवश्यकता आहे काय ?

पण एकंदरीत या खटल्यात बऱ्याच गमती जमती झाल्या. सरकारच्या 'नजरचुकीने' पहिले दहा महिने आम्हाला बेकायदेशीररीत्या तुरुंगात रहावे लागले. एकाच आरोपाखाली तीन वेळा चार्जशीट ठेवण्याचा विक्रमही झाला. तिसऱ्या चार्जशीटमध्येंही कायदेशीर उणीवा राहिल्या होत्याच. सरकारने न्यायालयाची किती वेळा पायमल्ली केली याला हिशोबच नाही – एक मोठी जंत्रीच करावी लागेल. लौकिक

मुखपृष्ठ : जया दडकर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अर्थाने जरी आमचा विजय झाला असला तरी महाराष्ट्र सरकारचा हेतू साध्य झाला आहे. दीड वर्षे आम्हाला तुरुंगात ठेवून आमचे आर्थिक नुकसान करण्यात आले आहे. मानसिक कष्ट किती झाले याचे काही गणित मांडता येणार नाही. आणि 'राजकीय विरोधाची' आमच्याकडून जी किंमत सरकारने वसुल केली ती तर – 'गांधीजींच्या वारसदारांना (?)' न शोभणारी अशी.

—तरी पण या साऱ्या आपत्तीत, दीड वर्षाच्या कारावासातही आमचे मनोधैर्य टिकू शकले नि सरकारतर्फे दाखवल्या गेलेल्या लालुचींना बळी पडून आम्ही माघार घेतली नाही याचे कारण, जी मित्रमंडळी भरघोस सहाय्य घेऊन आमच्यापाठी उभी राहिली त्यांच्या सदिच्छा होत.

...पोलिसी दहशतीच्या त्या काळात, जेव्हा सहानभूतीचे चार शब्दही महाग होते तेव्हा श्री. ग. माजगावकर यांनी प्रथम पुढाकार घेऊन 'अनिल बर्वे–पायगुडे न्यायसंपादन सहाय्य समिती' स्थापन केली. या कामी डॉ. बाबा आढाव आणि भाई वैद्य यांनीही बहुमोल मदत केली. कायदेशीर बचावासाठी वकील उभे केले. पैसे जमवले. त्यांच्या या कार्याची आमच्या लेखी जी किंमत आहे ती आकड्यांमध्ये वा शब्दांमध्ये व्यक्त करण्याइतकी लहानसहान नाही.

साथी एसेम जोशी यांनी आमच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी बोलावलेल्या जाहीर सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. महाराष्ट्रातल्या चवदा प्रमुख सर्वोदयी कार्यकर्त्यांनी व पुण्यातील प्रमुख बुद्धिवाद्यांनी आणि विचारवंतांनी निषेधपत्रक काढले. कल्याणच्या कवि संमेलनात तरुण कवींनी सरकारच्या या सूडबुद्धी धोरणाचा धिक्कार केला, ज्या असंख्य वाचकांनी पत्रांद्वारे संताप व्यक्त केला त्या सर्वांचा आणि सोबतचे श्री. ग. वा. बेहरे, ब्लीट्झचे आर. के. करंजीया, विनायक भावे यांनी आणि केसरीचे जयंतराव टिळक यांनी जो काही पाठिंबा दिला त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

अॅड. कल्याणमल सिंघवी, बॅरिस्टर मोहन पुंगलीया, अॅड. जयंत प्रधान यांनी हायकोर्टात स्वत: पुढाकार घेऊन आमचे काम पाहिले. त्याचप्रमाणे अॅड. एम. आर. परांजपे, बॅरिस्टर सी. बी. आगरवाल यांनी व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता खटल्याचे काम चालवले आणि आमची निर्दोष मुक्तता करवली. श्री. एम. आर. परांजपे यांची कामगिरी तर न्यायालयीन इतिहासात नोंद व्हावी एवढी आहे असे म्हटले तरी वावगे होऊ नये.

गुरुवर्य प्रा. कोल्हटकर यांनी सतत केसकडे लक्ष दिले. चंद्रकांत व शिरीष बव यांनी जी धावपळ केली ती जर केली नसती तर हेही प्रयत्न तोकडेच पडले असते.

आणखीन काय सांगावे ?

सदाकरिता आपले मित्र

८ जानेवारी ७३ अनिल बर्वे

के. पी. पायगुडे

साप्ताहिकाचा लेख असल्याने आकडेवारी टाळून स्वतःच्या डोळ्यांना जे दिसले तेच लिहीत आहे.

– वसंत पोतदार

# कलकत्ता कसोटी सामना

ह्या निर्धन, चिंताग्रस्त व दुःखी देशातील ७०,००० लोकांच्या चेहऱ्यावरील आनंदाचं भरतं पाहून गहिवरून आलं. २५ वर्षांत स्वतंत्र भारतात २–५ वेळाच असे मोके आलेत, पण हजारो लोकांना एकाच वेळी आनंदाचा झटका येताना पहाण्याचा माझा प्रथमच अनुभव !

दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पाचव्या दिवशी भोजनोत्तर ५ मिनिटांवर कॉटम मैदानाबाहेर व प्रेक्षक आत ! युद्धबंदी मायभूमीत परतल्यावर काय करतात ते आजपर्यंत वाचीतच होतो. पण युद्धप्रसंगी भावनैक ऐक्याचे सार्थ प्रमाण देणारी आमची जनता क्रीडाक्षेत्रातही तितक्याच एकजुटीने संघटित होते व खेळपट्टीवर गडबडा लोळते, तिचे मुके घेते, ती माती कपाळी माखते हे पहात असताना अचानक दिसेनासे झाले. आसवांनी नेत्रांना झाकून टाकले होते.

क्षणार्धात भानावर आलो. डोळे पुसीत उड्या टाकीत खेळाडूंच्या तंबूपाशी आलो. वाडेकरच्या हातून एक विजयी यष्टी हिसकावून घेतलेल्या प्रेक्षकापाशी जमलेली गर्दी चिरून, 'आमि खबरेर कागजेर लोक' असा घोष अत्यंत आत्मविश्वासू स्वरात देत देत आत शिरलो. कोपऱ्यात उभा राहून समोर बघता बघता डोळे पुन्हा पाणावले. आमचे विजयी खेळाडू प्रथम वाडेकर व मग बेदी-चंद्राला घेऊन अक्षरशः नाचीत होते. शेवटी तर त्यांनी व्यवस्थापक कर्नल अधिकारींना उचलून नाच सुरू केला. फौजी अधिकाऱ्याला गयावया करताना प्रथमच पाहिले. कर्नलसाहेबांची अनेक मिन्नत विनवण्या नंतर स्वतःची सुटका करून घेतली.

### सदऱ्याची मशाल

पुन्हा बाहेर येऊन पहातो तर जवळजवळ सर्वच प्रेक्षक मैदानात ! सुस्वरूप बंगाली ललना व त्यांचे अंगरक्षक मातेवाईक तेवढे स्टेडियमच्या बाकावर उभे राहून एक दृश्य पहात होते. एका क्रिकेट रसिकाने 'झटका' व्यक्त करण्या-

साठी स्वतःचा सदरा काढून, त्याला पेटवून ऑलिंपिक सामन्याची ज्योत केली होती. दुसरीकडे एका फेटेवाल्या सरदारजीलाच बेदीचे प्रतीक मानून खांद्यावर बसवून शोभायात्रा' निघाली होती. एरवी बंगाल्यांना 'पंजाबी' शब्द उच्चारताना ऐकावे. पण इडन गार्डनच्या पंढरीवर हे हजारो क्रीडावारकरी भाषा व जातीला पायतळी रोंदून स्वतःला हरवून बसले होते. अधुनमधून खेळाडूंच्या तंबूपाशी व खेळपट्टीपाशी कलकत्त्यात वर्षानुवर्षे चाललेला पकडापाटीचा मजेदार खेळ सुरू होत होता. ह्या खेळातील २ विरुद्ध दल: पोलीस व जनता! पण या खेळाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून काही प्रेक्षक टळटळीत मध्यान्ही उन्हाला चक्क चांदणी रात्र मानून इडनच्या हिरवळीवर 'क्षीरसागरी भगवान विष्णू' पोजमध्ये पहुडले होते (लक्ष्मी गैरहजर). फटाके व वाजंत्रीचा कल्लोळ सोडून बाहेर पडलो. कार्यालय व शाळा-कॉलेजांना सुट्टी घोषित झाली होती. रस्त्यारस्त्यात, गल्लीपाड्यात वाजंत्री, फटाके, नाचाचे मिछिल म्हणजे जुलूस पाहून दंग झालो मी!

## फलंदाजी

दोन्ही दलांची फलंदाजी बेतास बात! आमच्या मध्यम श्रेणीने पुन्हा अवसान घात केला. पहिल्या डावात वाडेकर (४४) ची अप्रतिम नयनाभिराम फलंदाजी व इंजीनियरचा तारणहार ७५ धावाच काय त्या जमेच्या बाजूला. त्याला आणखी दुबळे प्रत्युत्तर इंग्लंडचे. अर्नोल्ड फिट असता तर ज्या क्रिस ओल्डला हा सामना खेळण्याची संधीच मिळाली नसती तोच इंग्लंडचा सर्वाधिक धावसंख्या करणारा (३३) खेळाडू ठरला. पाठोपाठ ग्रेग (२९). दुसऱ्या डावात आमचे दुराणी (५३) व विश्वनाथ (३४) व त्यांचे ग्रेग (६७) डिनेस (३२) व ओल्ड (१७ नाबाद) काय ते थोडेफार यशस्वी ठरले पण ह्या आकडेवारीत एक तफावत फार मोठी. इंग्लंडची धावसंख्या रोखून धरण्याची क्षमता आमच्या फिरकी गोलंदाजांमध्ये जितकी आहे तितकी इंग्लंडच्या गोलंदाजीमध्ये नाही. त्यांचे द्रुतगती गोलंदाज चांगलेच आहेत पण त्यांच्या चांगल्या चेंडुवर आमचे फलंदाज बाद होत नाहीत तर नको त्या चेंडूत बॅटचे नाक खुपसून आत्महत्त्या करतात हे दुर्दैव! याला कारणे दोन, प्रथम हे की पुढच्या कसोटी सामन्याची निवड याकडे लागलेले डोळे समोरच्या चेंडूपुढे एकाग्र होत नाहीत! निर्भय होऊन चेंडू अडविणे अगर फटकावणे एक-दोघांचे अपवाद सोडल्यास दिसलेच नाही. दुसरे कारण एक फार महत्त्वाचे म्हणजे बेजबाबदारपणा. अत्यंत आणिबाणीच्या काळातही पहिल्या डावात दुराणी व आबिद अन् दुसऱ्या डावात इंजीनियर व्यर्थ बाद झाले. ही कर्तव्यहीनता इंग्लंडच्या फलंदाजीत नाही. बेदी व चंद्राचे फिरके, गुगली वा उडणारे चेंडू न टिपल्यानेच ते झेलबाद अगर पायचित होताना दिसले. बाद झाल्यावर दुःखाने परतताना दिसले. आम्ही अकरा खेळाडू साऱ्या देशाचे प्रति-

निश्चित्व करीत आहोत ही जाणीव हजारो मैल दूर जाऊनही त्यांच्यात आढळते पण घरात राहून ते कर्तेपण आमच्यात आढळत नाही, कुठल्याच क्षेत्रात आढळत नाही मग क्रिकेटच अपवाद का ?

## गोलंदाजी

फिरक्या गोलंदाजीत आम्ही आज विश्वश्रेष्ठ ! खरोखरीच, बेदी व चंद्रशेखर ह्यांचे चेंडू अडविणे किती घोर कठीण कर्म ह्याचे प्रात्यक्षिक पाहून गर्वाने छाती फुलली. फलंदाजाला बाद करून पटकाअखेर टाळ्यांच्या गजरात परतणारा घामेजलेला चंद्रशेखर कितीही निरखून पाहिला तरी निगर्वीच दिसतो. चंद्रासमोर इंग्लंडचे फलंदाज अक्षरशः 'लुनेटिक' ठरले आहेत. शेखर सदा स्मितहास्य राखून वावरतो पण बेदीचा निरहंकार थक्क करून सोडतो. चेंडु पुंगव- गडी बाद करून इतर खेळाडूंचे व लाँग ऑफ वर क्षेत्ररक्षण करताना जवळच्या प्रेक्षकांचे अभिनंदन 'मी काहीच केले नाही' अशा थंड चेहऱ्याने ज्यावर अहंकाराची तर अस्पष्टही रेखा नाही अन् विनयाचाही आव नाही भोगतो. गोलंदाजी व क्षेत्ररक्षणात क्षणोक्षणी त्याचा प्रामाणिक प्रयास व जोखिम बाळगण्याची जाण डोळ्यात भरते. अत्यंत पाताळयंत्री, बुद्धिवंत गोलंदाज पण प्रत्येक चेंडू फेकण्यापूर्वी तो कसा फेकावा याची योजना बेदी कधी करतो हेच उमगत नाही. प्रत्येक गोलंदाज चेंडू फेकण्यापूर्वी आपल्या धावरेषेवर क्षणभर थबकून चेंडू बोटात जमवून मग वेढा घेतो पण बेदी धावरेषेवरून फलंदाजाकडे तोंड फिरवताच एखाद्या महाकविच्या पद्यलयीत चेंडू फेकण्यासाठी धाव लागतो. बंगाली विशेषणाप्रमाणे खरोखरीच बेदी 'आश्चर्ज्ज' 'अशंभव' व 'चोमोत्कार' गोलंदाज !

इंग्लंड दलात अत्यंत अचुक गोलंदाज ग्रेग ! ओल्डही चांगलाच पण त्याच्या गोलंदाजीवर आमचे खेळाडू स्वतःच्या चुकांनी बाद झाले. अंडरवुड कितीही चांगला असला किंवा पुढे ठरला तरी आमच्या लेगस्पिनर्सची सर नाही व पोकॉकही प्रसन्नप्रमाणे मारक ऑफस्पिनर नाही.

## क्षेत्ररक्षण

'बाजीप्रभुंचे खिंड अडवणे' कुठेतरी वाचून, त्यापासून प्रेरणा घेऊन बॅरी वूड मैदानात उतरला आहे की काय अशी शंका येते. चेंडू रोखण्यासाठी अक्षरशः मरतो. विश्वनाथने पहिल्या डावात उजवीकडे कसून मारलेला चेंडू सीमारेषेकडे कधी पोहोचतो याकडे लागलेले १ लाख ४० हजार डोळे तो चेंडू बॅरी वूडच्या पोलादी पंजात अडकलेला पाहून 'ऊर्ध्व' दिशेला वळले. दुसऱ्या डावात फ्लेचरने घेतलेले ३ झेल कमालीचे. शिवाय ग्राऊंड फिल्डिंगमध्ये त्यांचा प्रत्येक खेळाडूच उत्तम ! आमच्याकडे दुराणी व प्रसन्न धावूच शकत नाहीत. आबिद अलीच्या जवळून चेंडू पळून गेल्यावर तो त्यासाठी सूर मारतो. फलंदाजाचा फळी उचलण्याचा पवित्रा पाहून त्याप्रमाणे उजवी अगर

डावीकडे वळून वेगवान चेंडूपर्यंत धावत जाऊन, नीट ओंजळीत धरून यष्टि-रक्षकाच्या हातात फेकणारे क्षेत्ररक्षक आमच्या संघात एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकेही नाहीत. मात्र कव्हरवर पारकरने पतौडीची जागा भरून काढली. गावस्कर, विश्वनाथ व बेदी आऊट फील्डवर चुका करीत नाहीत. इंजिनियर नॉटहून अजिबात उणा नाही. शेवटच्या दिवशी अति एक्साइटमेंटमुळे त्याचे यष्टिरक्षणाकडे पुरेसे ध्यान राहिले नाही. स्लिपमध्ये वाडेकर सदा सजग ! शेवटच्या दिवशी १०२ डिग्री तापातही डावीकडे शरीर झोकून एका हातात त्याने अंडरवुडचा घेतलेला झेल आजन्म डोळ्यासमोरून हलणार नाही. तो झेल व इंग्लंडचे गडी पटापट बाद होत असतानाही त्याचे विवेकशील आचरण ह्यामुळे तो बंगाल्यांच्या गळ्यातील ताईत ठरला. कर्णधार हिशेबाने वाडेकर व लुई तुल्यबळ. पण लुई नेहमीच काळजीग्रस्त दिसतो. गोलंदाजांना एका षटकात २–२ वेळा सूचना देतो, सारखे सारखे क्षेत्ररक्षण बदलतो, भारतीय फलंदाज बाद होताच हर्षातिरेकाने गोलंदाजाची पाठ थोपटतो. पण हा केवळ स्वभावातील फरक. लुई कर्णधार उत्तमच !

## टोनी ग्रेग

जगातल्या पहिल्या ५ सव्यसाची क्रिकेट खेळाडूंमध्ये नजिक भविष्यात गणना व्हावी या तोडीचा खेळाडू आहे टोनी ग्रेग. २६ वर्षांचा ६ फूट ७½ इंच उंचीचा दक्षिण आफ्रिकेत जन्मलेला ससेक्स व इंग्लंडचा हा खेळाडू एक वॅरेलचा अपवाद सोडला तर भारतीय प्रेक्षकांचा अत्यंत आवडीचा खेळाडू आहे. तो फलंदाजी करू लागला की 'हा गडी कधीच बाद होऊ शकणार नाही' असे वाटू लागते. ५ चेंडू सहज-तेने रोकून ६ व्याला लिलया चौकार फटकावणे, क्वचितच 'बीट' होणे, अत्यंत 'शॉर्ट' धाव घेणे व गोलंदाजांना त्राही त्राही करून सोडणे त्याला सहज साध्य झाले आहे. चंद्रशेखरचा चेंडू खेळताना तो फळी भूमीला टेकवून ठेवण्याऐवजी अधांतरी हलवीत रहातो ह्याचे कारण दिल्ली सामन्याची कॉमेंट्री ऐकताना जे कळले होते ते येथे प्रत्यक्ष पहाताना पटले नाही. शेखरची एकाग्रता भंग करण्यासाठी नव्हे तर त्याचा अगम्य, अचानक वर उसळणारा चेंडू चटकन खेळण्यासाठी त्याला तसा पवित्रा घ्यावा लागतो. त्याच्या अगडबंब उंची-मुळे टेकवून ठेवलेली फळी उचलून चेंडू सामोरी नेण्यात लागणारा वेळ बाद होण्यास मारक ठरेल हे जाणूनच तो फळी टेकवीत नसावा. पाचव्या दिवशी तो बाद झाल्यावरच सबंध भारताने सुटकेचा निश्वास सोडला. गोलंदाजीत तो अचूक असून कमीत कमी धावा देतो. दुसऱ्या डावात त्याने अवघ्या २४ धावा देऊन ५ गडी बाद केले. पैकी वाडेकर व प्रसन्न शून्य धावावर लगातार दोन चेंडूत. क्षेत्ररक्षणात त्याची चपलता पाहून त्याच्या उंचीचा विसर पडावा. 'चेंडू सोडेन पण वाकणार नाही.' ह्या बाण्याचे आमचे काही क्षेत्ररक्षक पाहिले

की ग्रेगचा लांबडा देह क्षणार्धात वाकतो कसा ह्याचे अतिशय आश्चर्य वाटते. सिलि पॉईंटवरून तो आमच्या बुटक्या फलंदाजांची पाठ थोपटून अंगाई गीत गाऊ शकतो व क्षणार्धात स्वत: पार जमिनीवर पडून चेंडू अडवू शकतो. प्रेक्षकांकडून रोज त्याला ४०–५० संत्री नारिंगी मिळत व त्यावदली तो नमाज पोजिशनमध्ये त्यांना सलाम करी! आमचे खेळाडूही त्याची मस्करी करीत. तोही पठ्ठा विनोदी! एकदा प्रसन्न गोलंदाजी करीत असताना त्याच्या हाताला इजा झाली. प्रसन्न ग्रेगला हात दाखवण्यास जाताच त्याने तंबूकडे इशारा करून प्रसन्नला परत जाण्याचा सल्ला दिला. अखेर त्या डावात प्रसन्ननेच त्याचा बळी घेतला. ग्रेग नियमाच्या बाबतीत फार काटेकोर! एक्स्ट्रा म्हणून क्षेत्ररक्षण करणारा वेंकट राघवन् क्लोज इनचा चांगला क्षेत्ररक्षक! पण तो फलंदाजाच्या जवळपासच्या जागेवर उभा राहू शकत नाही हे ग्रेगने पंचाला सांगून वेंकटला दूर पाठवले. अत्यंत खिलाडीवृत्तीचा निर्दोष खेळाडू ग्रेग आतापर्यंत इंग्लंड संघाचा एकखांबी तंबू ठरला आहे.

### एकनाथ सोलकर

ग्रेगविषयी भय व आदर बाळगूनही प्रेक्षक त्याच्याशी मस्करी करीत पण ज्याच्याविषयी नितांत आदर व विश्वास आमच्या क्रिकेट शौकिनांमध्ये आढळला त्याचे नाव एकनाथ सोलकर! श्री किशोर भिमानी सोलकरविषयी 'स्टेटसमन' मध्ये लिहीतात — " Many years from now, when Eknath Solkar is an old man and relating fireside stories to grand children he will begin, " and then I walked into this critical situation!" " Not that story again" the listeners will protest.

---

## सी. ए. बी.

आमच्या देशात सामाजिक जीवनामध्ये सर्वत्रच अज्ञ असामी उच्च स्थानावर चिकटवले जातात. राजनैतिक पुढारी मंचावरूनही आपल्या अज्ञानाची जाणीव करून देतात. मग क्रिकेट क्षेत्रातच पिछेहाट का? इतिहास भूगोलाच्या पाठ्यपुस्तकाप्रमाणेच क्रिकेट ॲसोसिएशन ऑफ बंगालच्या सोवनीरमध्ये चुका आहेतच. कृष्णमूर्ति म्हैसूरचा व चेतन चौहाण दिल्लीकडून खेळतो असे चक्क छापलेले पाहून विषाद वाटला. एखादा शाळकरी चेंडू फळीचा रसिकही 'सोवनीर' वाल्यांचे कान लपेटून छडीसाठी हात पुढे करायला सांगू शकतो. ■

# 'कुटुंब नियोजनाबद्दल'

## तुम्हांला सर्व माहिती आहे ?

पटले असेल तर, हा मजकूर वाचूं नका. परंतु माहिती असूनहि तिचा व्यवहारांत उपयोग न करणाऱ्यांपैकी तुम्ही असाल तर मात्र तुम्हांला हे वाचलेच पाहिजे.

थोडीशीच माहिती असल्यामुळे तिचा व्यावहारिक उपयोग करायला तुम्ही धजावत नसाल तर आम्हांला भेटा. तुमचे प्रश्न शंकाकुशंका, संघर्ष, सगळेच कांहीं-म्हणजेच तुम्हांला मदत करण्यासाठीच आम्ही बसलों आहोंत इथे.

डॉक्टर तुमच्या समस्या ऐकून घेतील. तुमच्या गरजेनुसार योग्य ते उपाय सुचवतील. कोणतेहि प्रश्न विचारा.




अधिक
जाणून घेऊ
इच्छिणाऱ्यांचे
आम्ही स्वागतच
करीत असतो

खरोखरीच, सोलकरवर नेहमीच सामना वाचवण्याचा दबाव पडतो ग्रेग प्रमाणेच सोलकरसुद्धा फलंदाजाहून ३ फूट अंतरावर उभा रहातो व एकही चेंडू सोडीत नाही. पहिल्या डावात त्याच जागेवर त्याने ३ झेल घेतले. पैकी एक तर फारच अवघड होता. हळुवार मनाच्या अतिरेकी बंगाली प्रेक्षकांनी जवळजवळ साऱ्याच भारतीय खेळाडूंना 'गालागाल' केली पण सोलकर विषयी नेहमीच प्रगाढ विश्वास दाखवला. इतका जबाबदारीने वावरणारा अजस्त्र क्षमतेचा खेळाडू या देशात दुसरा कोणीच आढळत नाही. विशेष म्हणजे देखावा अजिबात नाही. फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण सर्वकाही एखाद्या कर्मठ देवभक्ताप्रमाणे सोवळ्याने करतो सोलकर !

**बंगाली बाबू**

कलकत्त्यासारखा प्रेक्षकवर्ग जगात विरळा ! जीवनातील प्रत्येक क्षेत्रात अन्यायाविरूद्ध कंठशोष करणारा बंगाली बाबू क्रिकेटमध्येही चुका करणाऱ्यांना धारेवर धरतो. बंगाली शिव्यांमध्ये एक सोज्वळ शिवीच मला फार आवडली-- 'बाडी जा' म्हणजे घरी जा ! प्रसन्न व दुराणी त्यांचे आवडते खेळाडू. प्रसन्नची पत्नी बंगाली म्हणून सर्वच त्याला 'जामाई बाबू' म्हणत असत. पण दोघांनी प्रत्येकी एक-एक झेल सोडताच- 'बाडी जा'चा असा घोष उठला की दोघांनाही तंबूत परतावेच लागले. इडन गार्डन मैदानात चुका करणाऱ्याला क्षमा नाही. तेथे आवडतेही क्षणात नावडते होतात. टोनी लुईने अखेर म्हटलेच कि भारतीय खेळाडुंना प्रेक्षकांचे प्रोत्साहन कमालिचे लाभले.

ह्या प्रेक्षकांनाच ५ वर्षापूर्वी क्रिकेटपायी ६ जणांचे बळी द्यावे लागले. ह्या प्रेक्षकांपायी तिकिटांची लॉटरी, २॥ हजार पोलीस व क्रीडामंत्र्यांचे कार्यालय इडन गार्डवर होते. सामना संपल्यावर लाठी ऐवजी हात जोडण्याचा सक्त आदेश पोलीसांना देण्यात आला होता. असल्या समूहात मिळून सामना पहाण्याचा अनुभव इतरत्र लाभणे अशक्यच !

□ □ □

---


बारा
जाहीर
सवाल

अनिल
बर्वे

माणूस
२६ जानेवारी अंक

शतपावली

# शुभवर्तमान ७५

रवींद्र पिंगे

खांडेकरांबद्दल लिहिताना त्यांच्या रूपाने माणूसकीचा नंदादीप कोल्हापूरातल्या कोपऱ्यात शांतपणे तेवत आहे म्हणा, किंवा वास्तवता आणि ध्येयवाद ह्या दोन ध्रुवांना सांधणारी अमृतवेल त्यांच्या पावन रूपाने फुलते आहे, इत्यादी बिनबुडाचे भारुड गळा काढून लिहिलंच पाहिजे असा कायदा नाही. खांडेकरांचा हत्यारी हात गेली पन्नास वर्षं सतत लिहिता राहीला आहे, हे दहा शब्द लिहीले की त्यात त्यांच्या मर्दुमकीचं सारं मर्म आलं. जेमतेम वर्षभर लिहिलं तर जिथे दमछाक होते आणि 'पाणी-पाणी' म्हणून आक्रोश करावा लागतो, तिथे ह्या किरकोळ देहयष्टीच्या साधीजर्जर माणमानं अर्धशतकावर काळ आपली पेन्सील अखंड लिहिती कशी ठेवली असेल ? कुठल्या अंतस्थ प्रेरणेने त्यांचा आशावाद टवटवीत ठेवला ? शंभरावर पुस्तकं त्यांनी कशी लिहिली ? अगदी साधं सोप आहे : खांडेकर हे जन्मसिद्ध लेखक आहेत. आणि म्हणूनच ते इतका पल्ला गाठू शकले. तू संस्कारसंपन्न, शुचिर्भूत, शुभालंकृत लिहिशील, आणि कालप्रवाहातल्या ऐन मोक्यावरल्या एका वळणावर तुझ्या नावाचा शिलालेख कायमचा लिहिला जाईल असा आशीर्वाद देऊन नियतीने त्यांचं शीड गुपचूप उभारलं असेल. अशा आशीर्वादाचं ऐश्वर्य एखाद्याच्याच वाट्याला येतं. खांडेकरांच्या वाट्याला ते ओंजळी भर-भरून आलं आहे. अशा ऐश्वर्याचे काही नफे-तोटे असतात. नफा हा की, दुर्लभ अशा लाखो कृतज्ञ जीवांचं मन तुमच्यावर तुमच्या अलौकिक लेखनगुणांमुळे जडतं. ह्या ऐश्वर्याला माप नाही. तोटा हा की आपल्या विराट लोकप्रियतेला साजेसं मौल्यवान लेखन आपल्या हातून लिहून होत नाही ह्या रूखरूखीची जखम जन्मसिद्ध लेखकाच्या

काळजावर जन्मभर वाहाती रहाते. ह्या छळातून मुक्ती नाही. खांडेकर ह्या नफ्या-तोट्याचे धनी आहेत.

असो. झालं इतकं नमन खूप झालं !

आता मूळ विषयाकडे वळतो.

ऐश्वर्यमान खांडेकरांना कोल्हापूरात सगळेच लोक ओळखतातसं दिसलं. लॉजवाला म्हणाला 'खांडेकर म्हणता ना ? नाक्यावर विचारा म्हणजे कुणीही सांगील.' नाक्यावर गेलो. मंडई करून परतलेल्या एका माणसाला विचारलं, 'अहो, खांडेकर कुठे राहातात कल्पना आहे का ?' तो उत्साहाने म्हणाला, 'हॅंच्या ! साहित्यिक खांडेकर ना ? ते इथले मानकरी आहेत. तुम्ही असं करा राजारामपुरीतल्या सहाव्या गल्लीत जा नि कुणालाही विचारा. ते तुम्हाला खांडेकरांचा बंगला दाखवतील.' मी तरातरा राजारामपूरीतल्या सहाव्या गल्लीच्या तोंडावर गेलो. तिथे एका गृहस्थाला विचारलं. तो म्हणाला, 'तुम्हाला इकडं कुणी पाठवलं ? डोचकं फिरलं की काय त्याचं ? अहो, खांडेकर फार पूर्वी इथे राहायचे. आता



त्यांनी तिकडे दूर प्रतिभा नगरात बंगला बांधलाय. तिकडे जा.' बस पकडून मी गावाच्या दुसऱ्या टोकाला उमलत असलेल्या कोवळ्या करकरीत प्रतिभा नगरात गेलो रम्य परिसर. छोटी छोटी सुबक घरकुल मनाची खात्री झाली की खांडेकरांसारख्या प्रतिभावान कलावंतासाठीच हे छोटं प्रतिभा नगर आहे. थोडासा इकडे तिकडे फिरलो. पण रस्त्यावर माणसांची चाहूल लागेना ऊन मात्र टक्क पडलं होत. एक बसचा थांबा दिसला. तिथे एक नीटस तरुण स्त्री हातात वह्या घेऊन सोबतिणींबरोबर उभी होती. ही शिक्षिकाच असणार हे ताडलं. थेट तिलाच विचारलं, 'इथ खांडेकरांचा बंगला कुठला ?' तिने विचारलं,

'तुम्हाला लेखक खांडेकर पाहिजेत का? अहो, मग तुम्हाला इकडे कुणी पाठवलं? ते तिकडे दूर राजारामपुरीतल्या सहाव्या गल्लीत की हो राहातात!' मी चक्रावलो. विचारलं, 'मी तिकडूनच इकडे इतक्या दूर आलो! खांडेकर तिकडंच राहातात हे तुम्हाला नक्की माहीत आहे?'

"अगदी नक्की. मी त्यांची सून आहे!'

मी नरम आलो. त्यांनी अगत्याने नीट पत्ता सांगितला. राजारामपूरीत जायचं. पाचवी गल्ली विचारायची. गल्लीत एका बंगल्यावर घुमट दिसेल, ते बाबुराव पेंढारकरांचं घर. त्याच्या खाली 'नंदादीप' बंगला दिसेल. खांडेकर तिथेच असतात. तुम्ही केव्हाही जा. ते घरीच असतात.

'नंदादीप' बंगला. सुंदर एक मजली कोरं घर. समोर बगीचा. बंगल्यावर पाटी आहे, 'संध्याकाळी ६ ते ८ पर्यंत भेटावे.' नि मी तर टळटळीत दुपारी अनाहूतपणे हजर झालेला! जरा अवघडलो. बेल दाबली. तशी एक मुलगी दार उघडायला आली. ती खांडेकरांचीच लेक आहे हे तिच्या चेहेरेपट्टीने सांगितलं. म्हणाली, 'बसा. भाऊ स्नानाला गेले आहेत.' व्हरांड्यात बसलो. तिथून निरखता येईल तितका घराचा अंतर्भाग आणि समोवारचा परिसर पाहून घेतला. व्हरांड्याच्या जाळीवर 'g' हे इंग्रजी अक्षर वेलबुट्टीत गोवलंय असा संशय आला. कारण वि. स. खांडेकरांचं पाळण्यातलं नाव गणेश आहे. पुढे कॉलेजमध्ये असताना ते दत्तक गेले आणि मूळचे 'गणेश आत्माराम खांडेकर' दत्तक घरी 'विष्णु सखाराम खांडेकर' झाले. नंतर लक्षात आलं का मला तो केवळ भासच झाला होता. व्हरांड्याच्या जाळीवर निर्हेतुक नक्षी आहे. नाटकातल्या राजासाठी जशी मंचक पद्धतीची बैठक मढवलेली असते तशीच. पण साधी बैठक व्हरांड्यात होती. पाठी टेकायला लोड. तो खांडेकरांची गादी आहे हे कुणी सांगण्याची गरजच नाही. भिंतीवर कै. उषाताईंनी केलेलं जरीचं भरतकाम होतं. भरतकामात मध्ये श्रीदत्तात्रेयाचं चित्र होतं. एक गणपतीचं कॅलेंडर होतं. एक चांदीच्या लक्ष्मीची फ्रेम होती अभयदाता, विघ्नहर्ता गजानन आणि कृपादायी लक्ष्मी, हे त्रिकूट विज्ञाननिष्ठेचा संदेश सांगणाऱ्या खांडेकरांच्या पडवीवर कसं, अशी शंका चाटून गेली. पण मग लागलीच लक्षात आलं की गृहसजावटीच्या बाबतीत कर्त्या पुरुषाची काहीही डाळ शिजत नाही. घरातल्या बायका ते खातं आपल्या हातात घेतात. तोच हा प्रकार असावा. व्हरांड्यातल्या आतल्या अंगाला खांडेकरांची बैठक आहे. तिथे खूप कागदपत्र पडलेली होती. एक मेज होतं. ऐसपैस आराम खूर्ची होती. भला मोठा आरसा होता.

स्नान उरकून परतलेले भाऊसाहेब प्रथम त्या आरशात दिसले. किती वाळलेले दिसले! खमीसाच्या बटनासाठी ते टेबल रापीत होते. क्षणभर सुन्न वाटलं. जन्मभर आपल्या शरीने

समाजाचे पांग फेडीत आलेल्या आणि भ्रष्टाचाराच्या सावलीपासून सतत दूर असलेल्या ह्या ध्येयनिष्ठ कनवाळू विचारवंत माणसाची नियतीने अशी दशा-दशा करण्यात कोणता न्याय दाखविला? खांडेकरांचं लेखन कुणाला आवडो वा नावडो, त्याच्या सालंकृत पृष्ठभागाखालून मानवतेच्या प्रेमाचा आरस्पानी झरा झुळझुळत असतो, हे त्यांच्या शत्रूलासुद्धा एकदम मान्य व्हावं. त्यांची हुर्यो उडवता येईल असं एकही वर्म ज्ञात नाही. लेखन हे जणू त्यांचं व्रत आहे. तथापि, अनाकलनीय नियतीसमोर ह्या गोष्टी दर्यामे खसखस असाव्यात. नियतीला शुभाशुभाचा विवेक आणि विचार वर्ज्य आहे. चार फांसे खुळखुळवून ती तुमच्या पुढ्यात झुगारते. जे दान पुढ्यात पडेल तेच तुम्हाला अगतिकपणे स्विकाराव लागतं. त्याला पर्याय नाही.

भिंती, दरवाजे रापत रापत भाऊ व्हरांडातल्या बैठकीत आले. पाऊणशे वर्षे झाली तरी त्याची अंगकाठी अगदी डोलकाठीसारखी ताठ आहे. आवाज चिरका, पण खणखणीत आहे. ते साध्या धुवट्या लेंगा-शर्टातच आहेत. चष्म्याचं उजव्या डोळ्यावरचं भींग भुरकट काचेचं आहे. त्यांचा तो डोळा दहा वर्षांपूर्वीच्या शस्त्रक्रियेत पूर्ण निकामी झाला. डाव्या भिंगातून त्यांचा डावा डोळा रोखून तुमच्याकडे रोखून पाहातो. पण त्याही बुबळाला नजर नाही. भाऊंचे दोनही डोळे जाऊन त्यांची आता अंधारयात्रा सुरू झाली आहे. बैठकीत आल्या आल्याच ते म्हणाले, 'देवाच्या दरबारात असा काहीतरी न्याय पाहिजे की माणसाला आयुष्य संपावसं वाटलं की ते संपवता आलं पाहिजे. पण तशी काही व्यवस्था नाही हेच खरं. कारण, हे असं आयुष्य जगण्यात काय अर्थ आहे? मात्र माझ्या बहुतेक सगळ्या गोष्टी मीच करण्याची सवय जडवून घेतली आहे. नजर हरपली तरी मी फारसा परावलंबी नाही. घरातल्या नि अंगणातल्या सगळ्या परीसराला मी आता चांगलाच रुळलोय. मी एकट्यानेच रापत रापत वावर करतो. कारण माणसं अगदी आपली झाली तरी त्यांना आपण किती तोशीस द्यायची ह्याला काही मर्यादा हवी की नको? नि, हे दुखणं तर आता कायमचंच आहे. मागे मी आजारी पडलो तर ह्यांची अशीच धावपळ झाली. बरं माझी एक मुलगी भुजला तर दुसरी भोपाळला! माझ्या एका आजारात तर ती कुचबिहारला होती. त्यांनी इथे यायचं म्हणजे केवढा त्रास! बर, लेकीसुनांना त्यांच्या संसाराचे व्याप असतातच. तेव्हा उत्तम मार्ग म्हणजे आपले एकूण एक व्यवहार आपले आपणच आस्ते आस्ते उरकायचे. आणि माणसांना देहानी भेटण्याऐवजी मनाने भेटत राहायचं! देहाच्या भेटीपेक्षा मनाची भेट अधिक सुखद ठरते, हा माझा स्वानुभव आहे.'

ही त्यांची प्रस्तावना झाली. नंतर आपल्या आजारी प्रकृतीवरलं भाष्य आणि भाकीत त्यांनी पुढली सलग


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
SATHE
MALTex
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजीं॥

पंधरा मिनीटं केलं. मजा वाटली. आणि खिन्नही वाटलं. मजा अशासाठी की आपल्या आजारपणाचा इंच नि इंच त्यांच्या स्मरणात राहीला आहे. खिन्न अशासाठी वाटलं की प्रकृतीचं आरोग्य भाऊंना यथेच्छ लाभलं असतं तर त्यांनी केवढी तलवार मारली असती! गेला बाजार आणखी शंभर–सव्वाशे तरी पुस्तकं लिहून त्यांनी लाखो वाचकांना सुखाच्या चार घटका अधिक दिल्या असत्या!

भाऊ बोलू लागले.

'तुम्हाला माहीतच आहे की मी गेल्या शतकातला माणूस आहे! माझा जन्म १८९८ चा. सांगलीतला. कॉलेजमध्ये असताना मी दत्तक गेलो नि दत्तक वडिलांची शेतीवाडी राखण्यासाठी सावंतवाडीला आलो. त्यावेळी सावंतवाडीला मलेरीयाने पछाडलं होतं. साधा मलेरीया नव्हे; चांगला मॅलीग्नंट मलेरीया. ज्याला त्या मलेरीयाची लागण व्हायची त्याला दर चार दिवसाआड सपाटून हुडहुडी भरून चार-चारपर्यंत ताप यायचा. सावंतवाडीकर त्याला 'चौथरा' ताप म्हणायचे. त्याने माझा पिच्छा पुरवला. त्यानंतर मला ब्रॉन्कायटीस झाला. छातीचा नव्हे, तर पोटाचा! खूप उपाय केले पण गूण येईना. त्यावेळेला सावंतवाडीच्या मिशन हॉस्पिटलात डॉक्टर सत्राळकर होते. ते संशोधक वृत्तीचे होते. म्हणाले, 'तुमची व्याधी मोठी अजब आहे. आपण तुमचे पोट फाडूया म्हणजे पोटात काय होतंय ते आपल्याला समजेल. मी तयार झालो. महिनाभर ऑपरेशनसाठी रजासुद्धा घ्यायची ठरली. पण आमच्या हातून ज्ञानात भर पडायची नव्हती नं! कारण खुद्द डॉ. सत्राळकरच वारले नि पोट फाडून पहायचा प्रयोग बारगळला. मलेरीया, ब्रॉन्कायटीस झाले. नंतर पस्तीस वर्षांचा असताना मला कोकणात फुरसं चावलं. फुरश्याने मला सतत दहा वर्षं लोळवलं. सर्पदंशाचा ताप मला दहा वर्षं येत होता. अंगभर वीष पसरलं. पांढरे चट्टे पडले. त्यातून सावरलो न सावरलो तोच डोळ्यात मोतीबिंदू तयार झाले. अठरा वर्षांपूर्वी झाले. ते तयार होऊन एका डोळ्याचं ऑपरेशन दहा वर्षांपूर्वी केलं. ती शस्त्रक्रिया फसली. उजवा डोळा कायमचा गेला. नंतर रक्तदाबाचा विकार जडला. तो अजून मानगुटीवर आहेच. गेल्या वर्षी राहिलेल्या डाव्या डोळ्यावर शस्त्रक्रिया केली. तीही फसली. आता पूर्ण अंधत्व आलं आहे. माझ्या घराण्यात कुणालाही मधुमेह नव्हता. तरीही सध्या मला तो सुप्तावस्थेत आहे. रक्तदाब तर आहेच. आता मी एकाच गोष्टीवर चित्त जास्त काळ केंद्रीत करू शकत नाही. केलं रे केलं की डोकं जड होऊन भोंवळ येते. डॉक्टर म्हणतात, रक्तदाबात जरा चढउतार होतोयसं वाटलं की, ताबडतोब निपचित पडून शांतपणे विश्रांती घ्या. मी तशी घेतोही, कारण ब्लडप्रेशर वाढलं तर त्यातून पक्षघाताचा झटका येणं संभवनीय असतं. श्रीपाद कृष्णांना पक्षघाताचा झटका आला होता खाम-

गावला. मी बडोद्याला व्याख्यानाला निघालो होतो. इतक्यात निरोप मिळाला. मी सपत्नीक खामगावला गेलो आणि श्रीपाद कृष्णांची सेवा केली. हातभार लागावा म्हणून मुद्दामच बायकोला नेलं होतं. तेव्हा पक्षघाताच्या दुखण्यातली माणसाची असहायता मला नीट माहीत आहे. माणसाला परावलंबी करणारा तो रोग नको बुवा.'

नेमक्या ह्याच मोक्यावर भाऊसाहेबांना श्रीपाद कृष्णाबद्दल बोलायचा जबरदस्त उमाळा आला. कोल्हटकर आणि गडकरी हे त्यांचे गुरुद्वय. अगदी मनोमन मानलेले. भाऊ गुरुबद्दल नुसते बोलत नाहीत, तर चक्क गद्यभजन करतात. तहानभुकेचं भान पुरतं विसरून. मंत्र टाकल्यागत. जणू त्यांची ब्रह्मानंदी टाळी लागते. आपल्या गुरुद्वयाबद्दलच्या आठवणीत, पाकात मुरंब्याची फोड मुरावी तसे ते मुरून जातात. धबधब्याच्या धारेसारखं त्यांचं एकतर्फी वकिली बोलणं चालू असतं. आपण फक्त काठावर उभं राहून गंमत बघायची.

'राम गणेश गडकऱ्यांची ओळख होऊन त्यांनी मला लेखक होण्याच्या दिशेने माझी जी निरपेक्ष सांभाळणूक केली, जी दिशा दाखवली, त्याला तोड नाही. त्यावेळी मी कोण होतो? केवळ कविता करणारा एक विद्यार्थी आणि गडकरी होते नामांकीत नाटककार आणि कवि गोविंदाग्रज! मराठी कविता लोकप्रिय केली ती ह्या गोविंदाग्रजांनीच. अशा गोविंदाग्रजांनी मला मार्गदर्शन केलं. मी लहान म्हणून हिडीस फिडीस केलं नाही. माझ्या कविता त्यांनी वाचल्या नि माझ्याच कल्याणासाठी त्या फाडून टाकण्याचा चमत्कारीक सल्ला दिला. त्यांचा हेतू हाच होता की मी चढून जाऊ नये. मी गडकऱ्यांचा सल्ला शिरसावंद्य मानून माझी कवितेची वही फाडून टाकली. नंतरही मी कविता करीतच राहिलो. पण फारशा प्रसिद्ध केल्या नाहीत. कारण कविता हे आपलं क्षेत्र नाही हे मला उमगलं. माझं हे भाग्य आहे की माझ्या वडील पिढीने माझ्या पाठीवर प्रशंसेची थाप मारली. आमच्यावेळी वडील मंडळीची ती रीतच होती. एकदा गडकरी आणि मी रात्री उशीरापर्यंत बाहेर होतो. परततांना गडकरी म्हणाले, 'चल, आपण नाटकमंडळीत जाऊन जेऊ या.' तोपर्यंत नाटक-


संतवाङ्मयाची आधुनिक
दृष्टिकोनातून उकल
करणारे पुस्तक

किंमत : चार रुपये

**आस्तिक नास्तिक**
**॥ देवीदास बागूल ॥**

एकमेव विक्रेते : विश्वमोहिनी प्रकाशन : टिळक रोड पुणे ३०

मंडळीतली पंगत हे काय प्रकरण होतं मला माहीत नव्हतं. आम्ही गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडी गेलो. बालगंधर्व तिथे होतेच. त्यांच्याशी माझी ओळख करून देताना माझ्याविषयी गडकरी त्यांना म्हणाले, 'हा कोल्हटकरांच्या गादीचा वारस आहे!' कल्पना करा की माझा ऊर केव्हढा भरून आला असेल गडकऱ्यांचे हे शब्द ऐकून! १९१५ साली कोल्हापूरातलं पॅलेस थिएटर उघडलं त्याच्या उद्घाटनाच्या समारंभाची पदं गडकरी करणार होते. त्यांचा तो अधिकारच होता. पण गडकऱ्यांना ताप आला. तेव्हा ती पदं त्यांनी मला रचायला सांगितली. मी माझ्या कुवतीप्रमाणे पद रचून दिली. गडकऱ्यांनी त्यांच्यावरून हात फिरवला, दुरुस्ती सुचवली, वगैरे वगैरे. पण पहा गडकऱ्यांनी माझ्या लेखनगुणांबद्दल केवढा विश्वास दाखवला! मला त्यावेळी धन्य वाटलं. मात्र असं प्रेम लाभण्या पूर्वी गडकऱ्यांनी माझी कसून परिक्षा घेतलेली होती. 'वीरतनया'ची पदं म्हणून घेतली. पदांचा अर्थ विचारला. 'मतिविकार' आणि 'प्रेमसंन्यास' नाटकांची मी त्यांच्यासमोर तुलना केली. ते खूष झाले. मग त्यांनी माझ्याकडून 'विविधज्ञानविस्तारा'ची पुस्तकं वाचून घेतली. ह्या प्रेममूलक मशागतीतून माझ्यातला लेखक हळूहळू तयार होत होता. गडकरी प्रतिभावंतच. पण त्यांच्या प्रतिभेला आधारभूत जीवनसत्वं श्रीपाद कृष्णांकडून मिळाली.

गडकऱ्यांवर मी 'नवयुग' मासिकात लिहिलेला मृत्यूलेख वाचून कोल्हटकरांनी माझ्याविषयी चौकशी केली. त्यातून पत्रव्यवहार सुरू झाला. कोल्हटकरांचा स्वभाव विलक्षण मनस्वी होता. उतावीळ होता म्हणा. ते मे महिन्यात पुण्यात येत त्यावेळी ओळखीच्या प्रत्येक माणसाला भेटत. ती त्यांची मानसिक गरज होती. कोल्हटकरांचा पत्रव्यवहारही प्रचंड होता. ते नवीन, होतकरू लेखकांची लिखाणं लक्षपूर्वक वाचून दुरुस्त्या सुचवीत. आपण दुसऱ्याचं काहीतरी लागतो ह्याचं त्यांना सतत भान असायचं. त्यांच्या भोवतीही सतत नवीन लेखकांचं कडं असायचं. पुण्यात प्रथम ते केळकरांकडे उतरायचे. त्या दोघांनाही एकमेकांविषयी विलक्षण प्रेम होतं. कोल्हटकरांबरोबर मीही केळकरांकडे चांगला महिना–दीड–दीड महिना राहीलेलो आहे. पुण्याला सत्तावीस साली जे साहित्य संमेलन झालं त्याचे कोल्हटकर अध्यक्ष होते. स्वागताध्यक्ष होते केळकर. तेव्हा आम्ही शिष्य मंडळी कोल्हटकरांसमवेत केळकरांकडेच उतरलो. केळकरांनीच पत्र लिहून कोल्हटकरांना कळवलं की तुमचे खांडेकरही माझ्याच बिऱ्हाडी उतरूद्यात. पुढे त्याच मुक्कामात किरकोळ गैरसमज होऊन कोल्हटकर–केळकरांचं बिनसल. कोल्हटकर दुसरीकडे राहायला गेले. मी मात्र केळकरांकडेच राहिलो. पुढे कोल्हटकर पुण्याला आले की दुसरीकडे मुक्काम करीत पण प्रत्येक भेटीत केळकरांच्या घरी जाऊन सौ. केळकरांची जातीने

पृष्ठ ५३ वर

# आ ले पा क

■ काही दिवसांपूर्वी ‘ मातीची चूल ’ हे आनंद साधले यांचे आत्मचरित्र आम्ही वाचले. त्यानंतर परवा ‘ सत्यकथे ’च्या डिसेंबरच्या अंकातला आनंद साधल्यांचा ‘ आत्मचरित्राविषयी काही विचार ’ हा लेख (कसाबसा) वाचला. साधल्यांच्या या दोन लेखनकृतींवरून आमच्या असे लक्षात आले की, सत्य सत्य म्हणून ज्याला म्हणतात ना, त्याचे दोन प्रकार असतात : एक साधं सत्य; आणि दुसरं साधलेलं सत्य. हे दुसरं सत्य ‘ चुली ’त घातलेलं आहे.

■ सध्याचे इंदिरा गांधींचे सरकार १८ महिन्यात कोसळेल असे भविष्य मोरारजी देसाईंनी केले आहे. त्याला पुस्ती जोडताना ते म्हणाले : माझा राजकीय अंदाज चुकण्याची शक्यता असली तरी तो चुकेल असे मला मात्र वाटत नाही.

उलटपक्षी मोरारजींचा हा राजकीय अंदाज बरोबर ठरण्याची शक्यता असली तरी तो बरोबर ठरेल असे मात्र आम्हाला वाटत नाही.

■ कलकत्त्यातील बिधननगरात भरलेल्या ७४ व्या काँग्रेस अधिवेशनात पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणाल्या : गेल्या पंचवीस वर्षांत आपण अनेक चढउतार, जयापजय अनुभवले. मात्र एक गोष्ट सतत कायम राहिली.

मध्यवर्ती काँग्रेस सरकार !

■ आपल्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी तुर्कस्थानातील स्त्रियांनी खास स्त्रियांचा एक वेगळा पक्ष काढला आहे.

या पक्षातही तरुण तुर्किणी आणि म्हाताऱ्या तुर्किणी असणारच की.

■ एक बातमी : दारूच्या नशेत मरण पावलेल्या एका इसमाची शवचिकित्सा केली असता त्याच्या पोटातून बादलीभर दारू बाहेर पडली.

म्हणजे पठ्ठ्याने मेल्यावरसुद्धा थोडी घेतली असणार.

■ मातृभाषा संस्कृत असणारे दोन हजार दोनशे बारा लोक भारतात आहेत.

आधी यांची गणना मुक्या लोकांतच केली होती म्हणे.

■ ‘ वाहतो ही दुर्वांची जुडी ’ या नाटकाच्या आठशेव्या प्रयोगाच्या वेळी केलेल्या आभारप्रदर्शक भाषणात बाळ कोल्हटकर म्हणाले : कोणी म्हणतात नाटक चांगले असते म्हणून चालते; कोणी म्हणतात ते कलावंतांमुळे चालते; कोणी म्हणतात शिव्यांमुळे चालते; मला वाटते संघटना चांगली असली तर

नाटक चालते.

साफ चूक. प्रेक्षक चालवून घतात म्हणून नाटक चालते, छोटे बाळकराम.

■ १९५१–६१ या दरम्यान भारताची लोकसंख्या २१·६४ टक्क्यांनी वाढली तर १९६१–७१ या दशकात ती २४·८० टक्क्यांनी वाढली.

कुटुंबनियोजनाचा प्रचार बरं हा !

■ अमेरिकेतील तज्ज्ञ डॉक्टरांचे मत असे आहे की अस्पिरिनसारखी पेटंट औषधे वापरून पडसे बंद होण्यापेक्षा कोंबडीच्या पिलांचा गरमागरम रस्सा खाल्ल्यास थंडीपडसे लौकर बरे होते.

मी एक बारीकशी तज्ज्ञ सुधारणा सुचवतो : रश्श्यात घालण्यापूर्वी कोंबडीच्या पिलांना तेवढे अ‍ॅस्पिरिन घालावे.

■ सत्यदेव दुबे यांनी विजय तेंडुलकरांच्या 'सखाराम बाईंडर' नाटकावरून चित्रपट काढायचे ठरवले आहे.

आता, विशिष्ट प्रसंगी, पडद्यावर अंधार पाडण्याची गरज भासणार नाही; थिएटरमध्ये अंधार असला म्हणजे झाले.

■ एके ठिकाणी वाचले : नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ पाहू नये अशी एक फार जुनी म्हण आहे, ती आता सोडून दिली पाहिजे.

अगदी सोडून कशाला द्यायची ? तपशिलात बदल करा आणि नवी म्हण बनवा : मराठी नाटकाचं मूळ आणि सुंदर मुलीचं कूळ पाहू नये !

■ रविवार दि. २४ डिसेंबरच्या 'केसरी'त लिहिलेल्या 'माओचे ते पत्र' या लेखावर प्रभाकर पाध्ये म्हणतात : माओच्या अनेक विचारांचा आणि धोरणांचा मी चाहता आहे.

माझी एक चिनी मैत्रिण चिंग-लिंग-टिंग-टिंग सांगत होती, माओसुद्धा प्रभाकर पाध्यांच्या लिखाणाचा चाहता आहे.

■ एका अग्रलेखात म्हटले आहे : चार भांडी एकत्र आली की ती एकमेकांवर आदळावी त्याप्रमाणे चार समाजवादी नेते एकत्र आले की ते एकमेकांशी भांडतात.

भांडणासाठी चार समाजवादी नेते एकत्र कशाला यायला हवे ? प्रत्येक समाजवादी नेत्याचे म्हणे स्वतःशीच अखंड भांडण चालू असते !

■ पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा पराजय झाला.

त्यात विशेष ते काय ? नाहीतरी तो भारताचा 'ब' संघ होता.

■ राजधानीच्या अंतरंगातून एक पत्रकार लिहितात : पंतप्रधानांच्या मुलाने धंदा करू नये असे कोणी म्हणणार नाही.

त्याने धंदा करावा, असे तरी कोण म्हणेल हो ?

■ मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणाले :

संस्था चालवणे फार कठीण असते. कारण काम करणाऱ्या माणसाचे लोक सारखे दोषच शोधत असतात. काम करणाऱ्यांचे दोष शोधण्याचा महाराष्ट्राचा तर पहिला नंबर आहे !

एरवी, महाराष्ट्र बुद्धीवादी आहे हे कोणाला कसे पटले असते ?

■ सी. सुब्रह्मण्यम लोकसभेत म्हणाले : कोका-कोला पिऊ नका. कोका-कोला बंद होणे देशहिताचे आहे □

## नाडलेला रशियन लेखक

' माणूस 'च्या २४ डिसेंबरच्या अंकात ' विकली जाणारी भारतीय माणसे ' हा लेख आहे. त्यात मॉस्को नभोवाणीवर चाकरी करणाऱ्या कोणा नरेंद्र सिदकरांच्या महाराष्ट्र भेटीचा वृत्तान्त आणि लेखिकेची सात्त्विक संतापयुक्त टीकाटिप्पणी आहे. रशियात सारे कसे छान आहे, तेथील वातावरणात माणूस विचारसुद्धा करायचे कसे विसरून जातो, हे म्हणे सिदकरांनी आळवून आळवून सांगितले. आता असे बोलणाऱ्या माणसाला कोणी प्रश्न कशाला विचारायचे ? पण महाराष्ट्रातल्या भारतीय नागरिकाला दुसऱ्यांना नको ते प्रश्न विचारण्याची खत्रुड आदत आहे. त्यातल्या कोणीतरी सिदकरांना सोल्झेनित्सिन या विख्यात रशियन लेखकाच्या ' कॅन्सर वॉर्ड ' या नोबेल पारितोषिक विजेत्या कादंबरीचा संदर्भ देऊन लेखकाच्या आविष्कारस्वातंत्र्याविषयीचा प्रश्न विचारला आणि स्वतःला सोव्हिएत ' नागरिक म्हणवणाऱ्या सिदकरांची धांदल झाली

' माणूस 'मधील प्रस्तुत लेख वाचला त्याच सुमारास उपरिनिर्दिष्ट ' कॅन्सर वॉर्ड ' कर्त्या सोल्झेनित्सिनबद्दल वर्तमानपत्रातून एक बातमी प्रसृत झाली. ' माणूस 'च्या वाचकांना ती उद्बोधक वाटेल.

अलेक्झांडर सोल्झेनित्सिनने नुकतेच एक निवेदन पत्रकारापर्यंत पोचवले : आपली आर्थिक परिस्थिती अत्यत बिकट झाली असून एका अमेरिकन कादंबरीकाराने देऊ केलेली मदत कर्जाऊ म्हणून स्वीकारण्याची आपली तयारी आहे, असे त्या निवेदनात म्हटले आहे.

या उदार अमेरिकन कादंबरीकाराचे नाव आहे आल्बर्ट माल्त्झ. त्याच्या पुस्तकांचे रशियन भाषेत अनुवाद झाले आहेत. या अनुवादापासून रशियन चलनात मिळणारे मानधन त्याने नाडलेल्या सोल्झेनित्सिनला देऊ केले आहे. माल्त्झच्या दातृत्वाने सोल्झेनित्सिन भारावून गेला आहे. या एकूण प्रकरणाबद्दल तो म्हणतो : माझी परिस्थिती मोठी अवघड झाली आहे. अशी मदत घेणे बरे वाटत नाही. तरीही, परिस्थितीकडे पाहून, ही मदत कर्जाऊ म्हणून घ्यावी आणि शक्य होईल तेव्हा तिची परत फेड करावी, असा माझा विचार आहे. पण सोव्हिएत प्रकाशनसंस्था आणि लेखकसघटना ही कल्पना प्रत्यक्षात येऊ देणार नाहीत, हे मला पक्के माहीत झाले आहे.

कारण कॉम्रेड सोल्झेनित्सिन नाडलेले आहेत असे रशियाला वाटतच

नाही. सोव्हिएत सांस्कृतिक खात्याच्या मंत्राणी महोदया येकातेरिना फुर्त्सेवांच्या मते सोलझेनित्सिन चांगले खाऊनपिऊन सुखी आहेत; त्यांनी आणखी एक मोटार नुकतीच खरेदी केली आहे; त्यांना मदतीची मुळीच गरज नाही.

या प्रकरणात सत्य कोणाच्या बाजूला आहे, असा प्रश्न तुमच्या-माझ्या मनांत सहजच आला असेल. रशियन मनात असा प्रश्न येऊच शकत नाही; कारण रशियात सत्याला एकच बाजू असते. तुमच्या-माझ्या मनातला प्रश्न असा: अलेक्झांडर सोलझेनित्सिनची बिकट आर्थिक परिस्थिती खरी मानायची, की हे सारेच अमेरिकन प्रचारयंत्रणेचे भारुड मानायचे? ◻

## एक नजिकचे भाकित

भाकिते वर्तवणे हा काही चळवळया लोकांचा मोठा लाडका छंद असतो. या छंदाची उपेक्षा कधी होत नाही. तुमच्या-माझ्यासारखी धट्टीकट्टी माणसे कोणा अनामिकाने वर्तवलेली रम्य-रुक्ष भाकिते खरी वा खोटी ठरण्याची खुळ्यासारखी वाट पाहतो. पुढे, ओंजळीतून पाणी गळून जावे तशी, ती भाकिते आपण विसरूनही जातो; नव्या भाकितात मन गुंतवतो. यापैकी काही भाकितांचा तुमच्यामाझ्या थोडक्या शंभर वर्षांच्या मर्यादित कारकीर्दीशी काही संबंध नसतो: ती भाकिते तीनचारशे वर्षांनंतर काय होणार, युगान्तसमयी काय घडणार हे सांगत असतात.

अमेरिकेतील एका भूगर्भशास्त्राने वर्तवलेले एक भाकित मात्र वर निर्देशिलेल्या वर्गातील नाही. हे भाकित आहे रविवार दिनांक १४ जानेवारी १९७३ या दिवसाबद्दलचे. त्याच्या मते या दिवशी सकाळी ठीक नऊ वाजता अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिस्को शहराला भूकंपाचा जबरदस्त धक्का बसणार आहे. सॅनफ्रॅन्सिस्को हे काही एखादे बुद्रुक खेडे नाही. अमेरिकेतले ते एक अत्यंत उकललेले महानगर आहे; उद्योगधंद्याचे आणि विद्येचे माहेरघर आहे.

सॅनफ्रॅन्सिस्कोला त्या भाकितामुळे काय वाटले असेल? माझा अंदाज असा होता की विज्ञानाने धुंदावलेले हे महानगर त्या फालतु भाकिताकडे तुच्छतेने दुर्लक्ष करील. पण तसे घडले नाही. म्हणजे त्या महानगरात अगदी आकान्त माजला असे नाही. तसे या अजस्त्र महानगराचे व्यवहार अगदी व्यवस्थित चाललेले आहेत. पण त्याच्या पोटात मात्र थोडीशी बाकबुक होते आहे.

कारण, एक तर, सॅनफ्रॅन्सिस्को नुकताच जेथे भूकंपाने हलकल्लोळ उडवला त्या निकाराग्वाजवळ आहे; आणि दुसरे म्हणजे, या भाकित भास्कराने म्हणे यापूर्वी अॅझोरेस, इराण आणि भारत या स्थळी झालेल्या भूकंपांची भाकिते अचूक आणि कंपोकंप (ततोतंत-प्रमाणे) वर्तवली होती.

भारतात घडलेल्या या भूकंपाची आपल्याला काही माहिती नाही. पण एक गोष्ट करू शकतो आपण. रविवार दिनांक १४ जानेवारी १९७३ पर्यंत धीर धरू आणि मगच भारतात भूकंप झाला होता की नाही ते निर्णायकपणे ठरवू.

◻ ◻ ◻

मानखुर्दला जमलेल्या
४१२२ मुलामुलींच्या

# मेळाव्यात

रंगनाथ कुलकर्णी

चित्रकार नागेश हटकर यांनी सुंदर उपयोग करून घेतलेले चिचेचे झाड उजव्या बाजूला, डाव्या बाजूला साध्या लाँगक्लॉथवर फक्त काळ्यारंगात काढलेला बॅ. नाथ पै यांचा विलक्षण बोलका प्रोफाइल...

मानखुर्द (मुंबई) येथील कुमुद विद्यामंदिरात भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय 'आंतरभारती कुमार-युवक मीलन' मेळाव्याच्या प्रवेशद्वाराचे हे अत्यंत साधे, पण तितकेच ठसठशीत दृश्य.

'जोडो भारत!' घोषणा घेऊन जम्मू-काश्मीरपासून केरळपर्यंतचे ४१२२ युवक-युवती कुमारी-कुमार लहान लहान राहुट्यातून इथे तीन दिवस तळ ठोकून राहिले होते –आणि

'भिन्नतामें अभिन्न आज गाये आरती
लक्ष हस्त, लक्षपाद, हृदय एक भारती'

हे गीत परिसरात घुमवीत होते.

पार्श्वभागी अद्ययावत् तुर्भेचा अणुशक्ती प्रकल्प, टेकड्यांच्या नैसर्गिक खोबणीत, ठाणेखाडीवर बांधलेल्या नव्या पुलावरून पाहिल्यास नजरेच्या टप्प्यात १४ भारतीय भाषेतून संवाद झडत होते.

"नमस्कार! कसं आहे?"
बिलकुल ठीक!"
"तोमार नाम की?"
"म्हारो नाम –– है जी!"
"आप कहाँ रहते हैं?"
"हुं बंबईमां रहु छु"

जमलेल्या मेळाव्यात निम्मी मुले, निम्म्या मुली होत्या. निम्मे युवक युवक, निम्मे कुमार! महाराष्ट्राच्या नंतर गुजरातमधून सर्वात जास्त –१४० जण आले होते. परप्रांतातून आलेल्यांची एकूण संख्या ५५० च्या जवळपास होती. खुद्द महाराष्ट्रात धुळे जिल्ह्यातून ६०० एवढ्या मोठ्या संख्येने कुमार-युवक आले होते, तर कोल्हापूरने ५०० चा जथा धाडला होता!

गेल्यावर्षी बांगला देशच्या मुक्ती युद्धानंतर धुळ्याला राष्ट्रसेवादलाचा

मेळावा भरला होता. सबंध देशभर वातावरणात वेगळेच चैतन्य होते. शिवाय वॅ. नाथ पै यांच्यासारखा तडफदार नेता! 'त्यांनी सारे वातावरण भारून टाकले होते. श्री. बापू देशपांडे पोटातून बोलत होते.' आज ते नाहीत!'

स्वागत-कक्षात यदुनाथ थत्ते भेटले. भोपाळहून आलेल्या एका मध्यमवयीन भगिनींशी ते बोलत बसले होते. माझी त्यांची बातचीत चालू असतानाच केरळमध्ये एप्रिल १५ पासून पंधरा दिवस भरणाऱ्या आगामी मेळाव्याची योजना आखली जात होती.

'अशा शिबिरांना पाठवायच्या युवकांची आधीच पुष्कळशी पूर्वतयारी करून घ्यायला हवी –'

थत्त्यांच्या बोलण्यातली कार्यनिष्ठा सहज पटणारी होती. साने गुरुजींनी पाहिलेलं हे आंतरभारतीचं स्वप्न! ते साकार व्हाव म्हणून धडपडणारी ही त्यांची मुलं!!

—पण आता मोठी झालेली ही माणसं – काल आनंदमेळयात तोंडावर मुखवटे घालून – अगदी साने गुरुजींच्या एका गाण्यातल्याप्रमाणे —

"मुलात मूल"

होऊन बाल-बालिकांच्या निर्व्याज सान्निध्यातला निर्मळ आनंद लुटीत होते...

भाल कोरगावर सांगत होते.

शिबिराचा फेरफटका मारायला बाहेर पडलो तो गुलबर्ग्याचे डॉक्टर देऊळगावकर भेटले...आणि जुन्या, रम्य आठवणी उचंबळून आल्या—

१९३७–३८ साली अहमदनगरला आम्ही राष्ट्रसेवादलाची एक शाखा चालवीत असू...नगरच्या आयुर्वेद महाविद्यालयात शिकणारे जोग, देऊळगावकर...३७ साली काँग्रेसने निवडणूक जिंकली. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर नगरला आले होते. त्या प्रचंड मेळाव्यात मी 'वंदे मातरम्' म्हटले होते... माझ्यासारख्या लुकड्या शाळकरी मुलाच्या खांद्यावर हात ठेवून रावसाहेब पटवर्धन वाद घालायचे...

आठवणींचे मोहोळ उठले.

४० सालच्या पुण्याच्या काँग्रेसहाऊसमध्ये एसेमनी भरवलेला सेवादलाचा कॅम्प. त्यातले ते दाबके, नाना डेंगळे प्रकृती शिक्षक...

मानखुर्दला नाना भेटले नाहीत. दिवाकर आगाशे दिल्लीला गेले होते. कुमुद विद्यामंदिराचे संचालक पाटील यदुनाथांच्या भाषेत:

'ते नेहमी — इथेही अंडर ग्राउंड असतात!'

भोजन-कक्षाला वळसा घालून मैदानाकडे निघालो तो कोपऱ्यावर शिरुभाऊ लिमये —

'शहरातला धट्टयाकट्टयांना आठ किलो धान्य आणि काबाडकष्ट उपसणाऱ्यांना तीन साडेतीन किलो...आम्ही शहरभागातून पांढरपेशांच्या सह्या घेणार आहोत. आमच्या कार्डावरचा किमान अर्धाएक किलो तरी दुष्काळग्रस्तांना द्या–'

शिरुभाऊंची तळमळ सच्ची आहे... पण अशा कळकळीनं जमवलेलं धान्य थेट दुष्काळग्रस्तांपर्यंत वेळेवर पोच-

विणारी सच्ची यंत्रणा सरकारजवळ आहे का? व्यापारी याच धान्याचा काळाबाजार करणार नाहीत याची हमी कोण देणार?

मी अस्वस्थ होतो.

समोरून एसेम अण्णा येतात चेहरा व्यग्र, व्यस्त . फक्त नमस्कार झडतात.

माझ्या मनातले प्रश्न माझ्या चेहऱ्यावर उमटले असतील का? अण्णांना या किंवा असल्याच प्रश्नांनी त्रस्त केले असेल का?

"एका टेबलापाशी बसून बोलू या" वासू देशपांडेसारखा दुर्मिळ असा सरळ मनाचा कार्यकर्ता आस्थेने मला एका कक्षात घेऊन जातो.

माझ्या आधीच तिथं आकाशवाणीचे केळकर आणि दुरचित्रवाणीचे विनय घुमाळे आलेले असतात. दोन बंगाली मुलींची मुलाखत ते ध्वनिमुद्रित करतात.

'आमि बांगला किचु किचु जानी'

इतपतच माझं बंगालीचं ज्ञान-किंवा अज्ञान त्यांना दाखवण्याची संधी मिळायच्या आतच आम्ही पुढं सरकतो.

'भावी कार्याविषयी काय?'

'दत्ता सावळे यांचा प्रबंध वाचा–'

शिबिराच्या पहिल्या दिवशी रात्री सेवादलाच्या ४० पूर्णवेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा नानासाहेब गोरे यांच्या हस्ते सत्कार झाला. दुसऱ्या दिवशी रात्री पु. ल. देशपाडयांनी धाडसी युवकांचा गौरव केला. शनिवारी समारोपानंतर सेवादल कलापथकाचा 'भारत दर्शन 'चा कार्यक्रम झाला. ◻

## समाजवादी शिक्षण व नवी मूल्यव्यवस्था

आज व्यक्तीचे आपल्याच व्यक्तित्वाशी असलेले संबंध विकृत बनले आहेत...मूल्यव्यवस्था बदलल्या शिवाय मानवी प्रगती अशक्य आहे......इतिहासाला मानवी करण्यासाठी समाजवाद ही विचारसरणी आहे–'

Socialist society is a society in which full and free development of each individual become the ruling principle'

'नफ्यासाठी उत्पादन ही व्यवस्थाच मुळी अंतर्विरोधी आहे. नफ्यासाठी उत्पादन नव्हे, तर मानवी गरजेसाठी उत्पादन हे समाजवादाचे उद्दिष्ट आहे. उत्पादन ही सामाजिक गरज मानली गेल्यास–

Bored at work and restless at play ही दुरवस्था नष्ट होऊ शकेल'.

'विसाव्या शतकात योग्य नागरिक नव्हे, तर Commercially यशस्वी माणूस बनणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होऊन बसले आहे...समृद्ध जीवनाची पूर्व तयारी हे उद्दिष्ट मागे पडले–'

'Schools grade, therefore, they degrade. They make the degraded accept his own submission.'

'शिक्षणाचे उद्दिष्ट नुसते manpower न रहाता manhood झाले पाहिजे–'

'भारतातील जातिप्रथेने पोसलेली आणखी एक भयानक विषमता म्हणजे बहुसंख्य लोकांना केलेली ज्ञानबंदी... आपल्या समाजाच्या गतिसद्धतेचे हेच प्रमुख कारण आहे.'

'समाजवादी शिक्षण बंडखोरीचे शिक्षण हवे. या दृष्टीने महात्मा फुल्यांचे कार्य त्याच तळमळीने पुढे चालवायला हवे.'

'आपल्या देशातील विद्यापिठांमधील वातावरण हे सरंजामशाही युगातील वाटते. बौद्धिक गुलामगिरीने ते सत्ताबाजांच्या दादागिरीचे अड्डे बनले आहेत. विद्वानांची लाचारी ही भयंकर स्थिती आहे. नुसत्या चौकटी नव्हेत, तर नव्या मूल्यांचा स्वीकार व्हायला हवा'

शिबिरात जमलेल्या समविचारी समाजवादी कार्यकर्त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी हे एक 'त्रोटक टाचण' या नम्र भावनेने दत्ता सावळे यांनी हा निबंध सादर केला होता.

स्थूलमानाने वर दिलेले विचार मेळाव्याबाहेरच्या विचारवंतांनी देखील मनन करण्याजोगे नाहीत काय?

मेळाव्यात १४ अंध मुलांनी भाग घेतला. डोळस मंडळींनी त्यांच्याबरोबर गाणी म्हटली. पोवाडे म्हटले सामूहिक जीवनाचा रंग त्या अंधांनी अंतःकरणात मनोभावे साठवून घेतला असला पाहिजे. □

## उजाडले, पण सूर्य कुठे आहे?

धुळ्याहून आलेल्या ६०० जणांच्या जथ्यात काही आदिवासी युवक होते. भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात भरलेल्या या मेळाव्याला त्यांनी अगत्याने हजेरी लावून समाजवादी समाजाची स्वप्ने पहाणाऱ्या सर्वांना एक मर्मभेदी प्रश्न त्यांनी विचारला.

'स्वातंत्र्य आले, पण त्याचा प्रकाश आम्हाला का दिसत नाही?'

स्वातंत्र्याचे फलित काय? ते कुणापर्यंत पोचले?

ह्या यक्षप्रश्नांना उत्तरे द्यायची कुणी?

पण हे प्रश्न सातपुड्यातल्या सर्व आदिवासींच्या वतीने मानखुर्द शिबिरात घुसले, हीच या मेळाव्याची यशस्विता!

अन्यथा—

'विरोध क्रोधभी तुम्हें न रोक दे
गजान्त पूँजियाँ तुम्हें न मोह ले
विपत्ती हो सदा गिनो न, बढे चलो
सदैव सैनिकों चलो बढे चलो॥'

हे गीत फक्त सदाशिव पेठेतल्या पंताच्या गोटात, वा शिवाजी पार्क जवळच्या एखाद्या कॉसलेनमधेच घुमत राहून काय फायदा?

□ □ □



माझ्यासमोरच्या खिडक्या उजळल्या आहेत. अजून मी त्या उघडलेल्या नाहीत, परंतु फटीमधून पहाटेचा प्रसन्न उजेड भरून राहिला आहे. दूध आणायला निघालेल्या कुणाच्यातरी हातातल्या बाटल्यांची किणकिण ऐकू येते. स्वयंप्रेरिकांचे गुरगुरणेही अधून-मधून कानावर येते. चिमण्यांचा कोलाहल पानावेलींची दाट नक्षी मांडवावर चढावी, तसा मनावर चढून राहिला आहे. वडील बंधूंच्या नवजात चिरंजिवांचे तांब्याची बारीक तार काढल्या-

सारख्या आवाजातील रडणे ऐकू येते आहे. मजेत रडतो आहे कारटा !

वेळ सर्वत्र उजेड-उत्सवाची आहे, माझ्या मनात मात्र पाण्यावर हलकेच डुलल्यासारखी सावल्यांची छाया आहे. किती खोल आहेत, कोण जाणे. लिहू निघालो आहे ही एक सत्यकथा. काहीशी माझ्यासमोरच घडलेली. — कदाचित् अद्यापि अपुरीही असेल, कारण सत्य पहाण्याची माझी छाती नाही. असू द्या, आपण थोडी कल्पनाही करू ! आणखी एक गोष्ट. आपणा सर्वांच्या सदिच्छा मी गृहीत धरतो. काय ? कदाचित् ही सत्यकथा सुखान्तिक होण्यास त्यांचाही हातभार लागेल. मंजूर ? तेव्हा आता, कथा सुरू करू पावले जरा भराभर उचलली पाहिजेत, नाही ?

पावले उचलली पाहिजेत !

मनस्विनीने पावले उचलली. त्या आले, ' बहारों ! फूल बरसाओ '——

मनस्विनीने मंदपणे मान वळविली. होय, ते तिचे अत्यंत आवडते गाणे होते, आणि या क्षणी तिला कौल दिल्यासारखे ते स्वर आधार देऊ आले होते.

बेलचा आवाज लहरत आला, आणि खानसाहेबांनी दार उघडले.

त्यांच्या सन्मुख ही स्त्री उभी होती. तरुण. तिला रूप आहे——आणि ते फडा उचललेल्या नागासारखे आहे. ' या ' म्हटल्याशिवाय ती पुढे येणार नाही. आणि होय, ती ' हिंदू ' दिसत होती ! ——खानसाहेबांना हसू आले. ते त्यांच्या लांब, शुभ्र दाढीवरून ठिबकले. हालचालीतून सांडले. प्रसन्नपणे म्हणाले, ' ये ना बेटी ! '

ती चौकटीतून पुढे आली, तेव्हा चौकट रिकामी झाल्यासारखे वाटले. आसनावर बसून ती बोलली, ' माझ्या

अरुण
इनामदार

# ‘बहारों फूल बरसाओऽऽ’

डगडगत्या कठड्याला अधूनमधून स्पर्श करीत ती पायऱ्या चढून गेली, आणि तिने बेलवर बोट टेकले ——बोट मागे घेतले ——

आणि खालच्या रेस्टॉरंटमधून घरघरते सूर वर चढून तिच्या कानी पतींची पत्रिका पहावयाची आहे. '

खानसाहेबांनी मान डोलावून हात पुढे केला.

' आपल्या — फीच्या पैशाचेही सांगा. ' ती म्हणाली.

हातातील पत्रिका तिच्या समोर

ठेऊन ते गरजले, 'तो दरवाजा. अजून उघडाच आहे !

मैत्रिणीने खिराश्त ओळखावी, तसे खजील हसू तिच्या तोंडावर पसरले ! जिभलीचे टोक ओंठाबाहेर येऊन गेले. तिने पत्रिकेला हात लावला नाही.

खानसाहेबांचे तीक्ष्ण डोळे पत्रिकेचा वेध घेऊ लागले एक सुगंध रेखा विजेसारखी त्यांच्या मनाला चाटून गेली. कोठून आला हा सुगंध ? ते सावरून बसले.

: पत्रिकेतील ग्रह-गोल वेगाने पुढे सरकत होते अनिष्ट, अयोग्य, घातक, विषारी, नाही, नाही--

पुन: ती सुगंध-रेखा पुढे आली -- प्रत्येक क्षणी खानसाहेब चमकत होते, दचकत होते -- त्यांचे ससाण्यासारखे तीक्ष्ण डोळे पत्रिकेतून आरपार त्या माणसाच्या आयुष्यांत घुसले होते, आणि त्यांचा वृद्ध अनुभव निराशेने मान हलवीत होता.

मोठी आश्चर्य वाटण्यासारखी पत्रिका होती ! लाखांत एक अशी. एकही ग्रह त्या माणसाच्या बाजूने नव्हता ! सर्वांमागून फरफटत जाणे, एवढेच त्या दुर्दैवी जिवाच्या कर्मात होते--आणि ग्रह तसेच त्याला आयुष्यभर खेचीतही होते--

-- राखेच्या ढिगाऱ्यांत हात खुपसल्यासारखे खानसाहेबांना वाटले. त्यांनी ओठ उघडले, व पुन: तो सुगंध त्यांना सपकन जाणवून गेला. जडशीळ जिभेने ते बोलले, 'बेटा, हे तुझे पती ! दुर्दैवी बिचारे, पण मृत माणसाची पत्रिका का आणलीस' मृत ?' ती स्तंभित होऊन म्हणाली, 'ते जिवंत आहेत !'

जमीन हादरल्यासारखे खानसाहेब दचकले. चूक ! ते चुकले होते ! त्यांचा सारा अनुभव वाऱ्याबरोबर गायब झाला होता !

त्यांनी पुन: आपल्याच बद्दल विस्मय वाटून पत्रिका उचलली. असे कधी झाले नव्हते--

तेच ग्रह, तीच--अगदी निश्चितपणे विनाशाकडे गेलेली त्या माणसांची पावले--

छे, चूक होत नव्हती !

'खरे सांगतेस, बेटा ?'

ती फक्त हसली.

पुन: त्यांनी एकवार त्या पत्रिकेकडे दृष्टिक्षेप केला, आणि याही वेळी त्या सौरभाचा सपकारा त्यांना जाणवून गेला.

या वेळी मात्र अचानक खानसाहेब त्या सपकाऱ्याने जणू जागे झाले. घाईघाईने त्यांनी त्या पत्रिकेवरून नजर फिरविली आणि त्यांना त्या सुगंधाचा--अकारण, अनाम सुगंधाचा अर्थही त्याच क्षणी उमगला. हात उचलून ते भरल्या आवाजाने म्हणाले, 'परवरदिगार ! तेरा अचरज !'

काही क्षणांनी ते जणू परत आले. मनस्विनीकडे पहात राहिले. अथांग आभाळातील रंगाचा खेळ पहावा, तशी मूक होऊन ती खानसाहेबांच्या हालचालीकडे पहात होती. ते उभे राहिले. पुन: बसले. मग न राहवून म्हणाले, 'बेटी, धन्य माझी की, तू आलीस ! अचरज !'

"काय झाले खानसाहेब ?" तिने विचारले.

"आता माझी चूक होत नाही." पत्रिकेकडे पाहून ते म्हणाले, 'ऐक बेटा, हा माणूस सहा महिन्यांपूर्वीच प्रभूच्या घर पहुँचला होता. सच बोलू, तर याच्या नशिबात जमेला फक्त शाळेचे शिक्षण होते, बाकी काही नाही! त्याला पैका नव्हता. हे–हे कागद फार खरे बोलतात. त्याला जिंदगीभर रखडावेच लागणार होते– पण कोणत्यावेळी त्याच्या शुभ ग्रहांनी, अल्लामियांनी, रहम केला! त्यांनी जोर धरला असला पाहिजे. त्याची शादी झाली. तू आलीस आणि त्याचे नशीब तुझ्या आस-यावर उभे राहिले. तुझ्या हिंमतीवर त्याची आयुष्य उभी राहिली–

सहा महिन्यांमागे मात्र त्याची मौत ठरली होती. ऐक बेटी,' शहारून ते म्हणाले, "मी कागज पुष्कळ पाहिले जिंदगीभर, पण असा खेळ देखला नव्हता! त्याच्या सगळ्या किस्मतने बिस्तरा तैयार केला होता–चलो, गाडी आयी है! घंटी बज रही है!

पण बेटी–तुझ्या एका झपाट्यांतच त्याचा आंदाज बदलला. तो जगला! त्याच्या पुढच्या जिंदगीबद्दल एवढेच सांगतो–ती सुधरणार नाही! त्याच्या दैवी ते नाही. तुझ्या तोंडाकडे पाहून– मला काय होते, सांगता येत नाही– आत्मा उधम मचवतो. बस्. तू त्याला उचलशीलमुद्धा–पण माझे सफेद बाल मला सांगतात, त्यासाठी तुला मोठीच किंमत द्यावी लागेल. बस्." खानसाहेब एकदम उभे राहिले.

मुलाकात संपली होती. मनस्विनी मूक झाली होती. ती वळली. दारावरचा मण्या-फुकण्यांचा काचपडदा वाजला.

"ठेर, बेटी!" खानसाहेब पुढे झाले. डोक्याचा साफा उलगडून त्यांनी तो तिच्या हातात दिला. झब्ब्याच्या जेबमधून कोणतीतरी एक नोट काढून तिच्या मुठीत ठेवली आणि म्हणाले, "ना म्हणू नकोस! घे आणि जा! नेघ!"

त्या भरजरी दानाकडे पहात मनस्विनी क्षणभर रेंगाळली. लग्नात वडिलांनी दिलेल्या–ओल्या रुमालासारखे तिला ते वाटले व विचार करीत ती पुढे निघाली.

गेले सहा महिने–तिचे मन माघारीची ती वाट चालू लागले...ते दिवस जसेच्या तसे तिला दिसू लागले–

त्या काळरात्री भरवेगाने त्या माणसाला रुग्णालयात आणण्यात आले. ड्यूटीवरील नर्सने काही कागद काळे केले व त्याची वॉर्डमध्ये रवानगी झाली. मनस्विनी डॉक्टरांची वाट पहात क्षणक्षण गिळीत राहिली–

पेशंट 'इमीजिएट अटेन्शन' हवे म्हणून बेशुद्ध होता–

भोवताली कॉटस् लांबपर्यंत पसरल्या होत्या आणि त्याही पलीकडे उंच, भीषण कमानी. मनस्विनीला बसवत नव्हते, काय करावे कळत नव्हते. सरकारी रुग्णालय–

अचानक तिला जाण आली, आज रविवार!



# डोकं दुखतंय् ?
# ॲनासिन

## घ्या नि वेदनापासून आराम मिळवा
## ते प्रभावी नि सुरक्षित असल्याने उत्तम ठरते



सौ. नाडकर्णी म्हणतात, "वेदनांपासून आराम मिळावा यासाठी ॲनासिनचा वापर आमच्या घरात कित्येक वर्षांपासून चालत आला आहे. त्याने मिळणारा आराम प्रभावी असतो."

जगभर डॉक्टरी ज्या वेदनाशामकाची शिफारस करीत असतात ते ॲनासिनमध्ये भरपूर प्रमाणात असल्याने ॲनासिन **प्रभावी** असते. ॲनासिन घेतल्याने वेदनांपासून जलद आराम मिळतो.

ॲनासिन **सुरक्षित** ही असते—कारण, डॉक्टरांच्या निर्धोक मिश्रणाप्रमाणेच त्यात अनेक औषधी घातलेल्या असतात. मुलांनाही ते बिनधोकपणे देता येते—इतर औषधांसाठी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेता त्याप्रमाणेच मुलांना किती ॲनासिन द्यायचे यासंबंधी त्यांना विचारा.

**सर्दीपडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायुदुखी आणि दातदुखी यांवर ते अतिशय प्रभावी असते.**

# ॲनासिन
भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



४ प्रकारे कार्य करते

Regd. User of TM : Geoffrey Manners & Co., Ltd.

A-53

ती उभी झाली आज डॉक्टर येणार नव्हते—क्वचित्, येणारेच असतील, तेही रेंगाळत—

डॉक्टरांना शोधायलाच हवे होते. ती बाहेर पडली. लांब कॉरिडॉर तिने पार केला. जिना उतरता-उतरता तिचे श्वास कंठाशी आले. पुन: दोन लांब लचक व्हरांडे.

दुतर्फा वॉर्डस्मधून कण्हण्याचे, क्वचित् किंकाळ्यांचे, खोल आवाज येत होते आणि अंधुक प्रकाशातून अंग चोरीत प्रत्येक आवाजाला शहारात ती स्वत:ला पुढे खेचीत होती, अधून-मधून धावत होती.–लवकर डॉक्टर हवे होते–

धापा टाकीत तिने एक अर्धवट जागा असलेला 'नाईट-ड्यूटी 'वाला ऑफिसर गाठला. "मला–मला–डॉक्टर भेटतील का ?"

'इथे ?' त्याने 'काय विचारता !' चा प्रश्न केला.

तिचे तोंड आणखी थोडे केविलवाणे दिसेपर्यंत तो थंड राहिला, अन् मग तुच्छतेने मेहेरबानी करून बोलला, 'वर बघा वर !'

आवंढा व आणखी बरेच काही गिळून ती परत फिरली. जिन्याच्या तोंडाशी–लिफ्ट्चे लाड आपल्यासाठी नसतात–स्टुलावर पेंगणाऱ्या रखवालदाराने तिला खडसावले, चिठ्ठी ?'

वर जावयाचे, तर 'पास' घ्यायला हवा होता ! तिने श्वास टाकला. त्याला परिस्थिति सांगितली–विनवले, सुचविले –'तो' ऐकत नसतोच ! मनस्विनी उद्वेगाने परत फिरली. 'चौकशी' खिडकीतून दोन चिठोरे घेतले, मग परत वर निघाली.

अखेर तिला एक नवखा हाऊस्मन भेटला. तिला काही बोलणेही सुचले नाही. ती नुसती त्याच्यासमोर उभी राहिली–

"काय पाहिजे ? व्हॉट्स् इट् ?"

काय सांगावे देवा, ती रडवेली झाली होती...तो समजला. त्यांनी वॉर्डस् मागे टाकले, पेशट् शोधून काढला. त्याने पेशंट्ची अवस्था पाहिली व टाळ्या वडवून गरजला, "बॉय् ! सिस्टर् ! स्टाफ !"

अंधाऱ्या, दीर्घ वॉर्डमधून त्याच्या हाकांचे अस्पष्ट प्रतिध्वनि आले–अखेर दूरवरून स्टाफ्–नर्सची बुटकीशी मूर्ति डुलत-डुलत येऊ लागली.

त्याचा संताप अनावर झाला होता–

अखेर तो थांबला. पेशंट्ची अवस्था–'सिंकिंग' होती–

शीर सापडत नव्हती. अखेर ती सापडली. त्याच्या ग्रूपचे रक्त मिळणे अवघड होते. त्याने ते मिळविले–

इंजेक्शनची तयारी त्याने केली आणि वरची ट्यूब लुकलुकू लागली. 'लाईट !' तो गरजला.

टॉर्च उचलून धरण्यात आला आणि त्याने काम पुर्ण केले. दहा मिनिटे गेली आणि दुसऱ्या वॉर्डमधून धावपळ करून तो डॉक्टर परतला, तेव्हा त्याच्या लक्षात ते आले.

रक्त शरीरात उतरतच नव्हते. शरीर रक्त स्वीकारीत नव्हते ! शिरेऐवजी ते थेंब दंडाच्या इतर अंगात

उतरत होते, सूत्र भराभर चढत होती. त्याचे शरीरही त्याचा वैरी बनले होते. त्या काळरात्री प्रत्येकजण त्याच्या विरुद्ध होता—

परंतु तरीही, तरीही कोणी जागे होते. सक्त जागती नजर रोखून होते— लवकरच मनस्विनीला हे कळून आले. हॉस्पिटलमध्ये हेलपाटे घालायला सासरच्यांपैकी कोणाला जमणार नव्हते. कोणाच्या नोकऱ्या नवीन होत्या, कोणाची प्रकृती बरी नव्हती. माहेरच्या मंडळींनी शक्य तेवढे केले आणि अखेर त्यांचीही नाराजी तिच्या लक्षात आली. तिने काही दिवस काढले आणि शेवटी तिची स्वतःचीच प्रकृती बिघडण्याची चिन्हे दिसताच पेशंटला डिसचार्ज मिळावा, म्हणून प्रयत्न सुरू केला. डॉक्टर्स विशेष राजी नसताही तिने तो मिळविला आणि पेशंटला घरी आणले.

थडपणे साऱ्या खेळात भाग घेणाऱ्या पेशंटच्या मनात या सर्व गोष्टींची कोठे-तरी नोंद होतच होती. विशेष बोलका, तो माणूस नव्हताच; आता तर तो क्वचितच बोले. तो पहात होता— हॉस्पिटलमधील बेफिकीर वागवणूक आपल्या लोकांची टाळाटाळ नोकरी-साठी मनस्विनीची चाललेली धडपड— स्वतःची संपलेली—' विदाउट पे '—चालू असलेली रजा—

मनाला जणू कोणीतरी ताण लावून एका दिशेने खेचीत होते. त्या ताणवर इलाज नव्हता. इतरांच्या अनेकांच्या बाबतीत त्यातून सुटण्याचे उपाय सहज उपलब्ध असतात—मद्याच्या पेल्यात सगळी दुःखे विरघळून जातात! अश्वांच्या शर्यतीतील जीवघेण्या आनंदा-पुढे हे ताण सैल पडतात, पिसल्या जाणाऱ्या पत्त्यांच्या डावांमध्ये ही निराशा बाद झालेल्या भिडूसारखी मनाला सोडून जाते—

या माणसाची घडण ती नव्हती. हळूहळू त्या ताणांनी आपले काम बजा-वले. त्याच्या संवेदना बधिर होत गेल्या. कुशाग्र बुद्धीचे अग्र बोथट बनले, जड होत गेले. आयुष्यातला रस संपला, शिल्लक राहिले ते जगणे.

मनस्विनीने त्या संध्याकाळी दार उघडले. तेव्हा ' त्यां 'च्या ऑफिसमधील लोक भेटीसाठी आले होते.

' ते ' तर ऑफिसलाच गेले होते !—

' काय म्हणते तब्येत ? केव्हा यायला सुरुवात आता ?' ते विचारीत होते. त्यांचे फार आपलेपणातील हे सहकारी हुषार. मनमिळावू. सगळ्या ऑफिसचा जिव्हाळा त्यांच्या वागण्यात दिसून येत होता—

क्षणार्धात मनस्विनीने स्वतःला सावरले. ' सांगते मी त्यांना—' त्याना निरोप दिला आणि मग बंद केलेल्या दाराकडे पहात ती तशीच उभी राहिली —पाहून न दिसता—

' महाराज ' परत आले, तेव्हा संध्या-काळ सरत आली होती. दुसऱ्यांच्या घरातील प्रकाशाचे उदासवाणे कवडसे घरात पडले होते. महाराजांना आज-काल बोलायचे सुचत नव्हते. मस्तकाने चाकोरी सोडली होती, वेडाच्या तरल जगात महाराज वावरत होते. यंत्रा-

सारखे सवयीने व्यवहार चालले होते—

'अशी अंधारात का बसलीस?' एवढेही विचारण्याचे त्यांना सुचले नाही. त्यांनीच बटणे खाली ओढली.

मग मात्र मनस्विनीच उठली. लक्ष न गेलेल्या बेशुद्धीतील माणसाने शुद्ध येताच उठून उभे रहावे, तशी उभी राहिली. काडी ओढून देवासमोर तिने समई लावली 'कारुण्यसिंधो, भवदुःख हारी'—म्हणाली आणि समईचे पाळे ठिबकावे, तसे तिचे डोळे टपटपू लागले—

'कोठे गेला होता;' तिने कसेबसे विचारले.

'कुठे म्हणजे?' कोणत्याही प्रश्नाला सरळ उत्तर न देण्याची प्रथा पाळून त्या सरकारी सर्व्हिसवाल्याने प्रतिप्रश्न केला.

'तुम्ही ऑफिसला गेला नव्हता.' ती खालच्या मानेने म्हणाली, 'दुसरीकडे कोठे गेला होता, ते मी विचारते आहे.'

'कोठे म्हणजे?'

ते गावाबाहेरच्या एका पुलावर दुपारभर बसून राहिले होते. कारण काहीही नव्हते—

मनस्विनी ज्या पापाला भीत होती, तेच दर दिवसाला जवळ जवळ येत होते.

बेमुदत गैरहजेरीचा परिणाम नोकरी संपण्यात होऊ नये, म्हणून ती जीव तोडून कंठशोष करीत होती, परंतु कर्मात तेच दिसत होते—

एक दिवस महाराज कधी नव्हे, ते स्वतः होऊन बोलले! ऑफिस आता नियमित सुरू झाले होते. परत आले, अन् म्हणाले, "पुढच्या महिन्यापासून ही नोकरी सोडून दिली!"

अतिरिक्त ताण पडल्याने माणूस मुक्तही बनतो. तिला ताण सोसेना! हसून तिने विचारले, "अन् मग खावयाचे काय ठरविले आहे?"

"तू मला इतका वेडा का समजतेस?" त्यांनी खिशातून पत्र काढून तिच्यासमोर ठेवले. ती पहातच राहिली—

एका प्रचंड कारखान्याचे ते अॅपॉइंट्मेंट लेटर होते. या माणसाने अकल्पनीय धडाडीने तेथे डोके खुपसलेले दिसत होते आणि यश मिळवूनच ते उचलले होते! दर्जा, पगार—सर्वांतच वाढ होणार होती—

"फाडून टाका ते पत्र." तिने सांगितले आणि त्यांनी शांतपणे कोणताही विचार न करता ते फाडले, तेव्हा ती मुक्तपणे रडू लागली—

ते संतापतील, पत्र फाडून टाकण्याबद्दल आपल्याला वाटेल तसे बोलतील, असे तिला वाटत होते आणि त्याऐवजी या माणसाने शून्यपणे ती संधी उधळून लावली होती आणि आता निर्विकारपणे म्हणत होते, "चला, वाढा."

—याच कारणासाठी तिने ती संधी त्यांना घेऊ देण्याचे टाळले होते. तो कारखाना होता. सध्याच्या नोकरीमध्ये ते स्थिरावले होते; सहकारी सांभाळून घेत होते-नव्या नोकरीत तसे काय ऋणानुबंध होते?

हातात होते, ते सोडून पळत्याच्या मागे लागायचे, तर—त्याला तेवढी

शाश्वती हवी होती. त्यापेक्षा होते तेच बरे होते–

हातात होते–नव्हते तेवढे सर्व उपाय करून थकले महागडी वैद्यकीय मदत घेऊन झाली. महाराजांच्या बुद्धीवरील जड पटल काही हलत नव्हते. शून्य, सुन्न झाल्यासारखा तो माणूस दिवस ढकलीत होता. ऑफिसमधील काम यथातथाच होते आणि दिवसेंदिवस त्यात चुकांचे प्रमाण वाढत होते. तेही बरोबरच होते, कारण बुद्धीच्या ज्या बंधांनी कार्यशक्ती कार्यान्वित होत होती, ते बंधच सैल पडत चालले होते–हालचालीत विसंगती येऊ लागली होती–

इलेक्ट्रिक शॉक्सची ट्रीटमेंट झाली–देव-धर्मांची करुणा भाकून झाली–या रोगावर उपायच सापडत नव्हता. भिऊन, भडकून मनस्विनी थकून गेली होती. एक छोकरी होती, तिचे एकदा आयुष्य वळणाला लावून दिले, म्हणजे मग मनस्विनी मरणालाही मोकळी झाली असती परंतु अजून पंधरा उन्हाळे तरी त्यासाठी काढावयाचे होते–

देवांना कौल लावण्याचा तर तिला आता कंटाळा आला होता. तळपत्या, नागकन्यांसारख्या चपळ शरीरांच्या, 'संचार' झालेल्या बायकांनी काही बोलण्याचेच नाकारले होते. एकच देवी तेवढी फार विनविल्यावर कुंकवाने निथळत्या कपाळाने, घागरीत खोल फूंक भरीत घुमत–घुमत हळू आवाजात बोलली, "जा. तुझ्या मनातील गोष्ट घडेल. आता जा."

केव्हा घडेल ? कशी घडेल ?

प्रश्न फार होते, उत्तर एकालाही नव्हते !

बदली. बदलीचा हुकूम आला होता. हवापालट करण्याचा सल्ला बऱ्याच वेळा देण्यात येऊनही आजवर ते शक्य झाले नव्हते. किरकोळ ट्रिपचा काही उपयोग होत नव्हता – आता जाणे भाग होते. त्या साऱ्या उस्तवारीमध्ये मनस्विनीला मात्र किंचित आशा लागली होती की, या सक्तीच्या स्थानबदलामुळे तरी काही फरक पडेल–

झालेही तसेच. फरक पडला. महाराजांच्या वागण्या-वावरण्यामध्ये किंचित टवटवी आली. बोलणे नव्हतेच, एका दूर, एकांत बेटावर तो माणूस जाऊन पोहोचला होता, आणि तेथून तो परत येण्याची आशा दर दिवशी मावळत चालली होती: ती पुन: उगवू लागली. नव्या गावात जागा शोधण्यात त्यांनी उत्साहाने भाग घेतला. सामान लावण्यात मनस्विनीला व मेहुण्याला मदत केली.

सारे स्थिरस्थावर झाले, आणि पुन: भरतीचे पाणी ओसरून जावे, तसे उजाड वाळवंट उघडे पडले. पुन: त्या उदासवाण्या एकांताने डोके वर काढले, आणि महाराज जडशीळ, शून्य बनले.

मनस्विनीला मात्र यावेळी त्याची विशेष जाणीव झाली नाही. तिचीच ओहोटी सुरू झाल्यासारखे झाले होते. एवढे दिवस जाणवली नव्हती, ती दगदग आता अंगावर आली होती. महाराजांच्या पुन: पूर्वपदावर येण्याने

तिला एक धक्का बसला, हे तर खरेच परंतु त्याबरोबरच एक विलक्षण विचार तिच्या मनात थैमान घालू लागला होता, त्याच्या नादामध्ये ती स्वतःला हरवून बसली होती–

एक दिवस तिने महाराजांना ते विचारले.

"मी का म्हणून तुमच्याबरोबर हे जिणे जगावयाचे ?" ती विचारीत होती, "मी याचा निकाल लावायचे ठरविले आहे. तुम्हाला हे कळते आहे का ?"

त्यांना कळो, न कळो. तिने त्यांचे ते आयुष्य सोडून जाण्याचे ठरविले होते. ती घटस्फोट घेणार होती. तिला तो मिळालाही असता. आता तिने ठरविले होते, ते अखेरचे. सगळे उपाय थकले, म्हणून. आग लागलेल्या घरापासून इतर घरे तोडून काढतात, तसेच हेही.

–आणि महाराजांनीही त्यावर– फक्त मान डोलावली, व त्या कातर संध्यासमयी वेड्या उत्साहाने विचारले, "मग ? केव्हा जायचे वकिलाकडे ? माझी तयारी आहे."

त्याच क्षणी ती मनस्विनी उन्मळून पडली.

ती शुद्धीवर आली, तेव्हा तिचे डोळे कोरडे-रिकामे पडले होते. रक्तदाबाच्या खोल पायऱ्यांवरून आयुष्य खाली खाली उतरत चालले होते.

डोक्याशी डॉक्टर्स निराशेने मान हलवीत होते, समोर आयुष्याच्या साथी डोळ्यात डोळे मिसळून बसून होता–

अवचित तिचे डोळे हलले. रस्त्यातून कोणी शिट्टीवर काही सूर वाजवीत चालला होता, ते तिने टिपले,– 'बहारो ! फूल बरसाओ...'

होय. तीच एक बहार बनली होती, या-या माणसावर आयुष्य उधळून चालली होती–

अजून यांना कळू नये का ? उत्तरणारे आयुष्य क्षणार्ध थबकले. मागे वळून पाहू लागले–

महाराजांना जणू त्या दृष्टीतून कोणीतरी हाक मारली. एका हिसक्यासरशी ते जागे झाले. खोल पाण्यातून जणू वर-वर येऊ लागले. त्यांची शून्य मुद्रा हलली–हलली–

"मनी ! मनस्वी ! जागी हो ! जागी हो–बघ, बघ !'

...तो पूर्ण जागा झालेला माणूस आकांताने ओरडत होता. मनस्विनी मात्र आपल्याच आयुष्याच्या लोलकासारख्या फिरत्या रंगांच्या पाकळ्यांच्या मुक्त उधळणीमध्ये केव्हाच हरवून बसली होती....

□ □ □



## जबानी चौथी । शेवटची

### हप्ता पहिला

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

माझ्या अजब अनुभवांची कहाणी तुम्हांला ऐकायच्याय. पण मुश्कील काय आहे ठाऊक आहे? जिंदगीभर मी फक्त रायफल, संगीन अन् हँड-ग्रेनेड्सच हाताळलेयत. हुकमांची अंमल-बजावणी केल्याय्. हुकूम जारीही केलेयत. पण ही लेखणी काही माझ्या हातात धड चालत नाही. साध्यासीध्या लष्करी हुकमाचा ड्राफ्ट तयार करता येतो मला. पण साहित्य वगैरे जन्माला घालायची ताकद काही देवानं मला दिलेली नाही.

आयुष्यातली माझी पहिली लढाई सुरू झाली वयाच्या सतराव्या वर्षी अन् त्या लढाईत माझ्या हातात काहीच हत्यार नव्हतं. पिताजींशी झगडा झाला अन् सरळ घराबाहेर पडलो. अन् चक्क परदेशी झालो. एका चाटगावी सारंगाच्या मदतीनं. नंतर आयुष्यात किती चढउतार झाले! कधी शेठ झालो, कधी फकीर झालो! कधी हवालदार, तर कधी सेनापती! अन् आयुष्यातली शेवटची लढाई खेळलो ती तर अगदी परवाच की! एकोणीसशे पासष्ट साली!

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

आता रिटायर्ड लाइफ. निवांत. आता वयपण झालंच म्हणा. बावन्न म्हंजे चांगलाच प्रौढ झालोय् मी. नाही, तसं शरीर काही अजून मोडकळीला आलेलं नाही. सहा फूट एक इंचाची उंची एवढीशीसुद्धा कमी झालेली नाही. कंबर अजिबात वाकलेली नाही. पण केस-दाढी अगदी सफेद बनून गेलेयत. अमृतसरला असतो आता. स्वत:च्या देशात शेतीभाती आहे. गहू, मका, ज्वारी अन् ऊस काढतो.

धर्मानं मी शीख. खालसा शीख. मला अभिमान आहे त्याचा. कलकत्त्याला असताना पोरं टिंगल करायची माझी. डोक्याला बांधलेली प्रचंड पगडी पाहिली की त्यांना कोबीची आठवण व्हायची बहुतेक. आमच्या पोशाखाचा अन् बारा वाजायचा काय संबंध आहे, मला तरी ठाऊक नाही. पण मी दिसलो-रे-दिसलो की कलकत्त्याची पोरं प्रश्न विचारायची क्या सरदारजी, बारा बज गये क्या ?

म्हणू देत म्हणा. नाक्यावर उभं राहून टिंगली करण्यातच त्यांचं आयुष्य चाललेलं अन् त्यांना माहिती तरी काय असणार माझ्याबद्दल ? बंगाली जात हुशार, हे मी कबूल करतो. ह्या बंगाली लोकांनीच एकदा सबंध भारताचं पुढारपण केलं होतं. अन् ज्या एका माणसाबद्दल आयुष्यभर सगळ्यात जास्ती श्रद्धा बाळगत आलो--तोही ह्या बंगाल मुलखातलाच होता की !

पण आमची शीख जमातदेखील काही कमी नाही. बंगाल्यांना माहित नसेल कदाचित् भारताच्या लोकसंख्येप्रमाणे शंभरात फक्त एक जण शीख आहे; पण एवढ्यावरच काही सगळं संपलं असं नाही. भारतीय सैन्यातले एकतृतीयांश लोक शीख आहेत. खेळातदेखील अगदी परवापरवापर्यंत एकाच बाबतीत भारताला अभिमान होता ! अन् ह्या हॉकीची टीम ऑलिंपिकला गेली की त्यातले पन्नास टक्के लोक आमचेच असतात की ! अ‍ॅथलेटिक्सचं अखिल भारतीय रेकॉर्ड चाळून बघा-- अजूनी त्यातली दोन तृतीयांश नावं ह्या वन परसेंट शीख जमातीतलीच सापडतील. एव्हरेस्टवर आतापर्यंत अवघे चारच भारतीय लोक जाऊ शकलेयत. त्यातपण तिघं शीख आहेत ! म्हणूनच ही कोबी बांधल्यासारखी प्रचंड पगडी, दाढी, कडं, किरपाण ह्याच्यासकट मला अभिमानच आहे--की मी शीख आहे !

पण ते जाऊ द्या. तुम्हाला माझे लढाईतले अनुभव ऐकायचेत ना? तेच ऐकवतो.

आयुष्यातल्या बिल्कुल शेवटच्या लढाईपास्नंच सुरुवात करतो. त्या लढाईत रणांगणावर उभं राहून मी म्हणालो होतो-- तमाम सुद! म्हणालो होतो-- Farewel to arms! एकोणीसशे पासष्टच्या सेप्टेंबरच्या त्या बावीस दिवसांच्या लढाईपास्नंच सुरुवात करू या ह्या गोष्टीची.

अठरा वर्षापास्नं पाकिस्तानचे न् आपले संबंध कडवटच होते. ह्या कडवटपणानं सहनशीलतेची मर्यादा ओलांडली ती ह्या सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात. एक सोक्षमोक्ष लागून जाऊ दे, असंच वाटत होतं आम्हाला. म्हंजे भारतीय सैन्याच्या वरिष्ठ मंडळींना. ह्यांच्यापुढं मी अर्थातच छोटासा माणूस. निव्वळ हुकमाचा ताबेदार. जसा हुकूम होईल तसं करणार. वर्तमानपत्रात वाचलं, रेडिओवर ऐकलं, की शत्रूनं आपल्या सरहद्दीवरनं माणसं घुसवायला सुरुवात केल्याय्. धमनी-धमनीतल्या फौजी रक्ताला भरती आली. मी तेव्हा दिल्लीच्या छावणीत होतो. गुरुची अपार करूणा: दुसऱ्याच दिवशी ऑर्डर आली -- चलो पंजाब!

पुरी एक बटालियन घेऊन स्पेशल ट्रेननं मी रवाना झालो मी -- कर्नल हरगोविंदसिंग! एकोणीसशे शेहेचाळीस साली मी पहिल्यांदा भरती झालो भारतीय सैन्यात. साधा कॅडेट म्हणून. त्याच्या आधीदेखील थोडासा लढाईचा अनुभव माझ्या गाठी होता. पण तो काही भारतीय सैन्यातला नव्हता. त्या सैन्यात मी कॅप्टनपण झालो होतो. पण खानजोल-इंफाळ-पाम्पेल-पोपा रणांगणां-तल्या त्या अनुभवाला काडीचोही किंमत दिली नाही ह्यांनी. अगदी पहिल्यापास्नं सुरुवात करावी लागली होती स्वातंत्र्या-नंतर. अगदी नव्यानंच सुरू केलं नोकरी-तलं आयुष्य. लढाईची नोकरी. अन् तरी गंमत कशी बघा -- ही लांबलचक अठरा वर्षं निव्वळ नोकरीच तेवढी करत आलो मी -- लढाई कधी केलीच नाही. जरूरच पडली नाही. शांतताप्रेमी भारतात लढाई न करताच ओळीनं प्रमोशन्स मिळत गेली मला. अन् मी कर्नल झालो. बासष्ट साली उत्तर सर-हद्दीवर काहीतरी गडबड झाली होती असं ऐकलंय् मी. पंचशीलची दीक्षा घेतलेल्या त्या सैन्याचं नेतृत्व करायची हाक काही मला पडली नाही. तुमच्या-सारखंच मी पण घरी बसल्याबसल्याच ती untold story वाचल्याय्.

ह्या खेपेची लढाई होती पश्चिमेला. आम्ही दिल्लीहून अमृतसरला आलो. माझ्या स्वतःच्या देशात. मग तिथनं आणखी पश्चिमेला. लाहोरच्या दिशेनं. लाहोर-अमृतसर भागात दोनशे वर्षा-नंतर परत एकदा लष्करी पुकार ऐकू येत होता -- अल्ला हो अकबर!' न् 'वाह गुरुजी का खालसा, वाह गुरुजी की फतेह!' त्या अवघ्या बावीस दिवसात सरहद्दीलगत जो धामधूम झाली, तिचं वर्णन करायची ताकद काही माझ्या लेखणीत नाही. मी फक्त

एवढंच सांगतो की जगाच्या इतिहासातली सर्वात मोठ्ठी रणगाड्यांची लढाई ह्याच बावीस दिवसात लढली गेली. रोमेलनं न् दोस्तराष्ट्रांनी मिळून आलेमिनच्या लढाईत जितके रणगाडे वापरले होते, त्याच्या दुपटीनं रणगाडे ह्या लढाईत आग ओकत होते.

आता मला मधेच थांबवावं असं तुम्हाला वाटतंय् ना ? मनातल्या-मनात तुम्ही म्हणताय्--बाबारे, पाकिस्तानविरुद्धच्या लढाईत तू काय काय करामती दाखवल्यास ते आम्हाला काहीएक नकोय् ! ब्रह्मदेशांतल्या लढाईत तू काय खेळ दाखवलास तेच तेवढं सांग !

पण हो हो ! तेच सांगतो. जरा धीर धरा. नाइलाज आहे म्हणूनच मी शेवटापासनं सुरुवात केल्याय्. तसं करावंच लागलंय् मला. कारण ह्या पाकिस्तानच्या रणांगणात, माझ्या आयुष्यांतल्या शेवटच्या लढाईत, विरुद्धपक्षाचा सेनापति म्हणून जो इसम उभा होता-- तोच ब्रह्मदेशच्या रणांगणात माझा जीवश्चकंठश्च मित्र होता ना ! आराकानच्या लढाईतच माझ्या आयुष्यांतला सर्वांत भाग्यशाली दिवस उगवला होता. त्या दिवशी नेताजींच्या हातनं मी माझ्या सैनिकी जीवनातला सर्वश्रेष्ठ सन्मान स्वीकारला. सरदार-इ-जंग पदक ! त्या माझ्या सन्मानात पन्नास टक्के भागिदारी ज्याची होती, त्याचं नाव लेफ्टनंट महमद अन्वर हुसेन, सरदार-इ-जंग. एकोणीसशे पासष्टच्या सप्टेंबर महिन्यात हे दोन सैनिक आमनेसामने उभे राहले होते. लाहोरच्या बाजूला पाकिस्तानच्या छावणीत पॅटन रणगाड्यांच्या तुकडीचं नेतृत्व होतं पाकिस्तानी ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेनकडे अन् अमृतसरच्या बाजूला त्यांना मुकाबला करण्याकरता जिवाची पर्वा न करता उभा होतो मी--कर्नल सरदार हरगोविंदसिंग !

ह्या अन्वरचा जीव वाचवला होता. मी जपानच्या युद्धबंदी-शिबिरांतनं पळून जायला त्याला मदत केली होती मी. त्याच्याइतका निडर, धाडशी, लढवय्या उभ्या आयुष्यात बघितलेला नाही मी. माझाच कुडता अंगावर घालून न् माझीच पँट चढवून कुलींच्याबरोबर सिंगापूरहून तो छुप्पनला आला होता. तिथनं पायीपायी भारताकडे. ही मदत मी त्याला केली म्हणून त्याला माझ्याबद्दल फार कृतज्ञता होती. पण एवढ्यावरच सगळं संपलं असतं तर काय हवं होतं ! ह्या अन्वर हुसेननंच पुढं हे ऋण पै-न्-पै फेडून टाकलं होतं एकदिवस. ह्या हरगोविंदसिंगचा जीव बचावला होता त्यानं. त्याकरता मरणापेक्षा भयंकर यातना सहन केल्या होत्या अन्वर हुसेननं.

तीच गोष्ट सांगणाराय् मी आता.

हे बावीस दिवस माझं डोकं निव्वळ एकाच विचारानं भणभणत होतं : योगायोगानं दोस्त अन्वर तर आपल्यासमोर येऊन रणांगणात उभा ठाकला, तर अजिबात विचार न करता त्याला गोळी घालता येईल का नाही ? अन् मला पक्कं ठाऊक होतं की पश्चिमेला दीड मैलावरल्या एका तंबूत बसून दोस्त

अन्वरपण ह्या एकाच गोष्टीचा विचार करत होता. ज्या माणसाचा जान बचावण्याकरता ह्या ब्रिगेडियरसाहेबांचं उघडं शरीर वेताच्या घडयांनी जर्जर होऊन गेलं होतं एकदिवस, त्याच माणसावर गोळी झाडता येईल का नाही आपल्याला ? आमच्या दोघांच्याही मनात एकमेकाबद्दल हा एकच विचार.

तीन आठवड्यांची लढाई संपून गेली एकदिवस. तेवीस सप्टेंबरला रात्री साडे-तीन वाजता. प्रत्यक्ष रणधुमाळीत आमनेसामने गाठ पडली नाही दोन दोस्तांची. मला वाटलं होतं, ह्या खेपेला गाठ पडत नाही बहुतेक. पण तसं काही झालं नाही.

लढाई संपल्यावर माझ्याकडे एक हुकूम आला—आत्तेरी गावच्या नैऋत्येला ४.३७ किलोमीटर अंतरावर असलेल्या एका ओसाड दरग्यात हजर रहा. अमुक एका दिवशी. अमुक इतक्या वाजता. ह्या भागात पकडलेले तेवीस पाकिस्तानी कैदी त्यांच्या हाती सोपवायचे होते. बदल्यात पाकिस्तानी सेनापति ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेन त्यांच्या ताब्यातले बावीस भारतीय युद्धबंदी माझ्या हाती सोपवून देणार होता. कुरियर-सर्विसनं हा हुकूम हातात दिल्यावर थोड्याच वेळात दोन ट्रक आले. त्यात पाकिस्तानी युद्धबंदी. त्यांची राहण्याची व्यवस्था केली.

म्हंजे बेटया अन्वरची भेट होणार तर !

आमची लष्करी छावणी तेव्हा आत्तेरीलाच होती. आत्तेरी म्हंजे अमृतसरहून लाहोरला जायच्या वाटेवरचं एक छोटंसं खेडेगाव. हे गाव होतं रॅडक्लिफसाहेबान आखलेल्या सरहद्दीच्या पश्चिमेला दहा मैलावर. म्हंजे पाकिस्ताननं आक्रमण करायच्याआधी हे गाव पाकिस्तानातच मोडत होतं. तूर्त ते आमच्या ताब्यात होतं. अगदीच लहान होतं गाव. सगळे गावकरी गुरंढोरं घेऊन गाव सोडून निघून गेले होते कुठंतरी सुरक्षित ठिकाणी. गाव लहान असलं तरी एका दृष्टीनं ते काही फालतु नव्हतं. शीख इतिहासातल्या एका शूर सैनिकाचं जन्मगाव होतं ते. श्यामसिंग आत्तेरीवाला त्याचं नाव. १८४५ साली ब्रिटिशांशी झालेल्या स्वातंत्र्योयुद्धात हा श्यामसिंग धारातीर्थी पडला. आता गावात चोहिकडे मोडक्या घरांचे अवशेष. आमच्या अखंड बाँबिंगमुळं ही अशी अवस्था झालेली. पण लांब पिल्-बॉक्सेस. अन् खंदक गावाच्या पश्चिमेला ओसाड माळ. गेल्या मोसमातपण इथं गहू-ज्वारी न् मक्याचं पीक काढलं होतं पाकिस्तानी किसानांनी. माळाच्या पलीकडच्या टोकाला, क्षितिजाला लागून झाडांची एक रांग. त्याच्या आत हिरव्या-पांढऱ्या रंगाचा एक बिंदू दिसतोय्. फील्डग्लास डोक्याला लावली तर ह्या बिंदूचं पाकिस्तानी निशाण बनून जाईल तात्काळ. तिथंच ब्रिगेडियर महंमद अन्वर हुसेनची छावणी पडली होती.

त्या रात्री काही झोप लागली नाही मला. अंथरुणावर आडवाच झालो नाही म्हणा. चांदण्यांनी गच्च भरलेल्या

आकाशाखाली एक इञ्जिचेयर टाकून तासामागनं तास घालवले मी. जुन्या-काळच्या आठवणी मनात घोळवत.

उद्या सकाळीच कैद्यांची अदलाबदल. अर्थात् सशस्त्रच जाऊ आम्ही. अन तेहि सशस्त्रच येतील. पण शस्त्र वापरायला मात्र बंदी आहे दोन्ही बाजूंनी युद्धबंदी जाहीर केल्याय्.


कैद्यांच्या अदलाबदलीच्या रंगमंचावर आम्हाला दोघांनाही लष्करी रिवाज न् गांभीर्य शाबूत ठेवावं लागेल. पण नंतर एकांतात भेट होणं काय अगदीच अशक्य आहे ? अन्वर आपल्याला आमंत्रण करून बसला छावणीत यायचं तर ? ते आमंत्रण आपण घेणं ठीक होईल का ? बेकायदेशीर होईल का ? का त्याला तशी संधीच न देता आपणच त्याला आमंत्रण द्यावं आपल्या छावणीत ? स्कॉच काढता येईल. पांढऱ्या घोड्याची खूण असलेली बाटली साक्ष ठेवून एक संध्याकाळ दोघांना निवांत बसता नाही यायचं ? जिथं हिंदुस्थान नाही, पाकिस्तान नाही, कुणी कर्नल नाही, कुणी ब्रिगेडियर नाही--अशा एखाद्या ठिकाणी ? तिथं असतील फक्त दोन रांगडी माणसं--हरगोविंदभाई अन् दोस्त अन्वर !

माझं घर अमृतसरला न् त्याचं घर लाहोरला. अवघं पन्नास मैलाचं अंतर. पण हजारो मैलावरल्या ब्रह्मदेशात बसून आम्ही हे पन्नास मैल फुंकरीनं कुठल्याकुठं उडवून लावले होते. आम्ही दोघं म्हंजे एकाच देशातले--हे सगळ्यांना ठाऊक झालं होतं. दोघंही पंजाबी ! सगळ्यांना डोळ्यात भरण्याजोगी दोस्ती होती आमची.

तीच गोष्ट सांगतो आता तुम्हाला.

एकोणीसशे चव्वेचाळीसच्या जून-जुलैतली गोष्ट. जपानी बंदी-शिबिरातनं अन्वर पळून गेल्याला दीड वर्ष लोटलं होतं. मी त्याला जवळजवळ विसरूनच गेलो होतो. वाटलं होतं, ब्रह्मदेशच्या जंगलात बेटा मरून गेला असेल. कुणाला काहीएक न कळता. मी तेव्हा गांधी ब्रिगेडमधे होतो. रंगूनहून पहिल्यांदा जी तुकडी गेली, तिचं नाव होतं सुभाष ब्रिगेड. मी गेलो होतो दुसऱ्या टोळक्याबरोबर. अख्ख्या डिव्हिजनची जबाबदारी होती. मेजर-जनरल एम. झेड. कियानींच्यावर. अर्थात् तेव्हा काही ते मेजर-जनरल झालेले नव्हते. ते होते कर्नल. गांधी ब्रिगेडची जबाबदारी होती आय. जे. कियानींच्यावर. चुलतभाऊच होते ते. दोघा भावांच्यात फार साम्य होतं. दोघंही अगदी आदर्श सैनिक होते. अशा सेनापतीच्या हाताखाली लढाईवर जाऊन त्यात मरण आलं तरी ते एक भाग्यच !

लढाईच्या भागात पोचल्यावर आम्हाला कळलं की आपल्याला पोचायला उशीर झालाय्. चांगलाच उशीर झालाय्. आम्ही इंफाळला जाऊन पोचायच्या आतच ते पडेल बहुतेक. हे ऐकून आमच्या उत्साहावर पाणी पडलं. इंफाळवरच्या हल्ल्यात भाग घ्यायची सर्वांनाच फार इच्छा होती. नाना हालअपेष्टा सहन करून सबंध ब्रिगेड एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात हाका-


जोडहाट
शिवसागर
डिमापूर
कोहिमा
आसाम
मणिपूर
इंफाक
मैथाना
भामो
सिलचर
बिशनपूर
पालेल
थंगडट
त्रिपुरा
टामू
टांगा
लुसाई
टेकड्या
चिट्टिम
फालम
कालेवा
कोमिल्ला
हाका
चट्टग्राम
कॉक्स बझार
मिन्‌जिन
मनिवा
मेमिओ
मंडाले
उ
पाकोकू
मिनगां
मित्थुंग
आकियाब
पोपा
मिकटिला
छेदुबा
मिनबु
थ्यिनमाना
प्रोम
लेटपादान
पेगू
रंगूनकडे
बंगालचा उपसागर
नकाशा - २
आंतरराष्ट्रीय सरहद्द
रेल्वे
रस्ता
स्केल १ इंच = ८६ मैल

फालम रणांगणाच्या उत्तरेला कालेवा छावणीत जाऊन पोचलं. इथंही आम्हाला हेच ऐकायला मिळालं. — की तुम्हाला फारच उशीर झाला. इंफाळ कदाचित् पडलंही असेल एव्हांना. किंवा आणखी काही तासातच पडेल. तुमच्या पुढच्या सुभाष ब्रिगेडनं एव्हांना कब्जा घेतला असेल इंफाळचा.

ब्रिगेडचे सेनापती कर्नल कियानी न् ॲसिस्टंट कमांडर बी. जे. एस. गढवाल ह्यांनी आम्हा सगळ्यांना एकत्र जमवलं. अन् विचारलं — तुमच्या काय मनात आहे ?

आमच्या सगळ्यांचं उत्तर एकच होतं.

— आता इथं एकही क्षण न घालवता इंफाळच्या रोखानं जायला लागू या.

जपानी सेनापती मुतागुची म्हणाले — तुमच्या जवळच्या मशिनगन्स, हातबॉंब न् इतर सामान सगळं इथं ठेऊन तुम्ही तावडतोब निघा.


जपानी लायाझाँ ऑफिसर म्हणाला लागेल ते-ते सगळं तुम्हाला तिकडेच मिळेल. शत्रुपक्षाची सगळी- रसद न् शस्त्रास्त्रं एव्हांना नक्कीच आपल्या हातात आली असतील. आता इथनं जाताना प्रत्येकाकडे एक कांबळं, एक रायफल न् पन्नासेक काडतुसं असली तरी खूप झालं !

ह्या सल्याप्रमाणंच आम्ही निघालो होतो. आपण काय प्रचंड घोडचूक केल्याय्, हे लक्षात आलं नाही तेव्हा आमच्या. ही संधी सुधारायची संधीही काही परत मिळाली नाही आम्हाला.


ब्रह्मदेश न् भारताच्या सरहद्दीवर असलेल्या 'टामू' ह्या लहानशा गावात पोचल्यावर मग आमच्या डिव्हिजनल कमांडरला पत्ता लागला, की इंफाळ काही अजुनी पडलेलं नाही. पालेललाही अजून प्रचड रणधुमाळी चाललेली आहे, हेही इथं आल्यावरच कळलं. मग ठरलं की टामू–पालेल हमरस्त्याच्या दक्षिणेकडचा भाग म्हजे एक नंबर डिव्हिजनचा सेक्टर असेल. इथनं आपण वेगवेगळ्या भागात गनिमी काव्याची लढाई करायची. आमचं डिव्हिजनल हेडक्वार्टर्स 'छामोल'ला ठेवलं अन् रेजिमेंटल हेडक्वार्टर्स ठेवलं 'मित्थाँग खुंग'ला.

१ सबंध न् दोन अर्धे नकाशे ह्याच्या जवळपास कुठंतरी.

लढाईच्या दृष्टीनं टामू-पालेल ही सडक सर्वांत महत्त्वाची होती. ती आता आमच्या ताब्यात होती. ब्रिटिशांनी ह्या भागात तीन ठिकाणी सैन्याची जमवाजमव करून ठेवली होती. सडकेच्या उत्तरेला लाइमातोल टेकडीला लागून एक ब्रिगेड सडकेच्या दक्षिणेला यापू टेकडीवर दुसर एक ब्रिगेड अन् तिसर ब्रिगेड त्यांनी ठेवलं होतं पालेलच्या हवाई अड्ड्यावर. तिथनं दोनेक मैलावरच त्यांची छावणी होती. पहिल्या दोन ब्रिगेड्समधे गुरखे न् पंजाबी सैनिक आहेत अशी बातमी आम्ही काढली होती. अन् हवाईअड्ड्यावर सी-फोर्थ हायलँडर्स. म्हंजे गोरं सैन्य. ह्या ब्रिगेडची सूत्रं होती कर्नल ए. टी. सिप्सन


सिलचर
इंफाळ
बिशनपूर
पालेल
सेनाम
टामू
होमालिन
थंगडट
सित्तंग
टांगा
टंजांग
टिड्डिम
कालेवा
चिन
टेकड्या
१" = ४६ मैल
सरहद्द

नकाशा नं. २


थौबल
वांजिंग
मणीपूर नदी
रस्ता
कच्चा रस्ता
सरहद्द
बोंगली
खोसात
पालेल
साभूकम
सेनाम
पारूम
धामोल
डोलाइथुंग
मोरे
टामू
रवानजोल

नकाशा नं. ३

नावाच्या एका भलत्याच धाडशी अधिकाऱ्याच्या हातात. आम्ही ज्या दिशेनं पुढं जात होतो., त्याच दिशेनं हे तिसरं ब्रिगेड पुढं येत होतं -- बंदुका न् विमानं घेऊन.

ह्या रणांगणावर आम्ही सर्वात मोठ्ठी जी घोडचूक केली होती, ती प्रत्यक्ष रणांगणावर पोचायच्या आधीच करून बसलो होतो. चुकीची बातमी मिळाल्यामुळंच असं झालं होतं. चूक म्हंजे कालेवालाच सगळं टाकून येणं ! जपानी लोकांनी आम्हांला सांगितलं होतं--तुम्ही तिथं पोचायच्या आतच इंफाळ पडून जाईल ! अन् शत्रूची सगळी रसद, अन्न न् शस्त्रसामग्री सगळीच तुमच्या हाती आलेली असेल ! उगाउगा हे ओझं डोंगराळ वाटेवरनं वाहुन नेणं गाढवपणाचं ठरेल ! ह्या चुकीची किंमत आम्हाला काळजाच्या रक्तानं चुकती करावी लागली होती.

वारंवार शत्रूला सामोरं जावं लागलं होतं आम्हाला. शत्रू सज्जच होता अन् आमच्याजवळ मात्र अन्न काय, रसद काय--सगळ्याचाच तुटवडा ! मशिनगन्स नाहीत की हातबाँब नाही ! एवढंच काय पण खंदक खणायजोग्या कुदळीपण आमच्याजवळ पुरेशा नव्हत्या. आम्ही सगळ्यात मार खाल्ला विमानं न् तोफांच्या लढाईत. ह्या दोन वस्तू आमच्या गांधी ब्रिगेडजवळ अजिबातच नव्हत्या. अन् आमच्या शत्रूनं सगळ्यात जास्ती मार खाल्ला तो हातघाईच्या लढाईत संगिनीच्या लढाईत.

लागोपाठ बंदुक चालवून आमची काडतुसं संपून जायची. मग ट्रेंचमधनं वर येऊन आम्ही झेपावून पडायचो संगिनी उंचावून. अशावेळी त्यांची फार पंचाईत व्हायची !

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात छामोल हेडक्वार्टर्समधे आमच्या हल्ल्याच्या योजनेनं नीट आकार घेतला. बारीकसारीक गोष्टी सगळ्या पक्क्या झाल्या. शत्रूचे तीन तळ होते : एक लाइमातीलला, एक यापू टेकडीवर अन् रिझर्व ऑस्ट्रेलियन लोकांचा पालेलच्या हवाई अड्ड्यावर. यापू न् पालेलवर एकाचवेळी हल्ला चढवायचं आम्ही ठरवलं. पालेल हवाई अड्डा उद्ध्वस्त करून विमानतळ ताब्यात घेतला की यापू टेकडी जिंकणं काही जड जाणार नव्हतं मुळीच.

जपानी सेनापति मेजर फुजियारांनी आमच्या डिव्हिजनल कमांडर मेजर-जनरल कियानींना कळवलं, की दोन मे-ला रात्री बारा वाजता जपानी सैन्य पूर्वेकडनं हवाई अड्ड्यावर हल्ला चढवेल. खानजोलमधे असलेल्या गांधी ब्रिगेडच्या युनिटनं पण त्याच दिवशी त्याच वेळेला पारुम-छुप्पनवरनं जाऊन दक्षिणेकडनं हवाई अड्ड्यावर हल्ला चढवायचा असं ठरलं. एकाच वेळी दोन्ही बाजूंनी हल्ला झाला की ते चांगले पेचात सापडतील. आणखी असंही ठरलं की त्याच्या दुसऱ्या दिवशी --म्हंजे तीन तारखेला--मिथाँग खुंगला असलेल्या गांधी ब्रिगेडच्या दुसऱ्या युनिटनं यापू टेकडीवर हल्ला चढवायचा. यापू टेकडीच्या माथ्यावर

सुरक्षित भागात ब्रिटिश-इंडियन गुरखा तुकडी होती पण पालेलहून विमान-दळाची मदत मिळाली नाही, तर त्यांचा काही टिकाव लागायचा नाही आमच्यासमोर. आदल्या रात्री हवाई अड्डयाचा कब्जा घेता आला, की मग यापू टेकडीपण पडलीच म्हणून समजा. मग एकत्रित येऊन लाइमातोलवर हल्ला चढवायचा.

ह्या योजनेच्या अंमलबजावणीची सगळी जबाबदारी गांधी ब्रिगेडचे कमांडर कर्नल आय. जे. कियानींच्यावर होती. पालेलवरच्या हल्ल्याचं नेतृत्व त्यांनी स्वतःच करावं अन् यापू टेकडीवरच्या मोहिमेचं नेतृत्व मेजर गढवालनी करावं — असं आधी ठरलं होतं. पण परिस्थितीच्या फेऱ्यात ते काही शक्य झालं नाही. मेजर गढवाल आजारी पडले. मधनंमधनं त्यांच्या पोटात असह्य कळा मारायच्या. कॉलिक किंवा ॲपेंडिसायटिसची पोटदुखी ! मोहिमेच्या आदल्या दिवशी पोटातल्या दुखण्यानं त्यांना अंथरूण धरावं लागल. तरी त्यांनी मोहिमेत भाग घ्यायचा हट्ट धरला. ब्रिगेडचे मेडिकल ऑफिसर होते मेजर अलीअकबरखान. ते काही तशी परवानगी देईनात. त्यामुळं शेवटच्या क्षणी योजनेत परत काही अदलाबदल करावी लागली. तीन मेच्या मोहिमेत कर्नल कियानींनी स्वतःच नेतृत्व करावं असं ठरलं. अन् पालेलच्या हवाई अड्डयावरच्या मोहिमेत जपानी सैन्याला मदत करायची जबाबदारी मेजर प्रीतमसिंगनी उचलली. मी, लेफ्टनंट मोहनसिंग, कॅप्टन गुरुबक्षसिंग, कॅप्टन साधुसिंग न् लेफ्टनंट लालसिंग — सगळे ह्या तुकडीत होतो.

रात्री अकरा वाजता आम्ही रवाना होणार आघाडीवर सेनापति कर्नल आय. जे. कियानी म्हणाले -- आपण सगळे एकदमच जेवायला बसू या.

म्हंजे आज रात्री पालेलला जाणारे अन् उद्या यापू टेकडीवर हल्ला चढवणारे — सगळे. ह्यांच्यातले बरेचजण काही परतायचे नाही आहेत, हे आम्हाला माहित होतं त्यामुळं हे तसं म्हटलं तर निरोपाचं जेवण होतं. पण सगळे भलतेच खुषीत होते. जणूकाही वऱ्हाडी मंडळी लग्नाला जायच्याआधी पंक्तीत बसल्यासारखं.

कर्नल कियानी थट्टेनं म्हणाले— प्रीतम, तुझ्या लोकांना इतक्या रायफल्स दिल्या नसत्या तरी चाललं असतं रे बहुतेक !

--का सर ?

मेजर प्रीतमसिंगनं विचारलं.

--तुझ्या तीनशे जणात अडीचशे तर 'सिंग'च आहेत की रे ! तुम्ही तर निव्वळ मारामारी करूनपण त्यांना हाकलून लावाल !

सगळे खो-खो हसले.

मेजर प्रीतमसिंग म्हणाले-- नाही, सर. आम्ही काही 'सिंग' नाही, आम्ही 'सिंह' आहोत. त्या ब्रिटिश सिंहाला हाकलून लावायलाच आम्ही जमलोयत ना -- पंजाब का शेर !

जेवताना सगळेच दोस्त. म्हणून लेफ्टनंट लालसिंगपण धिटाईनं म्हणाला

पण एक मुश्कील की बात आहे, सर तमाम बर्मामध्ये एकपण ब्रिटिश सिंह नजरेला पडला नाही. जिथं जावं तिथं गुरखे, नाहीतर पंजाबी, नाहीतर मराठे. ब्रिटिश सिंह कुठल्या बिळात दडून असतो ते मालूमच पडलं नाही.

कर्नल कियानी म्हणाले—लाल तोंडाचा सिंह बघायला तू अगदी काळजीत पडलायसं दिसतंय् !

ह्यावर प्रीतमसिंग म्हणाले—होणारच की ! त्याचमुळं पिताजींनी त्याचं नाव लालसिंग ठेवलंय् ना !

परत एकदा सगळे हसायला लागले. लालसिंग पण त्यात होताच.

जेवणखाण झाल्यावर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. प्रीतमसिंगजी मी अन् लालसिंग ॲसिस्टंट कमांडर मेजर गढवालना भेटून आलो. पोटदुखीनं ते अंथरुणाला खिळले होते. रेजमेंटल हेडक्वार्टर्समधे म्हजे खानजोलला ते राह्यले. पडल्यापडल्याच आपल्या जागी आलेल्या प्रीतमसिंगशी त्यांनी हात मिळवला.

लालसिंगला म्हणाले—लालतोंडचा माणसांचं रक्तपण लालच होतं का नाही ते परत आल्यावर सांग बर का !

लालसिंग हसला. माझ्याच वयाचा होता तो. अत्यंत उत्साही अन् चटपटीत.

गढवाल मला म्हणाले—हरगोविंद, तुला मोटर चांगली चालवता येते. पण विमान चालवता येतं का नाही ?

मी चाट पडलो. म्हणालो—नाही सर ! का बर ?

—तुझ्या ह्या कोबीछाप पगडीच्या खाली जे डोकं आहे, त्याच्यात काय एकपण स्क्रू नाही का रे ?

मी आपला बावळटासारखा बघतच राह्यलो.

—अरे पालेलवर कब्जा झाल्यावर तिथली विमानं चालवून आणावी लागतील ना !

आम्ही सगळेच हसायला लागलो.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरीसराय (गया)**

आम्ही मृत्यूशी दोन हात करायला चाललोय् अस कुणाला वाटलं असतं ? सगळेच थट्टामस्करी करतायत, हंसतायत खिदळतायत. एवढंच काय पण मेजर गढवालदेखील दुखणं विसरून थट्टा करतायत !

रात्री अकराला आम्ही निघालो. आम्ही तीनशेजण होतो. चढणीचा डोंगरी रस्ता. दोन्ही बाजूला घनदाट जंगल दरीच्या वाटेनं आधी आम्हाला जायचंय् वायव्येला मग आठएक मैल सरळ उत्तरेला. आम्हाला वाटलं पाहटेच्या आतच आम्ही पारूम-छुप्पन गावी पोचून जाऊ म्हणून. पारूम-छुप्पन गाव पालेलच्या हवाई अड्डयापास्नं अवघं दोन मैलावर दक्षिणेला. त्याच्यामुळं फक्त एकाच दिवसाची रसद आम्ही बरोबर घेतली होती पण वाट इतकी कठीण असेल अशी कुणालाच कल्पना नव्हती. पायवाटपण नव्हतीच म्हटलं तरी चालेल रात्रपण अंधारीच. त्यामुळं आमची वाटचाल फारच सावकाश होत होती. इलाजच नव्हता काही आमच्यात जवळपास सगळेच शीख.

पहाटेच्या आत काही पारूम-छुप्पनला पोचता आलं नाही आम्हाला.

दिवसा उजेडी जंगलाची झाडी सोडून गावाकडे जाणं काही शहाणपणाचं झालं नसतं. कारण जंगलापास्न गाव अंदाजे मैलाच्या अंतरावर. अन् ह्या मैलभराचा टापू अगदी ओसाड पडलेला एक झाड नाही मधे त्यामुळं पालेलच्या हवाई अड्डयावर येणाऱ्या-जाणाऱ्या विमानांनी आम्हाला सहजच बघितलं असतं.

शेवटी नाइलाजानं दिवसभर आम्हाला लपून रहावं लागलं जंगलातच


हळूहळू सूर्य मावळला. रात्रीचा अंधार दाटून आला.

तेव्हा मग प्रीतमसिंगनं आमच्यापैकी काहीजणांना एकत्र बोलवून घेतलं. अन् आक्रमणाची योजना समजावून सांगितली.

[ क्रमशः ]



## राज्यनाट्यस्पर्धेतील एक लक्षणीय निर्मिती




# हे समय उत्ताल समय

पुष्पा भावे

'बहुरूपी' या नाट्यसंस्थेने अजितेष बंदोपाध्याय यांच्या मूळ बंगाली नाटकाचा अशोक शहाणेकृत अनुवाद 'हे समय उत्ताल समय' राज्य नाट्यस्पर्धेतील प्रथम फेरीत सादर केला. महाभारताचे मुसळपर्व आणि आजच्या समाजातील विमनस्कता ह्या दोन अर्थाच्या पातळ्या एकमेकावर आरोपित करून बंदोपाध्यायांनी हे नाटक उभे केले आहे. महाभारतासारख्या ग्रंथाचा अन्वय प्रत्येक काळाशी असतो, म्हणूनच आपण त्यास महाकाव्य म्हणतो. किंबहुना कोणत्याही समकालीन अनुभवाच्या तळाशी जाणारा लेखक नकळतपणे त्या देशातील आदिमकथातील अनुभवापाशी पोचतो. जिथे लेखकाचा दृष्टिकोन आदर्शवादी, उपदेशात्मक असतो तिथे रूपकात्मक रचना निर्माण होते परंतु दोन दूर असणाऱ्या कालखंडातील मानवी अनुभवातील अन्वय शोधणारा नाटककार गोष्ट सांगणे व त्यातून तात्पर्य सांगणे, कालक्रमानुसार तर्कगत विधान मांडणे याच्यापलीकडे जाऊन नाटकात जुन्या नव्या अनुभवांची अशी काही रचना करतो की त्यातून अन्वय व्यक्त होतो–त्याचे विश्लेषण होत नाही. पाश्चात्य कादंबऱ्या, काव्य, नाटक यामध्ये ग्रीक व ख्रिस्ती आदिमकथा समकालीन अनुभवाशी वेगवेगळ्या रीतींनी नाते जोडताना दिसतात. साहित्यामध्ये गेले काही वर्षे होणारे हे प्रयत्न केवळ इतिहासाशी नाते जोडण्याचा खटाटोप नसून मानवी अनुभवातील अपरिहार्य चक्रगती समजावून घेण्याचा, मानवी वेदनेचे सनातन स्वरूप व्यक्त करण्याचा तो प्रयत्न असतो. 'हे समय उत्ताल समय' या नाटकात, नाटककाराने, महाभारतीय युद्धानंतरचा काळ निवडण्यात, महान आदर्श मानलेल्या व्यक्तींचा अंत दर्शविण्यात समकालीन अनुभवाचा पोत व्यक्त करण्याचे नाटककाराचे सामर्थ्य प्रारंभीच

प्रस्थापित केले आहे.

या नाटकाचा पडदा वर जात असतानाच नटांचा कोलाहल ऐकू येतो. नंतर एक साध्या वेषातील मनुष्य पुढे येतो, बाकीचे सारे नट कोपऱ्यातील पायऱ्यावर येऊन बसतात. सूत्रधार आपल्याला सांगतो की कपडे, रंगभूषाकार आलेला नाही कारण 'सीआरपीं'ने त्यांना घेराव घातला आहे. येथपर्यंतची सुरवात अलीकडच्या काही नाटकातून विशेषत: एकांकिकातून, आपल्याला परिचित असणारी आहे. पण इथे अचानक टेपरेकॉर्डर सुरू होतो . 'ही सुरवात काही खरी नाही. खरं म्हणजे हा निव्वळ वैताग असणारा ड्रॅमटिक स्टंट आहे. खरं तर ही काँटेंपोरॅनिटी ही समकालीनताच आम्हाला हॉंट करत होती दिवसरात्र... संकटात सापडल्यावर आपल्याला जशी देवाची आठवण होते, आईवडिलांची आठवण होते, तसंच देश आजारी असताना, सिरीयस असताना आम्हाला वाटलं महाभारताकडे जावं...आजच्या काळात देखील महाभारताच्या एखाद्या भागाला काही रेलेव्हन्स आहे का प्रासंगिकता आहे का, व्हॅलिडिटी आहे, का? त्याच्यामुळे मॉडर्न ड्रेस असला तर उलट सोयीचंच होईल.' (इंग्लिश कादंबऱ्यातील 'ग्रे सूटातील' खिस्त काही वाचकांना माहीत असेलच.) या पहिल्या निवेदनानेच प्रेक्षकांच्या मनात विशेष अपेक्षा निर्माण होतात. विशेषत: प्रेक्षकांना विश्वासात घेण्याच्या पद्धतीमुळे तर, नाटककार व आपण सारे मिळून वर्तमानकाळ व महाभारतीय मुसळपर्वाचा अन्वय शोधणार आहोत अशी भावना निर्माण होते. परंतु नंतर नाटक जसे उलगडत जाते ती प्रक्रिया फार स्पष्टीकरणात्मक वाटते. नाटक सादर करताना विविध दृश्यमाध्यमे वापरूनही शब्दावर फार भर दिल्यासारखा वाटतो; किंबहुना शब्दातून जे सांगितले तेच दृश्यातून सादर केले गेले अशी प्रक्रिया फार वेळा आवृत्त झाल्यामुळे दृश्यमाध्यम कमकुवत झाले व परिणामी भडक वाटू लागले.

समया या स्त्रीच्या शस्त्रक्रियेच्या दृश्याने नाटकातील हालचालींना प्रारंभ होतो. ही शस्त्रक्रिया करणारे सगळेच 'थिएटरचे आर्टिस्ट' आहेत; 'ईश्वराप्रमाणे निश्चित निर्णय घेऊन ते काम सुरू करणार आहेत' असे सांगितले जाते. म्हणजेच नाटचारंभीच नाटकातील वास्तवाची स्वतंत्रता प्रस्थापित केली जाते...मुसळपर्वाच्या कथानकाला प्रारंभ होतो त्यावेळी विनाशाचे वातावरण मागील पडद्यावर प्रकाशयोजनेच्या साहाय्याने दर्शविले जाते. श्रीकृष्णाचा उद्वेग एका स्लाईडच्या रूपाने उजव्या बाजूला दिसतो आणि एक नट जीवनातील विनाशाच्या शोकापलीकडील विश्वसातत्याचा अनुभव मुक्तशैलीतील काव्यात सादर करतो. परंतु त्यातील भावनेने आपण भारावले जाऊ नये अशी नाटककाराची इच्छा दिसते. त्यामुळे काव्य संपल्यावर तो नट वळून म्हणतो 'आणखी म्हणायला पाहिजे का?' मुसळपर्वातील दोन पिढ्यांचा

संघर्ष, प्रस्थापित व सामान्यांचा संघर्ष आणि श्रीकृष्णातील असामान्यत्व व्यक्त करणाऱ्या पुढील प्रवेशात सांब, शारण, अंधक, किशोरी, अमन ही तरुण पिढी व विश्वामित्र, कण्व, नारद हे मुनी यांच्यातील संघर्ष रंगविला जातो. त्याचबरोबर जुन्या मूल्यांचे, व्यक्तिमाहात्म्याचे अवमूल्यन सूचित करण्यासाठी सात्यकीव कृतवर्मा या महाभारती वीरांची कुचेष्टा होते. भारतीय युद्धानंतरच्या तरुण पिढीच्या कर्तृत्वाला आव्हान नाही म्हणून ती दिशाहिन झाली आहे आणि पूर्वीच्या पिढीवर दोष लादून वर्तमानकाळातून मुक्त होऊ पहात आहे. समकालीनत्वाचा अन्वय येथे नेमका पोचतो तसेच पुढील नाटकात येणारे, विनाशापासून आत्मसंरक्षण करतानाही स्वश्रेयाला छेद देणारे राजकारण अनेक झेंडे. नर्तकीच्या नृत्यातून घडविलेला कॅबेरेचा आभास, निर्वासितांचे तांडे यातून आजचा समाज व मुसळपर्व या दोन्ही पातळ्यावर नाटक अर्थपूर्ण होते. बलराम व श्रीकृष्णाच्या अंताचे कथानक, असामान्यातील मानवी अपूर्णता आणि त्या अपूर्णतेला जिंकण्याचा प्रयत्न व्यक्त करते.


'हे समय उत्ताल समय' या नाटकाचे संकल्पन अत्यंत गहन असे आहे. अशोक शहाणे यांनी मूळ बंगालीवरून केलेला मराठी अनुवाद प्रामाणिक असावा. परंतु लेखकाची स्वतःच्या संकल्पनेविषयी दीर्घ स्पष्टीकरण देण्याची हौस नाट्यविघातक ठरली आहे. या नाटकातील समूहदृश्ये आणि प्रकाशयोजना इतकी प्रभावी होती की शब्द बाहुल्याने या दृश्यमाध्यमाचा अवमान करण्याची गरज नव्हती. यामुळे 'बहुरूपी'ने सादर केलेली नाट्यनिर्मिती काहिशी भडक वाटली.

## निर्मिती, दिग्दर्शन

दिग्दर्शक कमलाकर नाडकर्णी यांनी समूहदृश्यांचे संयोजन कल्पकतेने केले होते. दिलीप खांडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रकाशयोजना नाट्याभिमुख केली. कालपुरुषाचे व नर्तकीचे नृत्य करणाऱ्या पूर्णिमा कुळकर्णी व वैशाली यांनीही रमेश पुरवांच्या दिग्दर्शनाखाली नाट्यानुभव सार्थतेने व्यक्त करण्यास मोलाची मदत केली. तरुण पिढीचा अनुभव व्यक्त करणारी समूहदृश्ये विशेष मुक्तपणे सादर झाली. त्यातही अच्युत देशिंगकरांचा नामोल्लेख आवश्यक आहे. नाटकाचा वेगळेपणा समजून न घेता अत्यंत बेजबाबदारपणे भूमिका केली ज्योत्स्ना जीत यांनी. एक तर अनेकदा नाटकात भूमिका करूनही या नटीचे उच्चार व रंगमंचावरील चालणे सुधारलेले नाही; त्यात भरीला वाक्यांचे विस्मरण आणि लाकडासारखे निर्जीव हात; यामुळे एक महत्त्वाची भूमिका समयी त्यांनी हास्यास्पद केली. तसेच सूत्रधाराची भूमिका करणाऱ्या हेमचंद्र अधिकारांनाही भूमिकेचा तोल सावरता आला नाही. अच्युत देशिंगकर वा मोहन वैद्य,यांनी ही भूमिका अधिक चांगली सादर केली असती. मराठी नाटकात श्रीकृष्णाची भूमिका वेगळ्या तऱ्हेने सादर करणे अत्यंत अवघड आहे. या नाटकातील श्रीकृष्ण, अनिल चिटणीस

# केवळ तुमच्या आठवणीसाठी

(थोडेसे हितगुज)



आमच्या केंद्राला भेट देवून तेथील डॉक्टरांशी विचारविनिमय करण्याची कदाचित् तुमची इच्छा असेल. हें केवळ आपल्याला आठवण करून देण्यासाठीं. तुमचें स्वागतच होईल.

काही बाबतींत तुम्हांला माहिती हवी असेल, शंकांचे निरसन करून घ्यायचें असेल, एखादी बाब निष्कारण सतावत असेल आणि या सर्वांमुळे तुम्ही थोडेफार मागेपुढेहि करीत असाल, काहीहि असो, डॉक्टरांशी सल्लामसलत केल्याने मार्ग निश्चितच सापडेल.

तुम्ही वाचलेलें साहित्य पुरेसें नसावें सगळ्याच गोष्टींची चर्चा छापील स्वरूपांत पुढें मांडतां येत नाही. वैयक्तिक प्रश्न तर नाहीतच नाही.

**आजच कुटुंब कल्याण नियोजन केंद्राला भेट द्या**

72/453

यांनी डौलाने, समंजसपणाने सादर केला.

सरकारी स्पर्धेतून सादर होणाऱ्या नाटकांचे गेले काही वर्षे ठरीव साचे झाले आहेत. अशा वेळी एक अत्याधुनिक अनुभव व्यक्त करणारे समर्थ नाटक निवडणाऱ्या 'बहुरूपी'चे अभिनंदन करावयास हवे. मात्र या नाटकाच्या प्रयोगाचा पुन्हा एकदा अनुवादकार व दिग्दर्शक यांनी विचार करणे आवश्यक आहे. या नाटकातील गहन अनुभव त्या वजनानेच सादर व्हायला हवा. सुदर्शन चक्र रंगमंचावरून उडत जाणे, त्याला प्रेक्षकांनी टाळ्या देणे ही गोष्ट शिरगोपीकरांच्या नाटकात शोभणारी असली तरी या नाटकाशी विसंगत वाटते. दृश्यमाध्यमाचा विविध तऱ्हेने उपयोग करताना त्या माध्यमावर निष्ठा हवी : सारा अनुभवच दृश्यतेच्या मुशीतून व्यक्त व्हावयास हवा. या नाटकात दृश्यांना सजावटीचे, विशदीकरणाचे स्वरूप आल्याने निर्मिती भडक वाटली. तंत्रकौशल्य नाट्याभिमुख झाले नाही, तर संगीत नटाच्या लोकप्रितेवर चालणारी जुनी नाटके आणि तंत्रज्ञाच्या चमत्कारावर चालणारी, नवी नाटके यात अंतर राहणार नाही.

वर म्हटल्याप्रमाणे पुन्हा एकदा या नाटकाचा विचार व्हावयास हवा; कारण आपल्याकडे एकदा नाटक एका दिग्दर्शकाने सादर केले की जणू ते वज्रलेप झाले असे मानले जाते. जणू दुसऱ्या पद्धतीने ते सादर होणे शक्यच नाही. त्यामुळे अनेकदा चांगल्या नाट्यकृतींच्या शक्यतांचे पुरेसे अन्वेषण होत नाही. प्रायोगिक रंगमचावरील दिग्दर्शक वा प्रेक्षक हेही संकेताच्या चौकटीबाहेर पडू शकत नाहीत ते हे असे ! ☐

## वंग रंगभूमीची शताब्दी

प्रायोगिक रंगभूमीवर कार्य करणाऱ्या दिग्दर्शक, नट, नाटककारांना संकेताच्यापलीकडे जाण्याची कुवत हवी असे आपण म्हणतो. पण संकेतांचे, परंपरेचे सूक्ष्म ज्ञान असल्याशिवाय डोळसपणे प्रयोग करता येत नाहीत याचे अनेकदा आपल्याला विस्मरण होते. रंगभूमीचा इतिहास केवळ पुस्तकाच्या पानात राहून पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करू शकत नाही. जुन्या नाटकांच्या स्मृतीचे केवळ जतन न करता त्या रंगमंचावर साकार केल्या तरच त्या रंगमंचावरील आजच्या पिढीपर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचतील. आजच या गोष्टीचे स्मरण झाले ते वंग रंगभूमीच्या शताब्दीच्या आलेल्या वृत्तामुळे ! (वंग रंगभूमीची शताब्दी : कमला भागवत : केसरी, २४ डिसेंबर ७२) ७ डिसेंबर १८७२ रोजी 'नॅशनल थिएटर्स' संघाने दीनबंधु मित्र लिखित 'नीलदर्पण' या नाटकाच्या कलकत्त्यातील जोडाशांको भागातील संन्यालांच्या वाड्याच्या अंगणात केलेल्या नाट्यप्रयोगाची शताब्दी वंग नाट्यप्रेमींनी यदा अभिनवे पद्धतीने साजरी केली. एका शतकापूर्वी ज्या वाड्यात

हे नाटक सादर झाले होते त्याच वाड्यात, पेट्रोमॅक्सच्या बत्त्यांच्या उजेडात, जुने नेपथ्य गोळा करून, या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. इतकेच काय पण स्त्रीभूमिका पुरुषांनीच केल्या. ध्वनिक्षेपक न योजता जुन्या अतिरेकी पद्धतीने हे नाटक सादर केले. इतिहास जिवंत करण्याचा हा प्रयत्न ग्यानेश मुखर्जी यांनी अविरत मेहनत घेऊन केला. भाषाशास्त्रज्ञ आपल्या भाषाइतिहाससंशोधनात ज्याप्रमाणे Historical Reconstruction चा आधार घेतात, त्याप्रमाणे रंगभूमीच्या इतिहासाविषयी कुतुहल असणाऱ्यांनीही तो प्रयत्न करून पाहाण्यासारखा आहे. आपल्याकडे संस्कृत नाट्यप्रयोग होतात परंतु त्यामागे ही दृष्टी नसते. शंभर वर्षापूर्वीचे राहू द्या, परंतु मुंबईत प्रायोगिक चळवळीच्या प्रारंभी जी नाटके, ज्या एकांकिका सादर केल्या गेल्या त्यांचे या स्वरूपात दर्शन घडविल्यास प्रायोगिक रंगभूमीचे सिंहावलोकन करण्यास निश्चित मोलाची मदत होईल. एखाद्या सरकारी स्पर्धेच्या निमित्ताने 'माणूस नावाचे बेट', 'एक शून्य बाजीराव' 'खुर्च्या', तेंडुलकर, देशपांडे ह्यांच्या एकांकिकांचे प्रयोग, सादर केले गेले तर आज रंगभूमीवर असणाऱ्या तरुण पिढीच्या दृष्टीला उद्‌बोधक परिणाम लाभेल !

□ □ □


माणूसमधून
प्रसिद्ध झालेली
अरूण साधू
यांची
लेखमाला

फिडेल
चे
आणि
क्रांती

पुस्तकरूपात
प्रसिद्ध झाली

राजहंस
प्रकाशन

# शतपावली

पृष्ठ १५ वरून

चौकशी करीत, चहापाणी पीत. म्हणजे, त्यांनी केळकर कुटुंबाचे संबंध अखेरपर्यंत तोडले नाहीत. पुढे एक जून छत्तीसला कोल्हटकर पुण्यालाच आपल्या धाकट्या भावाकडे औषधपाण्याला आले नि वारले. त्यावेळी केळकरांच्या डोळ्यात पाणी तरळलेलं मी स्वत: पाहिलेलं आहे !

कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर त्यांना आलेली चार पेटारे भरतील इतकी हजार तरी पत्रं शिल्लक होती. त्यातली शे-दोनशे तरी लेखक—कवींची असावीत. वाङ्मयीन इतिहासाच्या दृष्टीने ती पत्रं म्हणजे साहित्याचा ठेवा होती. पण कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर ती पत्रं कुणाच्याही हाताला लागली नाहीत. आता तर ती नष्टच झाली असणार. तिच कथा भास्करराव तांब्यांच्या पत्रांची. एक गोणभर तरी पत्रं तांब्यांच्या मागे उरली होती. कुठे गेली ती पत्रं ? आपल्याकडे हीच रड आहे. थोर माणसांचा पत्रव्यवहार आपल्या-अजिबात दुर्लक्षिला जातो. तिच स्थिती माधवराव पटवर्धनांच्या पत्रांची झाली.

कोल्हटकरांचं हिराबाई प्रकरण नव्हत असं नाही. ते माझ्याजवळ त्याबाबत काही बोललेले नाहीत असंही नाही. पण त्या प्रकरणाचं जं इंटरप्रिटेशन सध्या केलं जातंय ते बरोबर नाही. आता थोर कलावंतांच्या बाबतीत आपण थोडं अधिक उदार आणि क्षमाशील झालं पाहिजे. कोल्हटकरांना सर्वच परिचितांबद्दल उत्कटता नि उमाळा असे. त्या उमाळचाने त्यांनी हिराबाईंकडे पाहिलं असेल. हिराबाई दिसायला कशा होत्या मला माहीत नाही. वर्णनं करतात त्यावरून त्या चार्मिंग असतील नि बाईंचा चार्म कोल्हटकरांना अपील झाला असेल. नाही असं नाही. पण आपण आता तो काळही लक्षात घेतला पाहिजे. कोल्हटकरांचा पींड मुळातच सौंदर्यासक्त होता. तशात, त्या काळात लग्नं अनेकदा माणसांवर लादली जात. तेव्हा ही व्यस्त परिस्थिती लक्षात घेऊनच कलावंताच्या बाबतीत थोडी अधिक उदार दृष्टी दाखवली पाहिजे. कलावंत लेखकाची अब्रू चव्हाट्यावर मांडण्याची दृष्टी नको. त्याला समजावून घेतला पाहिजे. कलावंत जात्याच उत्कट असतो. ती उत्कटता एक वेळ अंधप्रकारची असेल, पण कलावंताला ती अत्यावश्यक असते. म्हणून काही गोष्टी कलावंताच्या बाबतीत आपण थोड्या क्षम्य समजल्या पाहिजेत. आता कलावंत कोणाला म्हणायच ते ज्या त्या समाजाने ठरवायचं. आपल्याकडे आपण सर्वांनाच कलावंत म्हणतो ! आपल्याकडे कालीदासही कलावंत, कोल्हटकरही कलावंत, खांडेकरही कलावंत नि काकोडकरही कलावंत ! सारेच कलावंत ! तेव्हा तेवढं तारतम्य ज्याने त्याने दाखवलं पाहिजे नि कलावंताला उदार मनाने क्षमा केली पाहिजे. ' तुम्ही Nature of genius हे पुस्तक मुद्दाम

मिळवून वाचा. त्यात ह्या प्रश्नाचा छान उहापोह केलेला आहे.'

गडकरी–कोल्हटकरांच्या आठवणीत भाऊ निदान तासभर तरी डुंबले. त्यांच्या कृतज्ञ स्मृतींनी त्यांचं चित्त शुचिर्भूत झालं. त्यांच्या डोळ्यासमोर पन्नास वर्षांपूर्वीचा कालपट सरकू लागला. बेभानपणे ते सांगू लागले,

'माझ्यावर कोल्हटकर–गडकऱ्यांचा जेवढा परिणाम झालेला आहे त्याहूनही अधिक कालीदासाचा नि बाणाचा झालेला आहे. उत्तररामचरित्राच्या पहिल्या अंकासारखं अनुपमेय सुंदर काहीही नाही. सुरुवातीपासूनच माझा कल्पनारम्यतेकडे ओढा आहे.मी रोमँटिक स्कूलचाच लेखक आहे. इंटरनंतर सोळा-सतरा साली मी कोकणात सावंत-वाडीला गेलो. तिथून शिरोड्याच्या शाळेत शिक्षकाचं ध्येयवादी आयुष्य जगण्यासाठी चालत चालत आलो. शाळेत शिक्षक असताना वीस ते तीस सालांपर्यंत मी सपाटून लेखन केलं. कविता, विनोदी लेख, निबंध, परिक्षण असं नानातऱ्हेच फुटकळ लेखन मी ओळीने दहा वर्षं करीत होतो. ती माझी उमेदवारीच होती. माझ्यातला लेखक तेव्हा तयार होत होता. अ. का. प्रियोळकरांचे बंधु त्या काळात 'स्वयं-सेवक' नावाचं मासिक चालवित असत. त्यातही मी लिहिलंय. 'उद्यान' 'वैन-तेय' 'नवयुग' वगैरे मासिकांतून मी भरपूर लिहिलं. उमेदवारीतल्या दहा वर्षांच्या लेखनावर मला काहीही मिळालं नाही. मात्र ते पुस्तकरूपानेही संग्रहीत केलेलं नाही. ह्या उमेद-वारीतल्या माझ्या सर्व लेखनावर गडकरी–कोल्हटकरांच्या लेखनपद्धतीची अगदी गडद छाया होती. ते अनुकरणा-त्मक लेखन होतं. हे लेखन कमी कमी करून मी कथाकादंबऱ्यांकडे वळलो नि त्यात मला माझी आयडेन्टीटी सापडली. विनोदी लेख लिहायला मला प्रयास पडायचे, पण कथा मला पटापट सुचा-यच्या. तेव्हा कथा कादंबऱ्या हेच आपलं क्षेत्र हे वेळीच ओळखून मी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केलं. तरीसुद्धा 'हृदयाची हाक', 'कांचनमृग' ह्या कादंबऱ्यांवर अनुकरणाची छाया आहे. 'उल्का' कादंबरीपासून मात्र माझं मी स्वतःच्या धाटणीचं स्वतंत्र लेखन करू लागलो सर्व अर्थांनी 'उल्का' ही माझी स्वतंत्र कृती आहे नि म्हणूनच ती मला अतिशय प्रिय आहे. 'उल्के'-पासून माझी स्वतंत्र पायवाट सुरू झाली; कोल्हटकर–गडकऱ्यांची माझ्या मनावर बिंबवलेली जबरदस्त छाप 'उल्के'पासून गेली.

त्याच्या अगोदर सत्तावीस सालची एक मजेशीर घटना सांगतो. माधवराव जोश्यांचं 'म्युनिसिपालीटी' नाटक नुकतंच रंगभूमीवर आलं होतं नि नगरपालिकेच्या कारभाराचे त्या नाट-कात वाभाडे काढलेले होते. त्यामुळं नगरपालिकेच्या कारभाराबाबत सर्वांना घृणा आलेली होती. ह्या अपप्रचाराला शह देण्याच्या हेतूने एक हजार रुपयांचं नाट्यलेखन पारितोषिक जाहीर झालं होतं, नगरपालिकेचा कारभार हा

स्वराज्याचा पाया आहे अशी काही मंडळींची ठाम श्रद्धा होती. म्हणून त्यांनी हे पारितोषिक, जो नगरपालिकेच्या कारभाराचे स्वच्छ चित्र नाटचरूपाने लिहिल त्याला लावलं. अहो, हजार रुपये म्हणजे माझा तीन वर्षांचा पगार झाला! मी ताबडतोब नाटक लिहून स्पर्धेला पाठवलं. मात्र मला पारितोषिक मिळालं नाही. फायदा असा झाला की बेळगावचे कवि 'किरात', म्हणजे सोमण त्या परिक्षक मंडळावर होते. त्यांना माझं 'रंकाचं राज्य' हे स्पर्धेसाठी पाठवलेलं नाटक फार आवडल. त्यांनी त्याची भलावण डॉ. साठ्यांकडे केली. डॉ. साठे त्या नाटकाबद्दल 'नाटचकलाप्रसारक' कंपनीच्या लेलेबंधूंकडे बोलले, त्यांना नाटक आवडलं आणि त्यांनी ते रंगभूमीवर आणल. त्याचे काही प्रयोगही झाले. मी त्याचा एक प्रयोग सांगलीला पाहिला. सत्तावीस सालची गोष्ट आहे ही. त्या नाटचप्रयोगात कमलाबाई नावाची चांगली तरतरीत नटी काम करायची. 'रंकाचं राज्य' चालल नाही. पण माझ प्रसिद्ध झालेलं ते पहिलं पुस्तक! त्या नाटचप्रयोगाला नटवर्य केशवराव दाते आले होते नि त्यांना ते नाटक आवडलंही होतं. पुढे त्यांनी त्यांच्या 'महाराष्ट्र' आणि 'समर्थ' मंडळांसाठी माझ्याकडे नव्या नाटकाची मागणीही केली होती. पण ३०–३५ चा काळ हा मराठी नाटक मंडळचा कोसळण्याचा काळ होता. मी काही नवं नाटक लिहिलं नाही. 'अमृत' ह्या माझ्या चित्रपटाचं नाटकात रूपांतर करून द्या, असं बालमोहनचे दामुअण्णा जोशी सांगत. पण त्यांच्या मंडळींची कुवत यथायथाच होती. तेव्हा मला उत्साह वाटला नाही. पुढे साहित्य संघाच्या डॉ. भालेरावांनी हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो?'चं नाटक करून द्या म्हणून मला सांगितलं होत. ते तर अशक्यच होतं. आता माझ्या नावावर 'रंकाच राज्य' हे फक्त एकमेव नाटक आहे. बालगंधर्वांनीही माझ्याकडे कधी नाटकाची मागणी केली नव्हती.'

'आता तुम्ही विचाराल की शिरोड्यासारख्या कोकणातल्या दूरच्या खेड्यात राहून तुम्ही लेखनसाधना कशी केली? तर त्याचं असं आहे की, मी वाचनाचा भोक्ता मूळपासूनचाच. माझे मित्र मला उत्तम उत्तम पुस्तकं पाठवायचे. माडखोलकरांनी एकदा टॉलस्टॉयची पुस्तकं पाठवली. वि. ह. कुलकर्णी आणि कै. दौंडकर उत्तम पुस्तकं पाठवायचे. दौंडकरांकडे चांगले कथासंग्रह होते. शिवाय सांगलीचे प्रा. रामभाऊ जोशी आणि मुंबईच्या 'विल्सन'चे प्रा. दाभोळकर हे दोघेही शास्त्रविषयाचे प्राध्यापक माझे गेले पन्नास वर्षांचे मित्र आहेत. त्यांचं वाङ्मयप्रेमही फार उत्कट आहे. त्यांनी मला चांगली इंग्रजी पुस्तकं शिरोड्याला पाठवली. ह्या उत्तम वाङ्मयाच्या सतत वाचनामुळे माझ्यातला लेखक तिथे इतर वाङ्मयीन वर्दळ नसतानाही जिवंत राहिला.

'शिरोड्यापासून मला पहाटेस

उठण्याची सवय लागली आहे. ती आजतागायत सोबतीला आहे. मी रोज सकाळी साडेपाचला उठतो नि रात्री दहाला झोपतो. जागरणं मी करीत नाही. नाटक-सिनेमा शिरोड्याला नव्हतेच. मला तसा त्यांचा षौकही नाही. मी पुढे अडतीस साली चित्रपटाच्या क्षेत्रात कोल्हापुरात आलो खरा. पण तेव्हाही विनायकरावांनी ज काही दोन-चार चांगले इंग्रजी चित्रपट दाखवले असतील तेवढेच. एरव्ही मी चित्रपट पाहिलेले नाहीत. मी नाटका-सिनेमांचा भोक्ता नव्हेच मुळी. तेव्हा अनायासे जागरणं झालीच नाहीत. शिरोड्याला निवांतपणा भरपूर होता. म्हणून मी भरपूर आणि भराभर वाचलं. सांजसकाळ फिरणं, वाचन करणं आणि शाळेत शिकवणं हे तीनच माझे उद्योग होते. विद्यार्थ्यांचे पालकच काय ते भेटायला यायचे. इतर वर्दळ नव्हती. शाळेतली मधली सुटीही चांगली तासभर असे. त्या मधल्या सुटीतही मी वाचीत बसे. त्यावेळी मी अरवलीला आप्पा रेगे यांच्या घरात रहात होतो. रविवार हा त्या काळातला माझा लेखनाचा दिवस असे रविवारी माझी तंद्री भंग करायला शिरोड्यात कुणीच येत नसे. त्यामुळे मी सगळा दिवस एकटक लेखनात घालवीत असे. लेखनात मला एक प्रकारचा सूर सापडावा लागतो. तो सापडला की मग माझी तहानभूक हरपते नि मी भरभर लिहायला लागतो. 'क्रौंचवध'ची प्रस्तावना मी अशीच तंद्रीत लिहिलेली आहे. बायको एकसारखी यायची नि म्हणायची 'आंघोळ उरका', 'जेवण करून मग लिहा.' पण मी तिला सांगितलं, 'तू बिल्कुल व्यत्यय आणू नकोस. माझं हे लेखन पुरं झाल की मग सर्व काही.' तेव्हा, सूर सापडल्यावर लिहिणं ही माझी सवयच आहे. भाग्याची गोष्ट इतकीच मी जे जं लिहिलं त्याचं कौतुक होत गेलं. त्यामुळे सतत उमेद वाढत गली.

'मात्र एक लक्षात ठेवा की लेखनाच्या पहिल्या दहा वर्षांत मला एकही पैसा मिळाला नाही. फक्त वाचकांची शाबासकी मिळाली. लेखनावर पैसा मिळायचा असतो ही त्यावेळी कल्पनाच नव्हती. मासिक 'मनोरंजन'ने मला पहिलं मानधन सतरा रुपये पाठवलं. हळूहळू 'उद्यान', 'किर्लोस्कर', वगैरे मासिकं कथेचा पाच रुपये मोबदला पाठवू लागली. 'किर्लोस्कर'ने पाचाचे साडेसात, बारा, पंचवीस असे वाढवीत नेले. त्याची संसाराला फारच मदत झाली. पुढे चित्रपटांनीही संसाराला फार चांगला हातभार लावला. शिरोड्याला मला सुरुवातीला अवघा पंचवीस रुपये पगार होता. पण स्वस्ताईही खूप होती. दोन पैशांना नारळ मिळायचा! पंचवीस रुपयात चार माणसांचा अंगापुरता संसार कोकणी खेड्यात त्यावेळी व्हायचा. चैनीचं नावच नव्हतं. पोटभर जेवण मात्र मिळायचं. तसं पाहिलं तर तीस सालापर्यंत मराठी लेखकांना त्या काळात काय मिळायचं? 'हृदयाची हाक' नि 'कांचनमृग' ह्या माझ्या पहिल्या दोन

कादंबऱ्या मी 'दीड रुपया पान' ह्या भावाने कर्नाटक प्रेसला विकल्या. पण मला त्यांनी दिलेले तीनशे सत्तावन रुपयेसुद्धा त्या काळात फार वाटले, कारण माझ्या वर्षाच्या पगाराइतकीच ती रक्कम भरली !

'शिरोड्याच्या माझ्या झिऱ्हाडी खूप खूप थोर साहित्यिक प्रसंगपरत्वे येऊन गेले. श्रीपाद कृष्ण, केळकर, माधवराव पटवर्धन, अत्रे वगैरे आले होते. अत्र्यांचा किस्सा सांगतो. माझ्या 'छाया' चित्रपटाच्यावेळी पुढील रूप रेषेची चर्चा करण्यासाठी अत्रे अंबोली मार्गे शिरोड्याला रात्री बारा वाजता येत होते. त्यावेळी अंबोली घाट वहाना-साठी रात्रीचा बंद असे. तेव्हा अत्र्यांनी घाट पहारेकऱ्याला ठोकून दिलं, 'मी सावंतवाडीच्या राजेसाहेबांचा नातेवाईक आहे !' ते संस्थानी दिवस होते. पहारे-करी घाबरला. त्याला वाटलं, हा आड-दांड माणूस नक्कीच राजेसाहेबांचा आप्त असणार ! त्याने निमूटपणे रात्रीची घाटातून गाडी न्यायची अत्र्यांना परवानगी दिली, नि अत्रे शिरोड्याला माझ्याकडे मध्यरात्री हजर झाले ! त्याकाळात आम्हा लेखक मंडळीमध्ये पूर्वग्रह कमी असायचे. एकमेकाच्या वाङ्मयाची आम्ही कदर करायचे. आमच्या पुस्तकांवर लवकर अभिप्राय प्रसिद्ध व्हायचे. मीही माझ्या समकाली-नांच्या कृती वाचीत असे. आता वाता-वरण बदललंय म्हणे. आता पाटर्या देण्या-घेण्याचा काळ सुरू झाला असल्याचं सांगतात काहीजण.

'मी अडतीस साली कोल्हापूरात मा. विनायकांच्या बोलावण्यावरून आलो. सुरुवातीला आम्ही एकाच बंगल्यात रहायचे. घराचा अर्धा भाग त्यांच्याकडे होता. अर्धा माझ्याकडे होता. त्यावेळी कोल्हापूरातले प्रमुख लेखक म्हणजे फडके आणि माधवराव पटवर्धन. त्या दोघांशीही माझे संबंध प्रेमाचे होते. फडक्यांची नि माझी लेखनात काय झडली असेल ती असो, पण आमच्यात जाणं-येणं, एकमेकांकडे जेवणं वगैरे प्रेमाचे प्रकार होतेच. माधवराव मात्र फार संकोची होते. त्यांना दहा वेळा बोलवावं तेव्हा एकदा येत. त्यांना शेवटचा आजार जडला त्यावेळची गोष्ट. ते फार अशक्त झाले होते. काविळीवर उपाय चालले होते. पुढे पुढे तर चालतानाही ते लंगडू लागले. मी त्यांना म्हटलं आपण मिरजेला जाऊन तुमची तब्येत डॉ. भडकमकरांना दाखवूया. ते तयार झाले. मी त्यांना नि माझ्या बायकोला घेऊन मिरजेला गेलो. माझ्या बायकोचीही तेव्हा प्रकृती ढासळू लागली होती. तिला स्प्रू सुरू झाला होता. पुढे तर रक्त-दाबाने सहा महिने ती बिछान्याला खिळली होती नि अखेर त्याच दुखण्यात ती गेली. मिरजेला डॉ. भडकमकरांनी माधवरावांना तपासलं नि मला एकी-कडे बोलवून घेतलं. मला वाटलं उषा-च्याच दुखण्याबद्दल बोलत असावेत. पण प्रत्यक्षात ते माधरावांबद्दल बोलले की त्यांच्या यकृताला मॅलीग्नंट व्याधी जडलेली आहे नि दुखणं हाताबाहेर



# जास्त मुलं म्हणजे पुढल्या काळात जास्त उत्पन्न ही समजूत बरोबर आहे ?

असं म्हणतात कीं, प्रत्येक मूल स्वतःबरोबर दोन हातहि घेऊन येत, म्हणजेच जास्त काम करून जास्त पैसे मिळवूं शकतं.

पण, माणसाला आयुष्यभर खायला लागत असलं तरी जीवनाचा कांही काळच अन्नासाठी कमावतां येतं, हें विसरून चालणार नाहीं.

आधुनिक पद्धति वापरून उत्पादन वाढवतांहि येईल. पण त्यासाठीं पाहिजे कौशल्य आणि शिक्षण.

शिकलेला माणूस पचंदर आयुष्यांतच जास्त पुढें जाऊं शकतो. तुम्हांला जास्ती मुलं असलीं तर त्यांचं शिक्षण, फार काय, व्यवस्थित पोषणहि कठीण जाईल.

पुष्कळ, परंतु न शिकलेल्या, आजारी, अशा मुलांपेक्षा, थोडीशीं, पण शिकलेलीं, निरोगी मुलं जास्त कमाई करूं शकतील.

davp 72/388

गेलेलं आहे. माझ्याकडे थोडे अगोदर आले असते तर काहीतरी धडपड करता आली असती. पण आता शेवट अटळ आहे. तसंच झालं. कॅन्सरचं निदान झालं. माधवराव पुण्यात आपल्या घरी गेले. तिथेच त्यांनी डोळे मिटले. ज्या दिवशी डॉ. भडकमकरांनी माधवरावांच्या कॅन्सरचं निदान केलं तो माझ्या आयुष्यातला अगदी गुदमरलेला दिवस होता.'

माधवराव पटवर्धनांकडून बोलणं मर्ढेकरांकडे आणि मर्ढेकरांकडून एकूणच वाङ्मयाकडे वळलं. ते सांगू लागले,

'जसा हरिभाऊ आपटयांना होता त्याच जातीचा उत्कट असा समाजाविषयीचा जिव्हाळा मर्ढेकरांनाही होता. मर्ढेकरांचे एक्सप्रेशन परंपरेपासून दूर गेलं पण परंपरेतून झिरपत आलेली सामाजिक जाणीव त्यांच्या कवितेत नि इतर साहित्यातही प्रखरपणे जाणवते. रामदासांना समाजाविषयी जेवढी आस्था होती तेवढीच मर्ढेकरांना माणसाविषयी होती. यंत्रयुगात मनुष्याचं मनुष्यपण टिकून राहीलं पाहिजे, माणूस अखेरपर्यंत मुक्तच राहीला पाहिजे हीच त्यांची धारणा होती. रामदासाला समाजोन्नती अभिप्रेत होती मर्ढेकरांना माणसाचं माणूसपण शाबूत रहायला हवं होतं. दोघांची जातकुळी एकच. मर्ढेकरांची 'पाणी' कादंबरी मला फार आवडते.

मानसशास्त्रीय तत्त्वांवर साहित्यकृतीची उभारणी करणं अलीकडच्या काळात सुरू झालं असं आपण म्हणतो. पण त्या प्रवृत्तीची मूळं तुम्हाला मागे-मागे जाऊन तपासली पाहिजेत. हरिभाऊंच्या 'यशवंतराव खरे' मधलं यशवंतरावं नि त्याच्या आईचं भांडणं हे मानशास्त्रीय ऑब्झर्व्हेशनचं उत्तम उदाहरण आहे. हरिभाऊंच्या सर्व वाङमयात एक विलक्षण जिव्हाळयाची जाणीव आहे. त्यांनी काळाची गरज ओळखली होती. कलाकृती ही कलातत्त्वांना धरूनच हवी हे एकदम मान्य, पण रंजनाला सामाजिक आशयाची जोड दिली तर ते अधिक श्रेयस्कर. मात्र 'वज्राघात' लिहिताना हरिभाऊ मुक्त झाले होते. ते मराठयांच्या इतिहासातून, सामाजिक हेतूपूर्तीतून मुक्त झाले होते. 'वज्राघात' लिहीणारे हरिभाऊ एक मुक्त कलावंत आहेत. कलेचं, कलात्मकतेच मला कधीच वावडं नव्हतं. पण कलात्मकतेच्या नावाखाली निर्जीव वाङमयनिर्मीती. मात्र होता कामा नये. वाङमयात नेहमी सजीवता हवी. हरिभाऊंच्यात ती भरपूर आहे. लोकशिक्षण हे आमचं कामच नव्हे असं पूर्वीच्या कुठल्याही लेखकाने म्हटलेलं नाही. ती सगळी एकसंघ मनं होती.

'आमच्या पूर्वीच्या पिढीला म्हणा किंवा अगदी आमच्या पिढीला म्हणा, वाचकवर्ग आजच्या मानाने लहान मिळाला. पण जो काही लाभला तो एकसंघ होता. सुसंगत होता. आता वाचकवर्ग खूप वाढला आहे. खेडोपाडी शिक्षण पोहोचलं आहे. पण आजचा लेखक फार अपुरा पडतोय. आणि नव्या शाळाकॉलेजातून तयार होणारा नवा

वाचकवर्ग हा वाङमयाकडे रसास्वादाने जाण्याऐवजी वाङमयीन टिकेच्या पोपट-पंचीच्या मार्गाने जात आहे. चर्चा अवश्य हवी. पण त्यामुळे वाङमयाच्या रसास्वादात विघ्न येता कामा नये. आजचा लेखक हा त्याच्याच काळाचा लेखक बनला आहे. पुढच्या उगवणाऱ्या पिढीवर तो मंत्र टाकू शकत नाही ही खरी ट्रॅजेडी आहे. मागच्या पिढीतले लेखक हे त्यांच्याकाळाचेही लेखक होते नि पुढच्या काळाचेही लेखक आहेत. आजचा लेखक मात्र कर्तृत्वाने तोकडा पडत आहे. त्याचं लिखाण समाजात दूरवर पोहोचत नाही. कविता संग्रहाची अवघे साडेसातशे प्रतींची आवृत्ती काढतात नि खपायला वर्षोन वर्ष लागतात हे कशाचं लक्षण आहे? आजच्या लेखकाचं वाङमयीन ऐश्वर्य निश्चितपणे कमी झालं आहे. सामुहीक मनाला अवाहन करण्याची नव्या पिढीची शक्तीच कमी झाली आहे. आता हिरो नाहीतच. ॲन्टी हिरो आहेत. ॲन्टी हिरो सामुहीक मनाला कसलं अवाहन करणार? साहित्यिकाने सौंदर्यदर्शनाचे मार्गाने सामुहीक मनाला आवाहन केलं पाहीजे.'

खांडेकरांच ऐन तारुण्य पंतोजीपणात व्यतीत झालं आहे. त्यांच्या काळात तो ध्येयवाद होता. इतक्या वर्षांच्या अलीप्त अंतरावरून आज आम्हाला तो अगतिकतावाद वाटतो. ते कसंही असो, पण खांडेकर हाडाचेच मास्तर खरे. ते बोलण्याच्या भरात म्हणालेच होते, 'मी खरा रंगतो दोन गोष्टीत : वाचण्यात आणि शिकवण्यात. आजही एखादा विद्यार्थी डिफिकल्टी घेऊन आला, तर त्याला तो भाग समजवून देण्यात मला सर्वात अधिक आनंद होईल. हातातलं काम खाली ठेऊन मी त्याची समजूत घालीन., हे सर्व कशाचं लक्षण आहे? तर, आपण समाजाचं नि नव्या पिढीचं काही देणं लागतो ही त्यांची दृढमूल श्रद्धा आहे ह्याचंच. ही हाडीमांशी खिळलेली घट्ट श्रद्धाच त्यांना नजरेने काहीही दिसत नसतानासुद्धा लेखनप्रवृत्त करीत आहे. त्यांनी वाचा लिहायला माणूस ठेवलेला आहे. त्याच्याकडून ते नवीन ते सगळं वाचून घेतात. आपण ऐकतात. दुपारी त्याला मजकूर तोंडी सांगतात. तो टिपून घेतो. अशी ही अंधारातली त्यांची प्रकाशयात्रा चालू आहे. 'अद्वैत' ह्या नव्या कादंबरीची त्यांनी पाच-दहा पानं लिहीली. पण पुढे ती कादंबरी तशीच पडून आहे. ते म्हणाले,

'मला अजून नीट सूर सापडत नाही आहे. रक्तदाबाच्या आजाराची कटकट सारखी उद्‌भवते. मग पडून रहावं लागतं. बरं, कादंबरीचा संपूर्ण आराखडाही माझ्या डोळ्यांसमोर कधीच नसतो. काही समस्या समोर असलेल्या दोन तीन व्यक्ती मला दिसतात. त्यांच्याविषयी मी विचार करतो नि लिहायला सुरुवात करतो. घटना अगोदर ठरलेल्या नसतात. त्या व्यक्ती जशा वाढतात, वागतात, परिस्थितीशी जशी त्यांची नाती जमतात, तशी माझी कादंबरी फुलत जाते. ह्या सर्व गोष्टी व्हायच्या म्हणजे सूर सापडायला हवा.

पण भेटायला येणारी मंडळीही अनेकदा व्यत्यय आणतात. कामात गढून गेलेल्या माणसाला आपण चाळवू नये ही साधी गोष्ट आपल्याकडे अजून जरासुद्धा रुजलेली नाही. माणसं आपली गप्पा मारण्यासाठी येतच रहातात. म्हणतात, 'सहज ह्या बाजूला आलो होतो. तिथं कळली भाऊरावांची प्रकृती बरी नाही. म्हणून म्हटलं इकडे आलोच आहोत तर भेटून घेऊया!' अशा माणसांना मी मनातल्या मनात म्हणतो, 'अरे, माझ्या प्रकृतीची काळजी घेण्यापेक्षा माझ्यातल्या लेखकाची काळजी घ्या नि माझ्या कामात व्यत्यय आणू नका!' पण कुणी कुणाला सांगायचं? माझं आत्मचरित्रही अर्धच लिहून पडून आहे. दोन-तिनशे पानं झाली आहेत. २८–२९ सालापर्यंत, म्हणजे शिरोड्यातली वाङ्मयीन उमेदवारी संपेपर्यंतचा सगळा भाग लिहून झालेला आहे. काही भाग आत्मचरित्रात घालायचा नाही असं मी ठरवलंय. उदाहरणार्थ माझं काव्यलेखन. तर, माझ्या काव्यलेखनाविषयीचा मजकूर 'वैखरी' त्रैमासिकात प्रसिद्ध झाला आहे. मात्र मी अर्धवट चरित्र प्रसिद्ध करणार नाही. कुंतीच्या जीवनावर मला 'वानप्रस्थ' म्हणून कादंबरी लिहायची आहे. असे सगळे बेत आहेत. मात्र यापुढे फक्त शंभर पानांच्याच कादंबऱ्या लिहाव्यात असं वाटतं. इतक्या कमी पानात सबंध जीवनाची जाण आणून देणं मुष्कील आहे पण ते मला करायचं आहे. शंभर पानांची कादंबरी वाचून दीर्घ कथेची जाणीव वाचकांना न होता एका कादंबरीचीच जाणीव व्हावी अशी माझी इच्छा आहे.

एक गोष्ट मात्र बरी झाली आहे की महाराष्ट्र सरकारने मला दरमहा चारशे रुपयांचं पेन्शन गेली काही वर्षं सुरू केलेलं आहे. त्यामुळे पैशांच्या बाबतीत मी निश्चित झालो आहे. एरव्ही पैशासाठी कदाचित लिहिणं प्राप्त झालं असतं. आता पोटापाण्याचा तसा ससेमिरा मागे नाही. त्यामुळे मी माझ्या मनासारखी कादंबरी शांतपणे लिहू शकेन. फक्त प्रकृतीने साथ दिली पाहिजे. फडक्यांना पेन्शन सुरू झाल्यानंतर मागोमाग मलाही सुरू झालंय. ह्या मासिक मानधनासाठी मी सरकार दरबारी अर्जविनंत्या केल्या नव्हत्या. सरकारने आपखुषीने माझी म्हातारपणची सोय पाहिली.

'इतकं जन्मभर लिहूनसुद्धा मी सांगतो की आपल्याकडे चांगलं कलात्मक साहित्य लिहून निव्वळ त्यातून मिळणाऱ्या मानधनावर मराठी लेखकाला जगता येणार नाही. मराठीत तरी लेखन हा जोडधंदाच करावा लागेल. हे दुर्दैव आहे. कारण त्यामुळे लेखकाला आपला सर्वच्या सर्व वेळ नि निष्ठा लेखनाकडे वळवता येत नाहीत. सहाजिकच पोटापाण्याच्या अन्न व्यवसायात गुंतून पडल्यामुळे लेखकाच्या अनुभवविश्वाला मर्यादा पडतात नि त्याचा विपरीत परिणाम त्याच्या साहित्यनिर्मीतीवर होतो.

'मात्र इतरांच्या मानाने मला फार मोठा वाचकवर्ग लाभला. बेचाळीस

सालापासून गो. गो. विद्वांस माझ्या कथा कादंबऱ्या गुजरातीत अनुवादीत करू लागले. माझ्याप्रमाणेच विद्वांसांना गांधीजीप्रणीत सामाजिक पुनरुज्जीवनाच्या प्रश्नाविषयी आस्था आहे. ते सध्या अहमदाबादेस असतात. त्यांना गुजराती मातृभाषेसारखं येतं. त्यांनी माझ्या सगळ्या कादंबऱ्या गुजरातीत नेल्या. आज मी गुजरातीतला अतिशय लोकप्रिय लेखक आहे. प्रथम शरदबाबू तिथे लोकप्रिय झाले. त्यांच्या मागोमाग आता मी लोकप्रिय आहे. माझ्या गुजराती 'क्रौंचवधा'च्या पाच-सहा आवृत्या झाल्या. 'जळलेला मोहोर' चीही चौथी आवृत्ती चालू आहे. तामिळ लेखक श्री. का श्री. श्रीनिवासाचार्य यांनी माझी पुस्तकं तामिळ भाषेत अनुवादित केली आहेत नि तामिळीत फार लोकप्रिय आहेत. माझ्या कथा-कादंबऱ्यांचे हिंदी अनुवाद मात्र यशस्वी ठरले नाहीत. श्री. कुळकर्णी नावाच्या एका इंजिनियर गृहस्थांनी माझ्या 'ययाति'चं भाषांतर इंग्रजीत केलं. त्यात काही दुरुस्त्या इंदूरच्या प्रा. बोरगावकरांनी सुचवून इंग्रजी प्रत तयार केली. पण मुळातलं सौंदर्य इंग्रजीत उतरू शकलं नाही, कारण मराठीतली माझी अलंकारीक भाषा इंग्रजीत अनुवादीतांना भाषेची अडचण येते. शिवाय, आपल्याला ज्ञात असलेला पौराणिक संदर्भ इंग्रजी वाचकाला आकलन होत नाही. त्यामुळे रसभंग होतो. पहा, मराठीतली कुठलीही कलाकृती इंग्रजीत यशस्वी झालेली नाही. फक्त वर्तमानपत्री लेखन मात्र इंग्रजीत जाऊ शकेल. त्याचे पैसेही अर्थातच चांगले मिळतील.'

भाऊंचं नागमोडी वळणाने जाणारं तारस्वरातलं बोलणं हे असं खुल्लंखुल्ला आहे. हाताशी येईल तो विषय ते लिलया पेलू शकतात. बोलणंसुद्धा धोपटमार्गी नाही. मर्माचं आणि गोळीबंद असतं. त्याला एक धार असते. एक मुद्दा असतो. बोलण्याच्या भरात ते सहजगत्या म्हणून गेले :

श्रीमंतीत एक शाप असा आहे की माणसाच्या मनातली कणव हळूहळू सुकून जाते.

कादंबरीत कालखंडाचं मर्म प्रतिबिंबित झालं पाहिजे.

लोकांनी माझं माझ्या योग्यतेच्या मानानं फारच कौतुक केलं. इतकं केलं नसतं तर कदाचित बरं झालं असतं.

मोठा कलावंत आणि सखाराम बाईंडर ह्या दोघांनाही लोक एकाच पातळीवरचे समजात ही लोकांची चूक आहे.

चोरटेपणाचं दुर्दैव असं आहे की त्यातून नसत्या गफलती निर्माण होतात. म्हणून कलावंताला अधिक समंजस मोकळेपणा मिळाला पाहिजे.

वाचक विचारायचे, 'तुमची नवी उल्का केव्हा देणार ?' त्यातून अमृतवेलमधल्या नंदाचा जन्म झाला.

कुसुमाग्रजाजवळ सजीव काव्यात्मता आहे. त्यांनी गडकऱ्यांच्या अलंकारीक शैलीचं सिम्लीफिकेशन केलंय.

लोकांनी गडकऱ्यांना गद्यकवी मानलं, पण मला पद्यकवीही मानलं नाही ?

लेखकाने कधीही वाचकावर रागावू नये.

सौभद्र, शारदा, सुदाम्याचे पोहे, झेंडूची फुले, वगैरे निवडक शंभर मराठी पुस्तकं नीट संपादीत करून सामान्य वाचकापर्यंत पोहोचवली तर अभिरुची सलामत राहील.

खांडेकरांचा नंदादीप बंगला जरा उंचावर आहे. त्यांच्या पडवीत बसून पलीकडल्या घरांची उतरती छपरं दिसू शकतात. अंगणात एक सिमेंटची आडवी पायवाट बांधली आहे. भाऊ अंगणातल्या नेमून दिलेल्या पायवाटेवर सकाळ संध्याकाळ फेऱ्या घालतात. ते म्हणाले, 'संध्याकाळी मी खाली अंगणातच असतो.' नजरेचा नजराणा हिरावून नेल्यामुळे तशी त्यांची अंधारयात्राच सुरू आहे. पण भाऊ समाधानात आहेत. म्हणाले, 'सत्तरी उलटल्यावर मी हे घर बांधलं नि स्वतःच्या घरात रहायला आलो. आता वाटतं हे घर बांधलं तेच बरं झालं, कारण डोळे नसल्यामुळे मला रापत रापत संथ वावर करावा लागतो नि सत्तेचं घर असल्यामुळे मी तसा करू शकतो. भाड्याच्या छोट्या जागेत मी काय केलं असतं? तेव्हा, होतं ते बऱ्यासाठीच होतं!' त्यांच्याकडे कुणी पाहुणे आले. त्यांना भाऊ म्हणाले, 'आता हे मंदाचंच राज्य आहे!' मंदा म्हणजे भाऊंची लेक. ती कोल्हापूरातच प्राध्यापक आहे. भाऊंचं हवं-नको तीच बघते. संसारी मुलगा अविनाशही शेजारीच प्रतिमा नगरात राहातो. तेव्हा, त्यांचीच अशी मंडळी त्यांच्या हाकेला ओ द्यायला तत्पर आहेतच. पण त्याच्यापलीकडे प्रेमळ भाऊ व भाऊंच्या निर्मळ साहित्यावर, आणि भाऊंच्या पारदर्शक विचारविश्वावर मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या माणसांचा प्रचंड समुद्र आहे. त्या प्रेम करणाऱ्या समुद्रातला एक बिंदू ह्या नात्याने त्या समस्त सागराच प्रतिनिधीत्व करून नियतीपाशी असलेलं सागराचं एकच मागणं सांगतो — आमची गाज भाऊंच्या कानावर अखंड पडो!

□ □ □


माणूस
२६ जानेवारी
विशेषांक

राजाजी
य. दि. फडके

आकार नेहमीचा
पृष्ठे : सुमारे शंभर
किंमत : एक रुपया

## क्रीडांगण

# वैभवी खोखो स्पर्धा बारामती

मुकुंद मणूरकर

खोखो हा शब्द ऐकल्यावर नाक आकुंचित करणे, डोळे बारीक करून कपाळावर दोन आठ्या धारण करणे किंवा 'जाऊ दे–मरू दे' अशा अर्थाने हात झटकण्याचे दिवस आता संपले आहेत. बहात्तर साल मावळत असताना बारामतीकरांनी हे सिद्ध केलंय. मोठ्या रुबाबाने सिद्ध केलंय! खोखोची पाळेमुळे जिथं रुजलीत अशा पुण्या मुंबईसारख्या ठिकाणी खोखोला लोकप्रियता मिळाल्यास विशेष आश्चर्य नाही. पण शहरी वातावरणाचा शिरकाव न झालेल्या बारामतीसारख्या ठिकाणी खोखोच्या राष्ट्रीय अजिंक्यपदाची स्पर्धा यशस्वी–नुसतीच यशस्वी नव्हे तर मोठ्या दिमाखाने पार पडलेली पाहून उच्चयावत खोखो प्रेमिकाला आनंदाचे भरते आले! आणि यावेळेला परिस्थिती तरी कशी होती ते पहा. एकीकडे दुष्काळाच्या भीषण सावटाखाली दबली गेलेली जनता, तर दुसरीकडे खेळांचा बादशहा समजल्या जाणाऱ्या क्रिकेटमधील नाट्यमय घटनांनी उल्हसित झालेली मने–या दोन्ही गोष्टी खोखोच्या लोकप्रियतेला खो देण्यास समर्थ ठरणाऱ्या होत्या. पण यावरही मात केली गेली आणि अंतिम सामन्यांच्या दिवशी तिकिटे हस्तगत करण्यासाठी दीड-दीड मैल लांबीच्या रांगा लागल्याचे अनोखे दृश्य पहायला मिळाले. हे यश कुणाचे? खोखोचे की खेळाडूंचे, संघटकांचे की प्रेक्षकांच्या उत्साहाचे? नाही कोणत्याही एकाच बाजूकडे हे श्रेय जाणार नाही. कारण हा राष्ट्रीय स्पर्धेचा जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी हजारोंचे प्रयत्न कारणीभूत आहेत. नावेच घेऊन सांगायचे झाल्यास विनोदकुमार गुजर, राजाभाऊ उंडे, प्रा. छोटू नाडकर्णी व मुकुंदराव आंबर्डेकर ही या रथाची चक्रे आणि हा रथ डौलाने मिरविला गेला तो महाराष्ट्राचे गृहखात्याचे राज्यमंत्री व क्रीडामंत्री ना. शरदराव पवार यांच्या कुशल सारथ्याखाली! शरद पवारांनी आपल्या राजकारणाच्या खेळातून सवड काढून इथं जातीने लक्ष घातले व खोखोवर राजमान्यतेचा वरदहस्त असल्याचे दाखवून दिले अंतिम सामन्याच्या वेळी मेहिरपीच्या खुर्चीवर विराजमान न होता, प्रेक्षकांनी खच्चून भरलेल्या गॅलरीत बसून खेळाचा आनंद लुटणारा हा तरुण मंत्री या स्पर्धेचा मानबिंदू ठरला.



**वैभवी स्पर्धेची सुरुवात – शपथविधीच्या वेळी महाराष्ट्राचे संघनायक सतीश देसाई व शीला दळवी**

इथं एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. लेखाचा मुख्य हेतू संघटकांबद्दल चार बरे शब्द लिहिणे हा आहे. कारण महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सर्व खोखोपटूंना स्पर्धेत भाग घेताना काय अडचणी येतात याचा मला अनुभव आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून स्पर्धेच्या ठिकाणी धडपडत येणारे खेळाडू स्पर्धेनंतर परततात ते थकलेल्या शरीराने आणि उबगलेल्या मनाने. पण ही बारामतीची स्पर्धा खोखोपटूंना सुखद धक्का देऊन गेली. हे श्रेय नक्कीच संघटकांचे ! आणि त्यासाठीच त्यांचे कौतुक केले पाहिजे. अपेक्षा ही की याची पुनरावृत्ती सदा घडावी !

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य खोखो संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अविश्रांत मेहनत घेतली. क्रीडांगणावरील व्यवस्थेइतकीच त्यांची कार्यालयीन पद्धतीही चोख व तत्पर होती. खेळाडूंच्या पत्रिका, पासेस्, स्मरणिका खेळाडूंना छातीवर लटविण्यासाठी दिलेली स्मृतिचिन्हे, सारेच कसे रेखीव होते. स्वत: सरकार्यवाह मुकुंदराव आंबर्डेकरांनी स्पर्धेपूर्वी आठवडाभर आधी बारामतीत मुक्काम करून जिवाचे रान केले. आपल्या सहकाऱ्यांशी खेळीमेळीने वागून त्यांच्याकडून अवघड

कामे करून घेण्याची त्यांची कुवतही नजरेस आली. आंबर्डेकरांबरोबरच त्यांचे संघटनेतील सहकारी विवेक पैंगावकर आणि तमेश डिचोलकर गुण-लेखक प्रमुख रमेश वरळीकर व पुण्याचे सुनील तांबे, शाम पुरोहित, सुहास वाघ हे तीन शिलेदार यांनी स्पर्धेच्या सुबक, शिस्तबद्ध आणि तत्पर संयोजनासाठी किती परिश्रम घेतले त्याला मोजदादच नाही. या प्रचंड शोचे पडद्यामागील कलाकार होते मुंबईचे शरद पुरोहित, भास्करराव केरकर तसेच बारामतीचे राजाभाऊ उंडे व घारेगुरुजी ! या सर्व मंडळींचे त्यांच्या संघटनात्मक कौशल्या-साठी अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे.


या सर्व पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा संघटनेची निष्क्रीयता उठून दिसते. या स्पर्धा बारामतीऐवजी पुण्यात घ्याव्यात ही त्यांची सुप्त इच्छा फलद्रूप न झाल्या-मुळेही असेल कदाचित्, पण त्यांनी जणू स्पर्धेवर बहिष्कारच टाकला होता. स्पर्धेपूर्वी महाराष्ट्राच्या संघांना निरोप देण्याचा समारंभ पुण्यात नवमहाराष्ट्र संघातर्फे झाला होता. त्यावेळी जिल्हा संघटनेचे कार्याध्यक्ष मोठ्या मानभावी-पणाने म्हणाले की, हा कार्यक्रम खरं तर जिल्हा संघटनेतर्फे व्हायला हवा होता. आम्हाला ते जमले नाही. पण आता नवमहाराष्ट्राने आयोजित केलेल्या समारंभात आमचाही हात आहे असे समजा वगैरे वगैरे.

प्रत्यक्ष खेळाचा आढावा घेण्यापूर्वी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करायला हवा आणि तो म्हणजे पंचांच्या बाब-तीत. या स्पर्धेतील पंचांची कामगिरी स्पर्धेच्या रुबाबाला साजेशी झाली नाही असे खेदाने म्हणावे लागेल. राष्ट्रीय स्पर्धांच्या सुरवातीपासून आतापर्यंत पंच म्हणून उभे रहाणाऱ्या काही पंचाना अचूक निर्णय या अतिवेगवान खेळात देता येत नव्हते. तसेच या खेळाशी सध्या फारसा संबंध नसलेलेही अनेक पंच क्रीडांगणावर मिरवताना दिसले. याउलट म्हैसूरचे श्रीकंठस्वामी व रंगाप्पा, हैद्राबादचे विष्णुकुमार आणि महाराष्ट्राचे सुनील तांबे, रमेश डिचोलकर व शाम पुरोहित यांची अचूक कामगिरी उल्लेखनीय ठरली. प्रा. शंकर नारायण या विख्यात खोखो तज्ज्ञानेच ही गोष्ट कबूल केली. मला वाटते भारतीय बॉस्केटबॉल फेडरेशन-प्रमाणेच खोखो फेडरेशननेही बराच काळ पंचगिरी करणाऱ्या पंचाबाबत ' कामराज योजना ' कार्यवाहीत आणावी ! असो.

आता महाराष्ट्राच्या संघांच्या यशा-पयशाबद्दल थोडेसे. स्पर्धेपूर्वी लिहिलेल्या लेखात मी म्हटले होते की महाराष्ट्राच्या पुरुष व कुमार संघांना विशेष आव्हान नसणार. त्याचबरोबर महिला संघाच्या यशाबद्दल साशंकताही व्यक्त केली होती. पुरुष व कुमार संघांनी हा अंदाज खरा केला विजेतेपद मिळवून आणि महिला संघाने उपांत्य फेरीत बाद होऊन ! अंदाज खरा ठरल्याचे समाधान बाळगायचे की महिला संघाच्या परा-भवाबद्दल खंत बाळगायची ? वास्तविक गेल्या वेळी संयुक्त विजेतेपद मिळवि-लेला हा संघ. त्यामुळे संघाच्या पदरी थोडासा आत्मविश्वास होता, गुणवान खेळाडूंची सुयोग्य सांगड संघात घातली गेली होती व सुरेश दिनकर या कस-

लेल्या खेळाडूंच्या मार्गदर्शनाचा लाभही झाला होता असे असतानाही हा संघ गुजरात बरोबरील लढतीत उपांत्य फेरीतच बाद झाला तो नीला जोशी, उषा नगरकर यांच्या बेजबाबदार खेळामुळे. आधारस्तंभ असणाऱ्या या खेळाडूंच्या अपयशाशी महाराष्ट्राचे अपयश निगडीत आहे. गुजरातचा संघ बलवान होता हे नाकारण्यात काही अर्थ नाही. पण महाराष्ट्राचा संघही सहजासहजी हार खाण्यासारखा नव्हता हेही तितकेच खरे! महाराष्ट्राचे आक्रमण वाखाणण्यासारखे होते. स्वतः कर्णधार शीला दळवी, हेमा गोखले व जयश्री गोखले यांचा वेगवान पाठलाग गुजरातच्या तुलनेत उजवा ठरावा. या पराभवाबद्दल शीला दळवीला विचारले असता तिने आपला संघ कमी पडल्याचे कबूल केले. क्रिकेटमध्ये गोलंदाजांनी मिळविलेल्या यशावर भारतीय फलंदाज जसा बोळा फिरवितात तशीच काहीशी परिस्थिती आमच्या बाबतीत झाली असेही तिने सांगितले. ते काही असो, महिला संघाने विजयी होऊन महाराष्ट्राला तिहेरी मुकुट संपादन करण्याचा मान मिळवून दिला असता तर दुधात साखर पडली असती! महिला संघाच्या बाबतीत आणखीही एक गोष्ट नजरेस आली, पण ती गुजरात संघाच्या बाबतीत. आणि तीही संघाचे मार्गदर्शक प्रा. योगेश यादव यांनी खेळलेल्या विचित्र खेळीसंबंधात! गुजरातच्या भावना पारेखला राणीलक्ष्मीबाई पुरस्कार मिळावा म्हणून यादवसाहेबांनी एक क्लृप्ती योजली. गुजरातची पहिली तुकडी मैदानात उतरल्याबरोबर भावनाच्या दोघी सहकारी स्वतः मैदानाबाहेर जायच्या. आणि मग सातही मिनिटे भावना खेळून जायची. अशा तऱ्हेने तिचा खेळ परीक्षकांच्या नजरेसमोर आणून त्यांना भावनाला पारितोषिक देण्यास उद्युक्त करण्याचा योगेश यांचा डाव! अर्थात् हा डाव उधळला जाऊन राणीलक्ष्मीबाई पुरस्काराचा मान मिळविला नीलीमा सारोळकर या इंदूरच्या शाळकरी कन्येने! भावना पारेखसारख्या श्रेष्ठ खेळाडूचा कस अशा तऱ्हेने नजरेत आणण्यात योगेश

**गतिमान आक्रमणाची झलक – विजय भटचे असे हे 'सूर' प्रेक्षकांच्या काळजाला हात घालत असत.**



यादवांनी तिच्यावर तर अन्याय केलाच पण तिच्या दोन सहकाऱ्यांवर अधिक !

कुमारांच्या स्पर्धेचे हे दुसरेच वर्ष. महाराष्ट्राने या गटात यंदाही विजय मिळवून मागील वर्षाची पुनरुक्ती केली. अशोक दाहिजेची पळती, शेखर कुलकर्णी व सुधीर पाठक यांचे आक्रमण व चंद्रकांत दळवीचा अष्टपैलू खेळ यांनी म्हैसूरचा फडशा पाडलाच पण भविष्यकाळात महाराष्ट्राच्या पुरुष संघाची 'व्हिक्टरी स्टँड 'वरील जागा सुरक्षित असल्याची ग्वाहीही दिली. पुण्याचा अशोक दाहिजे 'वीर अभिमन्यू ' पुरस्काराचा मानकरी ठरला. कुमारांच्या यशात मार्गदर्शक मुंबईचे राजा जेहते यांची कामगिरी 'मोलाची ठरली असावी !

पण पुरुष गटाचे सामने हे खरे स्पर्धेचे मुख्य आकर्षण असते. छातीफोड करणारी पळती आणि बेभानपणे मारलेले सूर यांचे दर्शन इथेच दिसून येते. महाराष्ट्राचा संघ या दोन्ही बाबतीत दादा ! त्यांना विजय' मिळाला नसता तरच ते आश्चर्य ठरले असते. महाराष्ट्राचे अ आणि ब असे दोन संघ स्पर्धेत उतरले तरी अंतिम सामना त्या दोघातच होईल इतकी ताकद सध्या महाराष्ट्रात आहे. वेगवान, गतिमान वगैरे शब्दांची व्याप्ती कमाल मर्यादेपर्यंत ताणली तरच हे शब्द महाराष्ट्र गुजरात यांच्यातील अंतिम सामन्याबाबत वापरता येतील. महाराष्ट्राच्या विजय भट, कर्णधार सतीश देसाई, श्रीरंग इनामदार यांचे पल्लेदार व सुभाष चुटकेचे प्रतिपक्षाला भयचकित करणारे आक्रमण यापुढे कुठलाच खेळाडू टिकू शकत नव्हता. याही परिस्थितीत गुजरातच्या गुंजाळ पटेलने केलेला स्थिरचित्त खेळ त्याचा दर्जा दाखवून गेला. महाराष्ट्राने गुजरातवर लिलया मात केली. महाराष्ट्राचा शेखर धारवाडकर हा भरंवशाचा गडी दोन्ही डावात झटक्यात बाद झाला असतानाही प्रकाश शेठ, प्रमोद गवंडे यांनी जबाबदारीचा खेळ केला. शेठने दोन्ही डावात तीन-तीन मिनिटांची केलेली पळती व प्रतिपक्षाचे दोन गडी टिपण्यात दाखविलेले कर्तृत्व त्याला 'एकलव्य' पुरस्कार मिळून देण्यास पुरेसे ठरले.

अशी ही रंगलेली स्पर्धा. दुष्काळी परिस्थितीतही स्पर्धा साजरी करून महाराष्ट्राने आमची मनं खचली नाहीत हे सिद्ध केलेच पण आपल्या क्रीडावैभवाचे प्रदर्शनही परप्रांतीयांना दाखविले. गुजरातच्या एका निवृत्त झालेल्या जेष्ठ खेळाडूने ही स्पर्धा संपल्यानंतर सांगितले, 'खोखोला असे सोनियाचे दिवस येणार असतील तर नव्या उमेदीने अजून दहा वर्षे खेळण्याची आपली तयारी आहे. '

महाराष्ट्राच्या खोखो संघटनेला यापेक्षा अधिक चांगले प्रशस्तिपत्रक कोणते हवे ! □ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक-मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**